सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक ११२ । पाने १२ । किंमत रु. ६/- | RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com




महत्त्वाचे

### पीएफच्या व्याजदराबाबत आज निर्णय

**नवी दिल्ली** : ईपीएफओच्या केंद्रीय विश्वस्त मंडळाची म्हणजेच सीबीटीची बोर्ड बैठक शुक्रवारी होणार आहे, यात आर्थिक वर्ष २०२५ साठी ईपीएफ व्याजदराचे मूल्यांकन केले जाणार आहे. या बैठकीत ठेवींच्या व्याजदरात कपात करण्याबाबात निर्णय घेतला जाऊ शकतो, असे संकेत मिळत आहेत. शेअर बाजारातील घसरण आणि बॉण्ड यील्ड तसेच जास्त क्लेम सेटलमेंट लक्षात घेता हा निर्णय घेण्यात येण्याची शक्यता आहे. या निर्णयाकडे सर्व कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे. यापूर्वी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने गेल्या वर्षी व्याजदर ८.१५ टक्क्यांवरून ८.२५ टक्क्यांवर नेला होता. मागील आठवड्यात ईपीएफओ गुंतवणूक व लेखा समितीने संस्थेच्या उत्पन्न आणि खर्चाचा आढावा घेतला, ज्यात बोर्डाने ठेवीवरील व्याजदरात कपात करण्याचा निर्णय घेतला होता.

# ऐक्याच्या महायज्ञाचा समारोप

### महाकुंभावर पंतप्रधान मोदी यांचे प्रतिपादन

**नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी महाकुंभ मेळ्याची तुलना गुलामगिरीच्या मानसिकतेच्या बेड्या तोडून मुक्तपणे श्वास घेणाऱ्या राष्ट्राच्या नव्याने जागृत झालेल्या चेतनेशी केला. महाकुंभाची बुधवारी सांगता झाली. ऐक्याच्या महायज्ञाचा समारोप झाला, असे मोदी यांनी धार्मिक महामेळ्याची सांगता झाल्यावर दुसऱ्या दिवशी लिहिलेल्या ब्लॉगमध्ये म्हटले आहे.

कल्पनाही केली नव्हती, इतक्या भाविकांनी पवित्र संगमात स्नान केले. भारत आता नवीन ऊर्जेने पुढे जात आहे आणि हे युगाच्या बदलाकडे निर्देश करते, जे भारतासाठी एक भविष्य



लिहिणार आहे. सेवेत कोणतीही त्रुटी राहिली असल्यास आम्हाला माफ करा, असे म्हणत नरेंद्र मोदी यांनी आई गंगा, यमुना, सरस्वती आणि नागरिकांची माफी मागितली.

अशा प्रकारची मोठ्या प्रमाणात व्यवस्था उभारणे सोपे नाही, असे मोदी यांनी म्हटले. महाकुंभात मोठ्या प्रमाणावर भाविकांनी गर्दी केली होती. येथे झालेल्या चेंगराचेंगरीत किमान ३० भाविकांचा मृत्यू झाला. १३ जानेवारी रोजी महाकुंभाचा प्रारंभ झाल्यापासून प्रयागराज येथील पवित्र स्थळाला ६५ कोटींपेक्षा जास्त भाविकांनी भेट दिली, अशी माहिती उत्तरप्रदेश सरकारने दिली.

### तरुणांची मोठी संख्या आनंददायी

प्रशासमाने मागील काही कुंभांवरून गर्दीचा अंदाज लावला होता. प्रत्यक्षात याच्या किती तरी पट जास्त भाविक आले. महाकुंभात सहभागी झालेल्या तरुणांची मोठी संख्या आनंददायी असल्याचे नरेंद्र मोदी म्हणाले.

### अमेरिकी लोकसंख्येच्या दुप्पट भाविकांचे स्नान

आगामी अनेक शतकांसाठी महाकुंभाने पाया घालून दिला आहे. महाकुंभास भेट दिलेल्या भाविकांच्या आकड्याने निश्चितच विक्रम केला आहे. अमेरिकी लोकसंख्येच्या दुप्पट भाविकांनी पवित्र स्नान केले.

नरेंद्र मोदी यांनी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचे ब्लॉगमध्ये कौतुक केले. योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली सरकार, प्रशासन आणि लोकांनी एकत्रितपणे एकतेचा हा महाकुंभ यशस्वी केला, असे मी उत्तरप्रदेशातील खासदार म्हणून अभिमानाने सांगू शकतो, असे त्यांनी ब्लॉगमध्ये म्हटले.

स्वच्छता कर्मचारी असो, पोलिस असो, नावाडी, चालक आणि आचारी असो सर्वांनी भक्ती आणि सेवेच्या भावनेने अथक परिश्रम करून महाकुंभ यशस्वी केला, अशा शब्दांत त्यांनी प्रयागराजच्या रहिवाशांचे कौतुक केले. मागील काही दशकांत झाले नाही, ते आता झाल्याचे मोदी यांनी म्हटले.

*(वृत्तसंस्था)*

# स्वारगेट एसटी आगारात तरुणीवर एकदा नव्हे, दोनदा बलात्कार

● वैद्यकीय अहवालातून धक्कादायक माहिती समोर

**पुणे, २७ फेब्रुवारी**
पुण्यातील स्वारगेट बसस्थानकात २६ वर्षीय तरुणीवर बलात्कार झाल्याची घटना बुधवारी समोर आली होती. याप्रकरणी पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. आरोपीच्या शोधासाठी आठ पथके तैनात करण्यात आली आहे. यादरम्यान पीडित तरुणीचा मेडिकल अहवाल समोर आला असून, त्यात धक्कादायक माहिती समोर आली आहे. पीडित तरुणीवर एकदा नव्हे, तर दोन वेळा अत्याचार झाल्याचे अहवालातून समोर आले आहे.

पुण्यातील नेहमीच वर्दळ असणाऱ्या स्वारगेट बसस्थानकात मंगळवारी पहाटे पाचच्या सुमारास तरुणीवर अत्याचार झाल्याची घटना घडली. पुण्यात काम करणारी तरुणी फलटणला आपल्या गावी जाण्यासाठी स्वारगेट बसस्थानकात आली होती. यावेळी आरोपी दत्तात्रय गाडे या नराधमाने एसटी आगारात उभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये तरुणीवर अत्याचार केले होते. पीडित तरुणीने पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. यादरम्यान तिची ससून रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. या तपासणीचा अहवाल रुग्णालयाने बुधवारी सायंकाळी पोलिसांना दिला. आरोपीने पीडितेवर एकदा नाही तर दोनवेळा लैंगिक अत्याचार केल्याची माहिती अहवालातून समोर आली आहे. सध्या तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अवघ्या १०० फुटांवर पोलिस चौकी, १८ सीसीटीव्ही, सुरक्षारक्षकांचा फौजफाटा असा सुरक्षेचा सरंजाम असताना, दत्तात्रय गाडे या नराधमाने पीडितेवर दोनवेळा अत्याचार केल्याचे समोर आले आहे. दरम्यान, आरोपी गाडे हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर यापूर्वी शिरूर व शिक्रापूर येथे चोरीचे गुन्हे दाखल आहेत. सध्या तो जामिनावर सुटलेला आहे.

# महाकुंभात बनले तीन महारेकॉर्ड; गिनीजकडून प्रमाणपत्र प्रदान

**लखनौ २७ फेब्रुवारी-**
४५ दिवसांपर्यंत चाललेल्या आस्थेच्या महापर्वात अर्थात महाकुंभात नवनवीन उपलब्ध सोबतच अनेक नवे विक्रम ही प्रस्थापित झाले. यावेळी प्रयागराज महाकुंभाने अनेक गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड आपल्या नावे केले. त्यासंदर्भात गिनीजच्या टीमने उत्तरप्रदेश सरकारला प्रमाणपत्र प्रदान केले.

यावर आनंद आणि समाधान व्यक्त करीत मुख्यमंत्री कार्यालयाने आपल्या एक्स हॅण्डलवर काही छायाचित्रे शेअर केली आहेत, ज्यात मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, दोन्ही उपमुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य आणि ब्रजेश पाठक आपल्या हातात गिनीज वर्ल्ड रेकॉर्डची प्रमाणपत्रे घेऊन दिसत आहेत. याविषयी मुख्यमंत्री कार्यालयाने लिहिले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे यशस्वी मार्गदर्शन आणि



मुख्यमंत्री योगी यांच्या नेतृत्वात साकारलेल्या महाकुंभाच्या भव्य आयोजनाने संपूर्ण देशच नव्हे तर जग विस्मयचकित झाले आहे.

**३२९ ठिकाणी एकाचवेळी गंगेची स्वच्छता**

महाकुंभातील पहिला विक्रम गंगा स्वच्छतेशी निगडीत आहे. गंगेत ३२९ ठिकाणी एकाच वेळी स्वच्छता करण्याचा विक्रम झाला आहे. विक्रमासाठी २५० ठिकाणी एकाचवेळी अर्ध्या तासात स्वच्छतेचे लक्ष्य निर्धारित होते. मात्र, ३२९ ठिकाणी स्वचच्छतेमुळे नवा जागतिक विक्रम प्रस्थापित झाला आहे.

**हॅण्ड पेंटिंग** : दुसरा विश्वविक्रम हॅण्ड पेंटिंगशी संबंधित आहे, ज्यात १०,१०२ लोकांनी एकाच वेळी पेंटिंग केले. यापूर्वीचा विक्रम ७६६० लोकांचा होता.

**झाडण्याचा विश्वविक्रम** : महाकुंभात झाडू मारत स्वच्छता करण्याचाही विक्रम झाला आहे. १९ हजार लोकांनी एकाच वेळी झाडू मारत मारत मेळा स्वच्छता अभियानात सहभाग नोंदविला.



### ४५ दिवसांत १.२६ कोटी भाविकांनी घेतले रामललाचे दर्शन

**अयोध्या, २७ फेब्रुवारी**
जगातील सर्वांत मोठ्या स्वरूपाचा धार्मिक सोहळा असलेल्या प्रयागराज येथील महाकुंभमेळ्यात सहभागी झालेले भाविक अयोध्येत जाऊन राम दर्शन घेत होते. महाकुंभाची सुरुवात झाल्यापासून अयोध्येत भाविकांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. महाकुंभाच्या ४५ दिवसांत १.२६ कोटी भाविकांनी अयोध्येत येऊन रामललाचे दर्शन घेतले. राम मंदिर व्यवस्थापनावरही ताण आला आहे.

# वक्फ विधेयकातील बदलांना मान्यता

**नवी दिल्ली** : केंद्रीय मंत्रिमंडळाने वक्फ विधेयकातील प्रस्तावित बदलांना गुरुवारी मान्यता दिली. येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मांडले जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांनी दिली. केंद्रीय आणि राज्य वक्फ बोर्डाचे नियमन करणाऱ्या कायद्यांमध्ये ४४ बदल प्रस्तावित आहेत.

कोरियन कंपनीसोबत

# राज्य सरकारचा १,७४० कोटींचा सामंजस्य करार

**मुंबई, २७ फेब्रुवारी-**
दक्षिण कोरियाच्या औद्योगिक समूहातील एचएस युसंग ॲडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशन कंपनीसोबत महाराष्ट्र शासनाचा १,७४० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडला. हा सामंजस्य करार उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी. अन्बलगन आणि एचएस ह्युसंग ॲडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशनचे अध्यक्ष सीऑंग यांच्यामध्ये सह्याद्री अतिथीगृह येथे झाला.

या करारदरम्यान देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ह्युसंग कंपनी आता पुणे, छ. संभाजीनगरसोबतच आता नागपुरात आपल्या कार्याचा विस्तार करीत असल्याचे पाहून आनंद होत आहे. नागपूरच्या बुटीबोरी येथे नवीन अध्याय सुरू करीत असताना, पुणे आणि संभाजीनगर येथे आणखी विस्तार करण्याची आशा फडणवीस यांनी व्यक्त केली. महाराष्ट्रात आणखी बरेच प्रकल्प असल्याचेही त्यांनी सांगितले. ही गुंतवणूक नागपूरच्या बुटीबोरी येथे ॲडव्हान्स्ड मटेरियल्स उत्पादन क्षेत्रात केली जाणार असून, यामुळे ४०० स्थानिक रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. या करारादरम्यान मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव श्रीकर परदेशी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, उद्योग विभागाचे सहसचिव श्रीकांत पुलकुंडवार, ह्युसंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सी इयान ली आदी उपस्थित होते.

**पुणे, छ. संभाजीनगरात कार्यालय**

पुणे येथील कंपनी २०१५ पासून कार्यरत असून, येथे ३५० कर्मचारी आहेत. या कंपनीचे ८४५ कोटी रुपये वार्षिक उत्पन्न आहे. छ. संभाजीनगर येथील औरिक शेंद्रा येथे ही कंपनी २०१८ पासून कार्यरत आहे. येथे ५०० कर्मचारी आहेत. येथे कंपनीचे वार्षिक उत्पन्न १,६५० कोटी रुपये आहे.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/




## एनएमएमएस परीक्षेत पुल्ली प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

सौ. भू. म. पुल्ली कन्या प्रशालेच्या इयत्ता आठवी वर्गात शिकत असलेल्या शांतीप्रिया गोटीपामुल, श्रुती बेत, खुशी माने, आर्या मुळे, भाग्यलक्ष्मी हिरेमठ या विद्यार्थीनींनी केंद्र शासनाकडून घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन केले. शिष्यवृत्ती परीक्षेचे संपर्क अधिकारी परमेश्वर बाबळसुरे, विभाग प्रमुख वैष्णवी मार्गम, श्रीदेवी शिंदे, मंदार जोकारे, चिदानंद बिराजदार यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड श्रीनिवास क्यातम, उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी, सचिव दशरथ गोप, सहसचिव मल्लिकार्जुन सरगम, खजिनदार गोवर्धन कमटम, शालेय समिती अध्यक्ष विजयकुमार गुल्लापल्ली, मुख्याध्यापिका गीता सादुल, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम यांनी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले.

## शास्त्री नगरात गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

शास्त्री नगरात एका ३८ वर्षीय व्यक्तीने अज्ञात कारणावरून साडीच्या सहाय्याने लोखंडी ॲंगला गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना गुरूवारी दुपारी अडीच च्या सुमारास प्लाट नं १३ शास्त्री नगर सोलापूर या ठिकाणी उघडकीस आली. पुनेश गणपत कोकणे (वय ३८ रा. शास्त्रीनगर) असे गळफास घेवून आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. पुनेश यांने गुरुवारी दुपारी अडीच च्या सुमारास अज्ञात कारणावरून घरातील लोखंडी ॲंगला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला. ही घटना नातेवाईकांना कळाली त्यानंतर सदर बझार पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिस घटनास्थळी पोहोचले. सदर मयतास गळफासावरून खाली उतरवले,बेशुध्द आवस्थेत पोलिस कर्मचारी एम.एस नदाफ यांनी बेशुध्द अवस्थेत उपचारासाठी सिव्हिल रुग्णालयात दाखल केले. तो उपचारापूर्वीच मयत झाला होता याची माहिती डॉ. अक्षय ईमडे यांनी दिली याची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत ही झाली आहे. मयताच्या मागे पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे.

# ज्वारी काढणी अंतिम टप्प्यात



### गहू काढणीसाठी यंत्रांचा वाढला वापर

### शासकिय योजनांमुळे मजूर मिळणे अवघड

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी उशिरा पावसामुळे व वाढत्या मजूरीमुळे ज्वारी क्षेत्रात घट झाल्याने ज्वारी उत्पन्नावर परीणाम होत आहे. मात्र वाढत्या मजूरीमुळे व मजुरांच्या टंचाईमुळे दक्षिण तालुक्यात ज्वारी काढणी संथ गतीने सुरू आहे. गहू काढणीसाठी यंत्रांचा वापर मोठया प्रमाणात वाढला असला तरी ज्वारी, हरभरा, मका, करडई यासारख्या पिकांच्या काढणीसाठी मजूर गरजेचे असल्याने महिलांची मजूरी तीनशे ते पाचशे रूपये तर पुरूषांची मजूरी पाचशे ते सातशे रूपयांवर पोहोचली आहे. दक्षिण तालुक्यातील रब्बी हंगामातील पिकांची काढणी अंतिम टप्यात आले असून ऊन्हामुळे पाणी पातळी खाली गेली आहे.

गतवर्षी पोषक हवामान व मुबलक पावसामुळे शेतकर्यांनी मोठया प्रमाणात ज्वारी पेरणी केली होती. मात्र यावर्षी उशिरा सुरू झालेल्या पावसामुळे ज्वारी पेरणी क्षेत्र घटला असुन गहू व हरभरा क्षेत्रात वाढ झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षी ज्वारीचे क्षेत्र ७३ टक्क्यांनी घटले असून शेतकर्यांच्या जनावरांसाठी चार्याच्या प्रश्न उद्भवत आहे. बागायती ज्वारीच्या उत्पन्नावर परीणाम होणार नसले तरी जिरायत ज्वारीचे उत्पन्न मिळणे मुश्किल आहे. मजूरीचे दर वाढल्याने सामुहिकरित्या मजूर एकत्र येऊन काढणी बंद झाले असून दररोज मजूरीवर ज्वारी काढण्यावर मजूरांचा भर दिसून येत आहे. ऊन्हामुळे सकाळी आठ ते दुपारी एक पर्यंत काम करण्यात येते. त्यानंतर अनेक मजूर संध्याकाळी पाच ते सात वाजेपर्यंत काम करताना दिसून येत आहेत. गेल्यावर्षी रब्बी हंगामात पाऊस कमी व नियमित न झाल्याने गव्हाचे पेरणी क्षेत्र घटले होते. मात्र यावर्षी पुरेशा पावसामुळे गव्हाच्या पेरणीक्षेत्रात १४४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. गहू काढणीसाठी पंजाब राज्यातील मोठया यंत्रांचा वापर मोठया प्रमाणात होत असल्याने मजूरांची गरज भासत नाही. यावर्षी गहू पिकाचे उत्पन्नही वाढले आहे. हरभरा पिकांच्या काढणीसाठी महिला व पुरूष मजूरांची गरज असल्याने मजूरीत वाढ करून हरभरा काढणी करण्यात येत आहे. यावर्षी हरभरा पिकाचे १०९ टक्के क्षेत्र वाढले आहे.

मक्यावरील लष्करी आळयाचे प्रादुर्भाव व बाजारातील दर यामुळे मका पेरणीक्षेत्रात घट झाली आहे. गतवर्षीच्या तुलनेत मका पिकाचे क्षेत्र ४४ टक्क्यांनी घटले आहे. दक्षिण तालुक्यात सुपिक व काळी माती असलेल्या परीसरात करडईची पेरणी करण्यात येते. मात्र यावर्षी करडईचे क्षेत्रही घटले आहे. करडई काढणीसाठीही यंत्रांचा वापर करण्यात येत आहे. त्यामुळे मजूरीमध्ये बचत होत आहे. दोन वर्षातील शासनाच्या लाडकी बहीण, शेतकरी सन्मान, रेशन धान्य मोफत, कामगार कल्याण, दिव्यांग निधी यासारख्या योजनांमुळे मजूरांची संख्या घटली आहे. वाढती महागाई व मजूरीचा शेती व्यवसायावर परीणाम झालेला दिसून येतो. शिवाय शेतकर्‍यांच्या शेतीमालाला बाजारात हमीभावापेक्षा कमी भाव मिळत असल्याने शेती नुकसानकारक ठरत आहे. त्यामुळे शेती कसणार्‍यांची संख्या कमी होताना दिसून येत आहे.

**पिकनिहाय घोषवारा**

- गतवर्षाच्या तुलनेत यंदा ज्वारीच्या क्षेत्रात ७३ टक्के घट
- गहू पिकाच्या क्षेत्रात १४५ टक्के वाढ
- हरभरा क्षेत्रात १०९ टक्के वाढ
- मका क्षेत्रात ४४ टक्के घट
- तृणधान्य क्षेत्रात २०५० टक्के वाढ
- कडधान्य क्षेत्रात ८३३ टक्के वाढ
- करडई क्षेत्रात ४ टक्के घट



रब्बी हंगाम काढणी अंतिम टप्यात उशिरा पाऊस झाल्याने यावर्षी ज्वारी क्षेत्रात घट झाले तरी उत्पन्नावर परिणाम नाही. गव्हाच्या क्षेत्रात वाढ झाली असून अपेक्षित उत्पन्नही मिळत आहे. मजूरी वाढल्याने ज्वारी काढणीवर परीणाम होत आहे. दक्षिण तालुक्यात रब्बी हंगामातील पिकांची काढणी अंतिम टप्यात आहे.

**- अवधूत मुळे,**
**तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर**

- महिला मजुरी ३०० ते ५०० रूपये तर पुरूष मजुरी ५०० ते ७०० रूपये
- ज्वारीची मागणी घटल्याने शेतकऱ्यांचे दुर्लक्ष
- गहू पिकाच्या मागणीमुळे पेरणीक्षेत्रात वाढ
- मजुरांची कष्ट करण्याची मानसिकता कमी
- ऊन्हामुळे कामावर परीणाम
- ठेका पध्दत बंद , मजुरी मागणी वाढली
- फेब्रुवारीतच पाणीपातळीत घट
- शासनाच्या योजनांचा मजुरीवर परिणाम
- शासकीय लाभार्थ्यांमध्ये वाढ, मजुरीकडे दुर्लक्ष
- कडब्याचे दर १५ हजार ते २५ हजार रूपयापर्यंत
- शेतीमालाला हमीभावापेक्षा कमी दराने मागणी

### शासकीय योजना मजुरी वाढीस कारणीभूत



दोन वर्षांपासून महिला व पुरूष मजुरीत दोनशे ते तीनशे रूपयांनी वाढ झाली आहे. हरभरा व ज्वारी काढणीसाठी मोठ्या प्रमाणात मजूर लागतात. मजूरीच्या तुलनेत काम होत नसल्याने शेती व्यवसाय करणे त्रासदायक ठरत आहे. शासकीय योजनांनुळे मजूर मिळणे मुश्कील बनले आहे.

**- विक्रांत हविनाळे, शेतकरी**

# महाकुंभ : महाव्यवस्थापनाचा मानदंड!



**त्रिवेणी संगमाच्या जसे जवळ जावे तसे तिथे तर लोकांचा महासागर उसळलेला होता. बरोबरचा माणसाचा एक सेकंद हात सुटला तरी परत सापडणं अवघड, इतकी गर्दी. मात्र प्रशासनाने अनेक ठिकाणी खोया-पाया केंद्र स्थापन केली होती व तेथून होणारी अनाउन्समेंट ही संपूर्ण कुंभ परिसरात ऐकू जाईल अशी ध्वनि यंत्रणा केलेली होती. त्यामुळे हरवलेली एखादी व्यक्ती नेमकी कुठे आहे हे अनाउन्समेंट वरून लगेच लक्षात येत होते. तसेच संगम स्थानी प्रत्येक खांबाला वेगळा नंबर दिलेला होता त्यामुळे आपले पर्जन नेमके कुठे आहेत हे एकमेकांना कळवणे सहज शक्य होत होते. संगमस्थानी खूप मोठ्या प्रमाणात महिलांच्यासाठी कपडे बदलण्याचे बंदिस्त आडोसे तयार केलेले होते. त्यामुळे महिलांची अजिबात गैरसोय होत नव्हती.**

माघी पौर्णिमा, दि.१२ फेब्रुवारी या दिवशी महाकुंभमेळ्यामध्ये जाण्याचा सुयोग मला लाभला, हे माझे भाग्यच! मी श्रद्धावान असलो तरी गर्दीच्या, जत्रेच्या ठिकाणी जाण्याचे मी नेहमी टाळतोच. देवदर्शन हे शक्यतो शांतपणे, मनसोक्त व्हावे असा माझा स्वभाव. मात्र गेले चार-सहा महिने कुंभमेळ्याची तयारी, त्याच्या आयोजनातील अवाढव्यपणा आणि तितकाच नेटकेपणा, परिपूर्णता याविषयी सर्व माध्यमातून जी माहिती मिळत होती, ती पाहता हा अपूर्व योग तर आपण साधायलाच हवा अशी भावना होऊ लागली. परंतु त्याही पेक्षा व्यवस्थापन शास्त्राचा विद्यार्थी म्हणूनही आपण या कुंभमेळ्यात जायला हवे, असा मनाचा निर्धारच झाला.

कुंभमेळ्याविषयी अतिप्रचंड माहिती सर्वत्र उपलब्ध आहे. त्यामुळे त्याविषयी पुनरुक्ती करण्याचा माझा विचार नाही. मात्र व्यवस्थापन शास्त्राच्या दृष्टीकोनातून हा कुंभमेळा म्हणजे जगातील एक अद्भुत आयोजन होते, याबाबत मला कोणतीही शंका उरलेली नाही.


मुळात कुंभमेळ्याचे क्षेत्र अतिशय छोटे, म्हणजे साधारणतः १५ वर्ग किलोमीटर. म्हणजे एखाद्या छोट्या शहरापेक्षाही लहान. तरीही या जागेमध्ये कोट्यावधी लोकांची तात्पुरती व्यवस्था कशी उभारली असेल?

दुसरी गोष्ट म्हणजे कुंभमेळा गंगेच्या व यमुनेच्या संगम क्षेत्रात म्हणजेच पूरक्षेत्रातील वाळवंटामध्ये भरतो. अशा वाळवंटात भुसभुशीत जागेत इतकी प्रचंड व्यवस्था कशी उभी केली असेल? हा ही कुतुहलाचा विषय होता. कारण पावसाळ्यामध्ये या ठिकाणी दोन्ही नद्यांच्या पुराचे १५-२० फूट उंचीचे पाणी भरलेले असते. इतक्या प्रचंड प्रमाणात येणाऱ्या जनसंख्येच्या, दीड दोन महिना टिकतील अशा आवश्यक त्या सर्व व्यवस्था तात्पुरत्या स्वरूपात उभाराव्या लागणार होत्या. यामध्ये या लोकांचा निवास, आहार आणि संडास बाथरूम आदि सर्व शारीरिक गरजा आल्या. हे कसे शक्य होणार? हा देखील मूलभूत प्रश्न होता.

आपल्या महाराष्ट्रातला अनुभव असा आहे की काही लाख लोकांची आषाढी-कार्तिकी वारी ज्या भागातून जाते त्या भागातील गावातील लोक वारीनंतर महिना महिना आपले गाव सोडून दुसरीकडे राहायला जातात. इतकी बिकट अवस्था त्या गावांची होत असते. वारीमध्ये लोक एका जागी एक किंवा फार तर दोन दिवस राहतात. इथे महा कुंभात तर सतत दीड महिना वारीच्या ५० पट जास्ती लोकसंख्या विशिष्ट क्षेत्रात राहणार होती.

या सर्व प्रश्नांना कसे सोडविले याबाबत प्रत्यक्ष पाहूनच मत बनवावे, ही एक भावना महाकुंभाला जाण्यामागे होती.

मी महाकुंभात पोहोचलो तेव्हा मेळा सुरू होऊन सुमारे तीस दिवस झालेले होते. तीस दिवसांमध्ये या क्षेत्रामध्ये ४० कोटी लोक येऊन गेले अशी आकडेवारी सांगत होती. त्यामुळे त्या क्षेत्राच्या जवळ जाताच दुर्गंधीचा प्रचंड सामना करावा लागेल या मानसिक तयारीत मी होतो. त्याचप्रमाणे कचऱ्याचे, प्लास्टिकचे डोंगरच्या डोंगर पाहण्याची देखील मनाची तयारी केलेली होती. परंतु प्रामाणिकपणे सांगतो - यापैकी कोणतेही दृश्य मला कुंभामध्ये दिसले नाही. तात्पुरते उभारलेले हजारो संडास असूनही व ४० कोटी लोकांच्याकडून त्याचा वापर झालेला असूनही परिसरामध्ये नावालाही दुर्गंधी नव्हती. उलट अतिशय प्रसन्न वातावरण होते. कुंभामध्ये तीन दिवस फिरत असताना कचऱ्याचे डोंगर तर सोडाच, कचराच दिसला नाही. सफाई कर्मचारी सातत्याने सफाई करत होतेच, परंतु या करोडो लोकांमध्ये देखील अलीकडच्या काही वर्षातील सरकारच्या प्रयत्नामुळे आलेली स्वच्छतेची जागृती बऱ्याच प्रमाणात जाणवत होती. हजारो संस्था व नागरिकांनी येणाऱ्या भक्तांसाठी विनामूल्य अन्नभंडारे चालवले होते. त्यामुळे भक्तांना अन्नावरती खर्च करण्याची अजिबात गरज नव्हती. भंडाऱ्यांमध्ये बनवले जाणारे जेवण स्वच्छ व सात्विक असल्यामुळे कुणाच्या तब्येती देखील बिघडल्या नाहीत. पूर्व नियोजन केल्यामुळे सर्व भंडार्यांमध्ये स्टीलच्या ताटवाट्या वापरल्या गेल्या. त्यामुळे कागदी व प्लॅस्टिक पत्रावळ्या, पाण्याचे प्लास्टिकचे ग्लास याचेही बिलकुल दर्शन झाले नाही. पिण्याच्या पाण्यासाठी सरकारने जागोजागी विनामूल्य आर ओ वॉटर प्लांट लावलेले होते. त्यामुळे खूप चालायला लागले तरीही लोकांना पाण्यावरती खर्च करावा लागत नव्हता. या करोडो लोकांच्या साठी संडासची व्यवस्था कशी केली असेल हा एक मला मोठा प्रश्न पडलेला होता. पण या परिसरामध्ये सरकारने जी हजारो पक्की तात्पुरती टॉयलेट्स उभारली होती त्यांची सातत्याने सफाईची व्यवस्था केलेली होती. आणि शिवाय सेप्टिक टँक मधील मैला रोजच्यारोज उचलण्यासाठी टँकरची चोख व्यवस्था होती. त्यामुळे सर्व नागरिकांना स्वच्छ, आरोग्यपूर्ण, दुर्गंधीरहित व्यवस्था उपलब्ध झाली व महाकुंभमेळा परिसर निर्मळ व पवित्र राहिला.



**ऑन द स्पॉट रिपोर्ट!**

**श्रीकांत प्रभुदेसाई**
**इचलकरंजी**

गंगा यमुनेच्या दोन्ही तटांवर मेळा असल्याने नदीपलीकडील आखाड्यात जायचे तर मोठा वळसा मारावा लागणार व असलेले पक्के पूल वाहतूक कोंडीमुळे कुचकामी ठरणार, याबाबत सरकारने विचारपूर्वक आधीपासून तयारी केलेली होती. गंगेवर काही नव्या पक्या पुलांची निर्मिती केलेली होतीच. त्या व्यतिरिक्त केवळ या पाच-सात किलोमीटर परिसरात २५ तात्पुरते पूल उभारले होते. मात्र हे तात्पुरते पूल इतके भक्कम होते की त्याच्यावरून ट्रक देखील सुरक्षितपणे जाऊ शकतील. मोठमोठे हवाबंद टँकर नदीपात्रात अंथरून त्यावरून जाड लोखंडी प्लेट्स टाकून तात्पुरते, तरीही पक्के पूल उभारलेले होते. याला पाँटून ब्रिज किंवा स्थानिक भाषेत पीपा पूल असं म्हटलं जात होतं. असा एक पूल तयार करण्यासाठी सुमारे ११० टँकर लागत होते. व असे ३० पूल केलेले होते. यामुळेच सर्व परिसरात येणेजाणे अतिशय सुलभ झाले.

हा सर्व परिसर वालुकामय आहे आणि इतक्या लोकांना ये-जा करण्यासाठी, त्यांच्यासाठी लागणाऱ्या सर्व गरजांच्या साहित्याची वाहतूक करणे यासाठी रस्ते उभारणे हे देखील एक आव्हानच होते. यासाठी सरकारने वापरलेली पद्धत माझ्यासाठी अभिनवच होती. कदाचित अशा प्रकारचे तंत्रज्ञान सैन्यांमध्ये वापरले जात असेल. वाळूमध्ये जाड जाड अशा लोखंडी प्लेट्स अंथरून, त्या प्लेट्स एकमेकांना जोडून मोठमोठे रस्ते तयार केलेले होते. एकेका प्लेटचे वजन तीनशे किलो असेल असे सोबतच्या व्यवसायाने इंजिनीयर असलेल्या मित्राने सांगितले. रस्त्यांसाठी पाच-पंचवीस लाख प्लेट्स चा वापर नक्कीच केला गेला असेल. या प्लेट्स च्या रस्त्यांमुळे या संपूर्ण परिसरात कोठेही एकही वाहन वाळूत किंवा चिखलात रुतलेले व त्यामुळे झालेली वाहतुक अडचण दिसली नाही. प्लेट्स वर येणारी वाळू व त्यातून जाणारे करोडो लोक व जाणारी वाहने यांच्यामुळे परिसरामध्ये धुळीचे साम्राज्य निर्माण होईल हे लक्षात घेऊन दिवसातून ठराविक अंतराने रस्त्यांवर पाणी मारण्याची व्यवस्था केलेली होती. त्यामुळे ही हवाप्रदूषण पूर्णपणे टाळले होते.

महाकुंभ परिसरात एक मोठे रुग्णालय उभारलेले आहे, ज्यामध्ये अतिदक्षता विभाग देखील होता. तेथील सेवा देखील दिवसरात्र व तत्परतेने मिळत होत्या. सामान्य व तज्ञ डॉक्टर्स व आवश्यक तो पॅरामेडिकल स्टाफ, औषधे, सलाईन बॉटलस् आदि सर्वांची पर्याप्त तयारी होती. अनेक रुग्णवाहिका देखील रुग्णसेवेसाठी सज्ज होत्या. जागोजागी अग्निशामक यंत्रणा देखील तयार होती. या परिसरातील सर्व उभारणी कापडी मंडपांच्या सहाय्याने झालेली होती व कोट्यावधी लोकांसाठी दररोज दिवसरात्र अन्न शिजत होते. त्यामुळे कुठेतरी आग लागण्याचा धोका होताच. तशा १ घटना घडल्या सुद्धा. पण पूर्व तयारी मुळे फारशी हानी न होता आग विझवणे शक्य झाले. या परिसरामध्ये रात्री देखील दिवसाप्रमाणे उजेड राहील अशी विद्युत व्यवस्था केलेली होती. या हजारो खांबांची गेल्या दोन-चार महिन्यात उभारणी केली होती असे स्थानिकांकडून कळले. अचानक वीज गेल्यामुळे गोंधळ होणे व त्यामुळे नागरिकांचे अतोनात हाल होणे अशा घटना भारतामध्ये आपण अनेक वेळा बघतो. परंतु अशा प्रकारची एकही घटना कुंभ मेळ्याच्या दीड महिन्यात झाली नाही. प्रचंड गर्दीमुळे शेवटच्या ठिकाणापर्यंत मोठी वाहने सोडणे अशक्यच होते. मात्र मोठ्या प्रमाणात ई-रिक्षा उपलब्ध होत्या. त्यांच्यामुळे लोकांची मोठी सोय होत होती आणि ध्वनी व वायू प्रदूषण ही टळत होते. याहीपेक्षा एक अभिनव गोष्ट म्हणजे प्रशासनाने स्थानिक युवकांना लोकांची ने-आण करण्याची परवानगी दिली असावी (कदाचित अनधिकृतपणे). असे हजारो स्थानिक तरुण आपल्या मोटारसायकलसह दिवसरात्र राबत होते. त्यामुळे या युवकांना चांगला रोजगार मिळालाच व लोकांची ही मोठी सोय झाली. विविध प्रांतातून करोडो लोक येणार म्हणजे लाखो वाहने येणार हे तर सरळच आहे. या लाखो वाहनांना आवश्यक ते डिझेल-पेट्रोल केवळ या दीड महिन्याच्या काळात कैकपट अधीक प्रमाणात उपलब्ध करणे ही देखील फार मोठी व्यवस्था होती. याबाबत ही कोणत्याही वाहनाची गैरसोय झाली नाही. इतक्या लोकांच्यासाठी लागणारे अन्न तयार करायचे तर त्यासाठी आवश्यक ते सर्व अन्नधान्य, भाजीपाला, तेल, गॅस या सर्वांचा साठा किती आधीपासून उपलब्ध करून ठेवावा लागला असेल. कारण पूर्ण भारताच्या सुमारे ४०% लोक हे केवळ दीड महिना कालावधीमध्ये या भागात येऊन गेले. सामान्य काळापेक्षा हजारपट जास्त सर्व गोष्टी प्रयागराज-काशी-अयोध्या या परिसरात लागल्या. परंतु या कालावधीमध्ये आलेल्या प्रवाशांना कोणतीही गोष्ट मिळाली नाही असं झालं नाही. यासाठी किती आधी नियोजन करून ठेवावं लागलं असेल! साखर, चहा, दूध, बिस्किटे, पाण्याच्या बाटल्या, गॅस, सिलेंडर, अशा शेकडो गोष्टींचे विचारपूर्वक पूर्व नियोजन केले गेले होते. त्यामुळे हा दीड महिना इतक्या प्रचंड लोकसंख्येचा भार या परिसराने यशस्वीपणे पेलला. केवळ पेलला नाही, तर या संधीचे प्रत्येक व्यावसायिकाने सोने करून घेतले. कोणतीच गोष्ट अनाठाई अधिक दराने विकली गेली नाही मात्र भरपूर प्रमाणात विक्री झाल्यामुळे त्या भागातील व्यवसायिकांनी दोन-तीन वर्षाची कमाई या दीड महिन्यात नक्कीच केली. आणि ती सुद्धा येणाऱ्या भाविकांना समाधान वाटेल अशा पद्धतीने!

भक्तांच्या माथी कुमकुम टिळक लावणारे, चहा विक्री करणारे, भेळ चाट चे विक्रेते, रिक्षावाले, रस्त्यातील दुकानदार, हॉटेल्स, पेट्रोल पंप, वाहन दुरुस्ती करणारे इत्यादी सर्व व्यावसायिकांनी आपल्या क्षमतेची परीक्षा पाहणारे काम केले व भरभरून कमाई देखील केली. विश्वातल्या कल्पनेपेक्षाही प्रचंड मोठ्या अशा अभूतपूर्व मेळ्याचे आयोजन हा खरोखरच यापुढे जागतिक विद्यापीठांमध्ये अभ्यासाचा व कौतुकाचा विषय राहणार आहे, हे निश्चितच.

कुंभमेळा यशस्वी झाला हे तर सांगण्याची गरज नाहीच. परंतु या कुंभमेळ्यामुळे भारतातल्या सर्व प्रकारच्या धार्मिक आयोजनांमध्ये नक्कीच मोठ्या प्रमाणात बदल होतील. सर्व ठिकाणी या कुंभमेळ्यातल्या आदर्शांप्रमाणे व्यवस्था ठेवण्याचे प्रयत्न होतील. त्यामुळे भक्तांची देखील सोय होईल. धार्मिक श्रद्धेला मोठे पाठबळ मिळेलच, परंतु एकंदरीत भारतभर धार्मिक पर्यटनामुळे व धार्मिक मेळ्यांच्यामुळे अर्थव्यवस्थेला प्रचंड प्रमाणात चालना मिळेल असा माझा अंदाज आहे. या कुंभ मेळ्यामध्ये मुळे केवळ प्रयागराज मध्ये दीड महिन्यात तीन लाख कोटी रुपयाची उलाढाल झाली. संपूर्ण भारतभरातून आलेले प्रवासी पाहता भारतभरात याच्या अनेक पट जास्त उलाढाल या कुंभमेळ्यामुळे झाली. याचा परिणाम म्हणून यावर्षीचा भारताचा विकासदर एक टक्क्यांनी वाढलेला दिसला तर अजिबात आश्चर्य वाटायला नको. तेच पोलीस, तेच सरकारी अधिकारी, तेच सरकारी कर्मचारी आणि तेच नागरिक! मात्र नेतृत्व विचारी, विश्वासार्ह व क्रियाशील असेल तर किती मोठा बदल घडू शकतो, याचे हा महाकुंभ हे मोठे उदाहरण आहे.

यामध्ये मुद्दाम उल्लेख करायला हवा अशी जाणवलेली आणखी एक गोष्ट. एकाच वेळी, एकाच ठिकाणी करोडो लोक जमले तर केवळ पोलीस व सरकारी कर्मचारी यांच्या बळावर त्यांना अनुशासित करणे केवळ अशक्य असते. यातूनच अनेक दुर्घटना घडतात. परंतु येथे आलेला सर्व जनसमुदाय हा मुळातच एका धार्मिक उद्देशाने आलेला होता व आपल्याकडून कोणतीही गैर वर्तणूक होणार नाही व आपण पापाचे धनी होणार नाही याची काळजी घेत होता. तसे त्यानां वारंवार आवाहन केले जात होते. पोलीस, सरकारी कर्मचारी हे अथकपणे, उत्तम काम करतच होते. मात्र जमलेल्या भक्तजनांपैकी गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, सर्व जातीपंथांतील लोक हे स्वतःहून चांगले वर्तन करत हा धार्मिक सोहळ्याचा आनंद उपभोगत होते. हे देखील या महाकुंभाच्या सफलते मागील एक महत्त्वाचे कारण आहे, जे भारताच्या इतिहासातील पूर्वानुभव पाहता अनोखे आहे. फार महत्त्वाचे आहे. उद्या महाकुंभाचे पाचवे व शेवटचे स्नान संपेल तेंव्हा ६६कोटी भाविक प्रयागराज मध्ये येऊन गेलेले असतील. हे वर्षभर आणखीन कैक कोटी भाविक येत रहातील. व हिंदू धर्माकडून एक वैश्विक इतिहास रचला गेला असेल. २९ जानेवारी रोजी झालेली दुर्घटना हा या कुंभाच्या आयोजनाला लागलेला एक कलंक आहे हे नक्कीच. त्यासाठी नेमके कोण दोषी होते हे शोधून त्यांना योग्य ती शिक्षा दिली जाईलच. परंतु ही घटना वगळता कुंभमेळ्यामध्ये सर्वांचे अनुभव चांगलेच आहेत हे उल्लेखनीय!

**जय गंगे! जय यमुने! जय सरस्वती!**
**जय श्रीराम! जय काशीविश्वनाथ!**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पाकिस्तान विदेशी तुकड्यांवर जगणारा देश

### संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रत्युत्तर

◆ **जीनेव्हा, २७ फेब्रुवारी**

पाकिस्तान हा विदेशी तुकड्यांवर टिकून राहणारा देश आहे. हा अपयशी देश त्यांच्या लष्करी-दहशतवादी संरचनेने समोर केलेल्या खोट्या गोष्टी पसरवण्यात धन्यता मानतो, असे धडाकेबाज उत्तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार परिषदेत जम्मू-काश्मीरचे तुणतुणे वाजवणाऱ्या पाकिस्तानला भारताने दिले आहे.

संयुक्त रा।ष्ट्रसंघात नेहमीप्रमाणे पाकिस्तानने जम्मू-काश्मीरचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर भारताने बुधवारी जीनेव्हा येथे झालेल्या मानवाधिकार परिषदेच्या ५८ व्या नियमित सत्रातील उच्चस्तरीय बैठकीत पाकिस्तानला त्याची जागा दाखवण्यासाठी आपला प्रत्युत्तराचा अधिकार वापरला.

पाकिस्तानने केलेल्या निराधार आणि दुर्भावनापूर्ण आरोपांना उत्तर देण्यासाठी भारताने प्रत्युत्तराचा वापर केला. पाकिस्तानचे तथाकथित नेते आणि प्रतिनिधी त्यांच्या लष्करी-दहशतवादी संरचनेने समोर केलेला खोटेपणा कर्तव्यदक्षतेने पसरवत आहेत, हे अत्यंत खेदजनक आहे, पण आश्चर्यकारक नाही, असे संयुक्त राष्ट्रसंघातील भारताचे स्थायी मिशनचे सल्लागार क्षितीज त्यागी म्हणाले.

या परिषदेचा वेळ अस्थिरतेवर भरभराटीला येणाऱ्या आणि विदेशी तुकड्यांवर टिकून राहणाऱ्या अपयशी देशाकडून वाया जात आहे, हे पाहणे अत्यंत दुर्दैवी आहे.

त्यांच्या वक्तव्यातून ढोंगीपणाचा, त्यांच्या कृतीतून अमानुषतेचा आणि त्यांच्या प्रशासनातून अक्षमतेचा वास येत आहे, असे त्यागी यांनी सांगितले.

जम्मू-काश्मीर आणि लडाख हे केंद्रशासित प्रदेश भारताचा अविभाज्य भाग होते आणि ते कायम राहतील, असे ठामपणे सांगताना, मागील काही वर्षांत जम्मू-काश्मीरमध्ये झालेली अभूतपूर्व राजकीय आणि आर्थिक प्रगती स्वतःच बोलत असल्याचे स्पष्ट केले.

हे यश म्हणजे दशकांपासून पाकिस्तान पुरस्कृत सीमापार दहशतवादाने त्रस्त असलेल्या प्रदेशात सामान्यता आणण्याच्या सरकारच्या वचनबद्धतेवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक आहे, असे त्यागी म्हणाले.

◂ (वृत्तसंस्था)

#### ‘आयओसी’ची उडवतोय् खिल्ली

इस्लामिक सहकार्य संघटनेचा (आयओसी) गैरवापर करून पाकिस्तान त्याची खिल्ली उडवत आहे आणि या संघटनेला आपले मुखपत्र म्हणून त्याचा गैरवापर करीत आहे. कोणत्याही अपप्रचाराला प्रोत्साहन देण्याची आमची इच्छा नाही. मात्र, काही गोष्टी रेकॉर्डवर आणायसाठी बोलाव्या लागतात, असे भारताने स्पष्ट केले.

#### निर्लज्ज पाकिस्तानला गप्पा करायचा अधिकार नाही

जिथे मानवी हक्कांचे उल्लंघन, अल्पसंख्यकांचा छळ आणि लोकशाही मूल्यांचे पद्धतशीरपणे ऱ्हास करणे ही देशाची धोरणे आहेत आणि जो संयुक्त राष्ट्रसंघांनी बंदी घातलेल्या अतिरेक्यांना निर्लज्जपणे आश्रय देतो, त्या पाकिस्तानला मोठ्या गप्पा करण्याचा कोणताही अधिकार नाही, अशा शब्दांत त्यागी यांनी पाकिस्तानचा समाचार घेतला.

# बसस्थानक, आगारांचे सुरक्षा परीक्षण

### ▸▸परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

**मुंबई, २७ फेब्रुवारी-**

राज्यातील सर्वच बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा परीक्षण करण्यात यावे. तसेच बसस्थानक व आगारांमध्ये असलेल्या निर्लेखित बसेस व परिवहन कार्यालयांकडून कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांचे १५ एप्रिलपर्यंत निष्कासन करण्याचा निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला.

महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याच्या सूचनाही सरनाईक यांनी दिल्या. बसस्थानकांमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षा विषयक आढावा बैठक अपर मुख्य सचिवांच्या दालनात झाली. बसस्थानक परिसरातील निर्लेखित बसेस निष्कासनासाठी विहित कालावधी निश्चित करून १५ एप्रिलपर्यंत ही कार्यवाही पूर्ण करण्यात यावी. राज्य परिवहन महामंडळाकडे मुख्य सुरक्षा व

दक्षता अधिकारी पद असून, या रिक्त पदावर भारतीय पोलीस सेवेतील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. याबाबत प्रस्ताव गृह विभागाला विनाविलंब सादर करण्याच्या सूचना सरनाईक यांनी दिल्या. सरनाईक म्हणाले, राज्यभरात सर्वच एसटी बसस्थानके व आगारांमध्ये सीसीटीव्हीची 'एआय' तंत्रज्ञानावर आधारित अद्ययावत यंत्रणा उभारण्यात यावी. नवीन बसेसमध्ये सीसीटीव्ही बसविण्यात यावे. बसेसमध्ये जीपीएस यंत्रणा बसविण्याचे काम गतीने पूर्ण

करण्यात यावे. पोलिसांची मदतीने बसस्थानकात गस्त वाढवण्यात यावी, आगार व्यवस्थापक हे त्या आगाराचे पालक असल्यामुळे त्यांनी तेथील निवासस्थानामध्येच वास्तव्य करावे. जेणेकरून २४ तास त्यांच्या निरीक्षणाखाली आगाराचे व्यवस्थापन चालेल. याबरोबरच बसस्थानकावर काम करणाऱ्या प्रत्येक एसटी कर्मचाऱ्याला ओळखपत्र देण्यात यावे, जेणेकरून कर्मचारी असल्याचे भासवून प्रवाशांना कोणी लुबाडणार नाही.

# यूएसएडमधील ९० टक्के विदेशी मदतीत कपात

### ट्रम्प प्रशासनाची माहिती

◆ **वॉशिंग्टन, २७ फेब्रुवारी**

आंतरराष्ट्रीय विकासासाठी अमेरिकी संस्थेचा ९० टक्क्यांपेक्षा जास्त विदेशी मदत करार रद्द केला जात आहे तसेच जगभरात ६० अब्ज डॉलर्सच्या निधीतून केली जाणारी मदतही बंद करण्यात आली, अशी माहिती ट्रम्प प्रशासनाने दिली.

प्रशासनाने मोठ्या प्रमाणात केलेल्या कपातीमुळे यूएसएडच्या काही निवडक योजना सुरू राहतील. असोसिएटेड प्रेसने मिळवलेल्या काही अंतर्गत दस्तावेजांनुसार दाखल केलेल्या संघीय खटल्यात प्रशासनाने आपल्या योजनांची रूपरेषा मांडली आहे.

बुधवारी रात्री उशिरा सर्वोच्च न्यायालयाने यात हस्तक्षेप केला आणि मध्यरात्रीपर्यंत प्रशासनाला अब्जावधी डॉलर्सचा परदेशी मदत निधी जाहीर करण्याचा दिलेला आदेश तात्पुरता रोखला. बुधवारी झालेल्या खुलाशांवरून अमेरिकेच्या विदेशातील मदत आणि विकास मदतीपासून प्रशासनाच्या माघारीची कल्पना येते आणि अमेरिकेच्या दशकांच्या धोरणाच्या धोरणावरून असे दिसून येते की, विदेशी मदत इतर देशांना आणि अर्थव्यवस्थांना स्थिर करून आणि आघाडी करून अमेरिकेच्या हितांना मदत करते.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि त्यांचे सहयोगी एलन मस्क यांनी संघराज्य सरकारचा आकार कमी करण्याच्या त्यांच्या प्रयत्नात विदेशी मदतीवर अत्यंत कठोर आणि वेगाने हल्ले केले आहेत.

◂ (वृत्तसंस्था)

# ट्रम्प सरकारचे धोरण अमेरिकेसाठी घातक

## डेमोक्रॅटचा आरोप, हवामान बदलाच्या दुर्लक्षावर आक्षेप

◆ **वॉशिंग्टन, २७ फेब्रुवारी**

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गेल्या महिनाभरात निर्णयाचा धडाका सुरू करीत माजी राष्ट्राध्यक्ष ज्यो बायडेन यांच्या निर्णयांना छेद देत परराष्ट्र आणि देशांतर्गत धोरणात अनेक बदल केले. यावर विरोधी पक्ष डेमोक्रॅटने आक्षेप घेत काँग्रेसमध्ये बुधवारी ठराव मांडला. ट्रम्प सरकारचे धोरण अमेरिकेसाठी घातक असून, तेल आणि वायू निर्यातीला प्रोत्साहन दिल्याने देशात प्रदूषणाची समस्या निर्माण होईल, त्यातच हवामान बदलाकडे दुर्लक्ष करणारे ट्रम्प यांचे धोरण देशासाठी मारक ठरणार असल्याचा आरोप डेमोक्रॅट पक्षाने केला. मात्र, हा ठराव ५२-४७ मतांनी फेटाळून लावण्यात आला.

ट्रम्प यांच्या धोरणावर आक्षेप घेत डेमोक्रॅट पक्षाचे खासदार टिम केन म्हणाले, बायडेन यांनी हवामान बदल आणि अक्षय ऊर्जेसाठी आणलेल्या योजना रद्द करीत जीवाश्न इंधनावर लक्ष केंद्रीत करणे तापमान वाढीला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. एकंदरीत ट्रम्प यांचे धोरण ड्रिल बेबी ड्रिल सारखे आहे. पर्यावरणाकडे करण्यात आलेले दुर्लक्ष भविष्यात अमेरिकेसाठी मोठी नैसर्गिक समस्या निर्माण करू शकते. अमेरिकेत नैसर्गिक वायू व तेलाचे इतर देशांपेक्षा अधिक साठे असतानाही पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी बायडेन सरकारने अक्षय ऊर्जेला प्राधान्य दिले होते. मात्र, ट्रम्प यांनी त्यांच्या धोरणात बदल करीत पर्यावरणाला नुकसान पोहोचविणारे निर्णय घेतले, ही चिंतेची बाब आहे. नव्या धोरणामुळे महागाई कमी करणे आणि रोजगारवाढीला चालना देण्याचा ट्रम्प यांचा दावा खोटा आहे. पृथ्वीचे तापमान वाढत असून, त्यावर उपाययोजना म्हणून इतर देश अक्षय ऊर्जेच्या वापरावर अधिक खर्च करीत असताना ट्रम्प सरकार मात्र तेल आणि वायूच्या निर्यातीवर प्राधान्य देत आहे. दरम्यान ट्रम्प यांच्या धोरणाविरोधात मांडलेला ठराव ५२-४७ मतांनी फेटाळून लावण्यात आला

#### बायडेन यांच्या निर्णयामुळे विकासाला फटका

पर्यावरण संरक्षणासाठी उपाययोजना करण्याचे आवाहन यावेळी डेमोक्रॅटकडून करण्यात आले. प्रदूषणाला आळा घालण्यासाठी माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी लागू केलेल्या धोरणात बदल करू नये, अशी मागणी केली. यावर रिपब्लिकन पक्षाने बाजू मांडत सांगितले की, पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी मागील सरकारने लावलेल्या निर्बंधामुळे अनेक प्रकल्प थांबले, यामुळे देशाचा विकासाला फटका बसला. तेल व वायूची निर्यात करण्याची क्षमता असतानाही त्याकडे दुर्लक्ष झाल्याने व्यापारात तूट निर्माण झाली. .

◂ (वृत्तसंस्था)

#### नैसर्गिक आपत्तीचा धोका वाढणार

ट्रम्प यांनी पवन ऊर्जा प्रकल्पांच्या मान्यता रोखण्यासह कर्ज न देण्याचा घेतलेला निर्णय अयोग्य आहे. सौर ऊर्जासारख्या प्रकल्पांवरदेखील बंधने आणली आहेत. कोळसा,वायू आणि तेल उत्पादनावर देण्यात आलेला भर पर्यावरण संरक्षणाला बाधा पोहोचविणारा आहे. ट्रम्प यांच्या धोरणामुळे कार्बन उत्सर्जन वाढून जागतिक संघटनांनी आखून दिलेल्या नियमांचे उल्लंघन होणार असून, यामुळे अमेरिकेत मोठी नैसर्गिक आपत्ती येण्याचा धोका वाढणार असल्याचेटिम केन यांनी सांगितले.

### मणिपुरात दोन बंडखोरांना अटक

◆ **इम्फाळ, २७ फेब्रुवारी**

खंडणी वसुलीच्या आरोपाखाली मणिपुरातील प्रतिबंधित संघटनांच्या दोन सदस्यांना अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली.

पश्चिम इम्फाळ जिल्ह्यातील सिंगजामेई मखा काकवा असेम लीकाई येथून प्रतिबंधित संघटना प्रेपाकच्या (पीआरओ) एका कॅडरला अटक करण्यात आली. सपम जेम्सबॉण्ड असे अटक केलेल्या बंडखोराचे नाव आहे. तो लोकांकडून, सरकारी कार्यालये, सरपंच, व्यावसायिक आणि दुकानदारांकडून थेट खंडणी वसुली करायचा. त्याच्या ताब्यातून दोन मोबाईल जप्त करण्यात आले.

पोलिसांनी कांग्ले यावोल कान्ना लुप या प्रतिबंधित संघटनेच्या सक्रिय सदस्याला पश्चिम इम्फाळच्या विमानतळावरून बुधवारी अटक केली. ◂ (वृत्तसंस्था)



सुमारे दीड महिना चाललेल्या महाकुंभ मेळ्याची बुधवारी सांगता झाली. यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि उपमुख्यमंत्रिद्वय ब्रजेश पाठक व केशव प्रसाद मौर्य यांनी स्वतः हातात झाडू घेऊन या परिसरात स्वच्छता मोहीम सुरू केली

### विवेक रामास्वामी यांना गव्हर्नरपदासाठी उमेदवारी

◆ **वॉशिंग्टन, २७ फेब्रुवारी**

भारतीय वंशाचे उद्योजक आणि राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कट्टर समर्थक असलेले विवेक रामास्वामी यांना ओहायोच्या गव्हर्नरपदासाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली. ही निवडणूक जिंकल्यास ते अमेरिकेतील भारतीय वंशाचे तिसरे गव्हर्नर ठरतील. याआधी बॉबी जिंदाल आणि निक्की हेली (दक्षिण कॅरोलिना) हे गव्हर्नर राहिले आहेत.

या निवडणुकीत रामास्वामी यांना ट्रम्प आणि एलन मस्क या दोघांचाही पाठिंबा आहे. रामास्वामी यांनी त्यांच्या निवडणूक आश्वासनांमध्ये राज्यातील आयकर आणि मालमत्ता कर रद्द करण्याची घोषणा केली आहे. ओहायोमधील त्यांच्या निवडणूक भाषणांमुळे रामास्वामी यांची लोकप्रियताही वाढत आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या निवडणुकीत रामास्वामी यांनी ट्रम्प यांना पाठिंबा दिला होता. ट्रम्प यांनी त्यांच्या समाज माध्यम खात्यावर लिहिले की, विवेक तरुण, बलवान आणि हुशार आहेत. त ओहायोचे एक चांगले गव्हर्नर होतील आणि लोकांना कधीही निराश करणार नाहीत. त्यांना माझा पूर्ण पाठिंबा आहे.

रिपब्लिकन प्रायमरीमध्ये त्यांचा सामना ओहायोचे ॲटर्नी जनरल डेव्ह योस्ट आणि कृष्णवर्णीय उद्योजक हीदर हिल यांच्याशी होईल.

# हॉटेल, ढाब्यांवर थांबणाऱ्या एसटी बससाठी नियमावली तयार करा

### ● ‘स्वारगेट’ घटनेच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचे आदेश

**अहिल्यानगर, दि. २७ फेब्रुवारी-**

महामार्गांवरील खासगी हॉटेल, ढाब्यांवर थांबणाऱ्या एसटी बससाठी नियमावली तयार करा, ढाब्यांसाठी नियमावली लागू करा, सर्व बसस्थानकात सीसीटीव्ही बसवा, एसटी व पोलिस अधिकाऱ्यांच्या संपर्क क्रमांकाचे फलक लावा, जिल्ह्यातील सर्व आगारांची पाहणी करा, अशा सूचना जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आज, गुरुवारी एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांना ‘स्वारगेट’ (पुणे) घटनेच्या पार्श्वभूमीवर महामंडळाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

अहिल्यानगर जिल्ह्यातील एसटी महामंडळाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी आज बैठक आयोजित केली होती. प्रादेशिक व्यवस्थापक अमृता ताम्हणकर, विभाग नियंत्रक राजेंद्र जगताप, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, अतिरिक्त जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, भाजपचे ज्येष्ठ नेते विनायक देशमुख, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग व नितीन दिनकर आदी उपस्थित होते. लांब पल्ल्याच्या एसटी बस महामार्गांवरील खाजगी ढाबे, हॉटेलवर थांबतात. त्यांच्यासाठी नियमावली तयार करा. ढाबेचालक नियमालांचे पालन करतात की नाही, प्रवाशांना सुविधा मिळतात की नाही याची तपासणी करा. तेथील स्वच्छतागृह, सुरक्षेचे वातावरण प्रवाशांसाठी योग्य आहे की नाही याची पाहणी करा, अन्यथा वरिष्ठांनी मंजूरी दिली, चालकांना मोफत जेवणाची ‘पॅकेज’ मिळते परंतु प्रवाशांना काय मिळते; तेही पहा, असेही मंत्री विखे यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील आगारांची तपासणी करा, तेथील बंद गाड्या तपासणीची मोहीम घ्या, सीसीटीव्ही कॅमेरे पोलीस ठाण्याची जोडा, सौर प्रकल्प उभारून बसस्थानकात दिव्यांची व्यवस्था करा, अशाही सूचना त्यांनी दिल्या. जिल्ह्यातील बसस्थानक राज्य सरकारच्या निधीतून उभारण्याऐवजी, त्यावर अवलंबून राहण्याऐवजी ‘बीओटी’ची प्रकल्प तयार करा. त्या माध्यमातून एसटी महामंडळाचे उत्पन्नही वाढेल. जिल्ह्यात सध्या अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरू आहे. आम्ही अतिक्रमणे हटवतो, मात्र बसस्थानकांभोवतीलच्या अतिक्रमणांकडेही महामंडळाने लक्ष द्यावे, असेही निर्देश त्यांनी दिले. जिल्ह्यातील कामकाजाचा आढावा घेण्यासाठी पुढील महिन्यात मुंबईत बैठक आयोजित केली जाईल असेही स्पष्ट केले.



# पीएफ, इएसआयच्या मागणीसाठी घंटागाडी कामगारांनी केले काम बंद

### ▸▸अधिकाऱ्यांच्या सूचनेनंतर दोन तासात आंदोलन मागे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

मक्तेदाराकडून भविष्य निर्वाह निधी आणि कामगार विमा योजनेचा लाभ मिळत नसल्याचा आरोप करत महापालिकेतील घंटागाडी कामगारांनी आज सकाळी काम बंद ठेवले. झोन कार्यालयासमोर एकत्र येवून काम बंद आंदोलन केले. दरम्यान, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी तत्काळ संबंधित कामगारांशी चर्चा केली. मक्तेदाराला सूचना दिल्या आणि दोन तासात कामगारांनी आंदोलन मागे घेतले.

सोलापूर शहरातील कचरा संकलनाचे काम घंटागाडी कामगारांकडून केले जाते. मक्तेदारामार्फत हे काम करण्यात येते. दरम्यान, मक्तेदाराने घंटागाडी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी , पीएफ आणि ईएसआय योजनेच्या रकमा भरल्या नाहीत असा आरोप करत त्या भरल्यास घंटागाडी कामगारांना अडचणीच्या काळात मदत होणार आहे. विमा हॉस्पिटलमध्ये उपचार मिळू शकणार आहेत. मात्र रक्कम न भरल्याने या सोयी सुविधा घंटागाडी कामगारांना मिळू शकत नाहीत. तातडीने या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात या मागणीसाठी आज बुधवारी सकाळी ६.३० वाजल्यापासूनच काम बंद ठेवले. झोन क्रमांक ४ व ८ या ठिकाणी घंटागाडी कामगारांनी एकत्र येऊन काम बंद आंदोलन केले.

दरम्यान, याची माहिती मिळताच अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार सूचना दिल्या. मुख्य सफाई अधीक्षक बिराजदार यांनी तत्काळ झोन कार्यालयात जाऊन संबंधित कामगारांशी चर्चा केली. संबंधित मक्तेदारांच्या प्रतिनिधींना बोलवून घेऊन सूचना दिल्या. आश्वासन दिल्यानंतर अखेर दोन तासांनी हे आंदोलन मागे घेण्यात आले. त्यानंतर घंटागाडी द्वारे शहरातील कचरा संकलनाचे काम पूर्ववत सुरू करण्यात आले.



# नॅशनल हेराल्ड प्रकरणाच्या सुनावणीवरील स्थगिती वाढवली

**नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी-**

काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतरांचा सहभाग असलेल्या नॅशनल हेराल्ड प्रकरणी सत्र न्यायालयात सुरु असलेल्या सुनावणीवरील स्थगिती दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी वाढवली.

भाजपाचे माजी खासदार सुब्रमण्यम् स्वामी यांनी दाखल केलेल्या याचिकेवरील सुनावणी न्या. विकास महाजन यांनी २८ जुलैपर्यंत पुढे ढकलली आहे. या प्रकरणातील पक्ष आपला लेखी युक्तिवाद सत्र न्यायालयात सादर करणे अपेक्षित असून, त्यात काही पुरावे सादर केले जाणार आहेत. लेखी युक्तिवाद सादर करण्यासाठी स्वामी आणि गांधी कुटुंबीयांच्या वतीने युक्तिवाद करणारे ज्येष्ठ वकील आर. एस. चीमा यांनी मुदत मागितली. या प्रकरणाच्या तपासावर कोणतीही स्थगिती दिली जाऊ नये, अशी भूमिका स्वामी यांनी घेतली. मात्र, हे प्रकरण खाजगी तक्रारीतून पुढे आले आहे आणि अशा प्रकारचा कोणताही तपास करण्यात आलेला नाही, असा युक्तिवाद चीमा आणि त्यांच्या सहकारी तरन्नुम चीमा यांनी केला.

असोसिएटेड जर्नलची मालकी असलेल्या नॅशनल हेराल्डने काँग्रेसला देय असलेली ९०.२५ कोटी रुपयांच्या वसुलीचा अधिकार गांधी कुटुंबीयांनी कट रचत तसेच फसवणूक करीत व यंग इंडियन प्रा. लि. च्या माध्यमातून केवळ ५० लाख रुपयांत घेतला, असा आरोप स्वामी यांनी गांधी कुटुंब व इतरांवर केला आहे.

### बिश्नोई टोळीतील गुन्हेगाराचा खात्मा

◆ **मेरठ, २७ फेब्रुवारी**

उत्तरप्रदेशच्या मेरठमध्ये बुधवारी पहाटे चकमक झाली. यात लॉरेन्स बिश्नोई टोळीचा गुंड जितेंद्र उर्फ जितू ठार झाला. नोएडा पोलिसांच्या विशेष कृती दल (एसटीएफ) आणि स्थानिक पोलिसांनी संयुक्तपणे ही कारवाई केली. गाझियाबाद पोलिसांनी जितेंद्रवर १ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. तुरुंगातून पॅरोलवर बाहेर आल्यानंतर तो पसार झाला होता. त्याला न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मागील दोन वर्षांपासून पसार असलेल्या जितेंद्रने मेरठच्या मुंडली पोलिस स्टेशन परिसरात आश्रय घेतला असल्याची माहिती एसटीएफला मिळाली. पहाटे एसटीएफ आणि स्थानिक पोलिसांनी परिसराला घेरले. जितेंद्रला आत्मसमर्पण करण्याचे आवाहन करण्यात आले; पण त्याने गोळीबार केला. पोलिसांनी प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात तो गंभीर जखमी झाला.

◂ (वृत्तसंस्था)

# भारतासोबत आर्थिक संबंध वाढवण्यावर भर

### ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानिझ यांचे मत

◆ **मेलबर्न, २७ फेब्रुवारी**

प्रदूषणविरहित ऊर्जा, शिक्षण व कौशल्ये, कृषिउद्योग आणि पर्यटन या विकासाच्या चार क्षेत्रांमध्ये भारतासोबतचे व्यापारी आणि गुंतवणूक संबंध अधिक दृढ करणार असल्याचे ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानिझ यांनी म्हटले आहे.

मेलबर्नच्या डीकिन विद्यापीठामध्ये बुधवारी ‘रोडमॅप ऑफ ऑस्ट्रेलियाज इकॉनॉमिक एंगेजमेंट विथ इंडिया’ या विषयावर बोलताना अल्बानिझ म्हणाले, भारतासोबत आर्थिक संबंध वाढवण्यासाठी हीच योग्य वेळ आहे. जागतिक पातळीवर भारत सध्या सर्वांत मोठा देश आहे. तेथील सरकारचे धोरण व्यापारासाठी पूरक असून, त्याचे स्थान अधिकच उंचावत आहे. या दशकाच्या अखेरीस भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होईल, याचा मला पूर्ण विश्वास आहे. भारताची आर्थिक वाढ ऑस्ट्रेलियाच्या अर्थव्यवस्थेला पूरक आहे. भारताच्या आर्थिक वाढीतून निर्माण होणारा प्रचंड व्यापार आणि गुंतवणुकीच्या संधी हस्तगत करण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे धोरण आहे. भारतासोबत व्यापार वाढल्यास ऑस्ट्रेलियाला पुरवठा साखळी सुरक्षित राखण्यास मदत होईल.

याशिवाय रोजगारनिर्मिती वाढणार असल्याचा विश्वास ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी व्यक्त केला. भारत आणि ऑस्ट्रेलियादरम्यान आर्थिक सहकार्य आणि व्यापार करार झाल्यानंतर दोन वर्षांनंतर ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी व्यक्त केलेले मत भारतावर वाढलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.

◂ (वृत्तसंस्था)

### अग्रलेख

# संस्कृतीसोबत समृद्धीकडे...

समाजाचे मानसिक स्वास्थ्य सांभाळायचे असेल, तर त्याच्या संवेदनांची कदर केली पाहिजे, अशी आपल्या संस्कृतीची शिकवण आहे. पुराणकाळातील अनेक कथांमधून याचे पुरावे मिळतात. अन्यथा, कोणा सामान्य नागरिकाने व्यक्त केलेल्या केवळ शंकेवरून प्रभू रामचंद्रांनी पतिव्रता सीतेस अग्निपरीक्षा देऊन स्वतःचे पावित्र्य सिद्ध करण्यास सांगितले नसते. या कृतीमुळे समाजाच्या मनातील शंका दूर झाल्या आणि रामराज्याच्या संकल्पनेची उंची अधिक वाढली. राज्यकर्त्यांनी नेहमीच संशयातीत असले पाहिजे, असा जो संकेत दृढ झाला आहे, त्यामागेदेखील समाजाच्या संवेदनांची जाणीव हेच महत्त्वाचे कारण आहे. म्हणूनच रामराज्याच्या कल्पनेने केवळ सत्ता गाजविणे एवढेच अभिप्रेत नाही, तर धर्माचरणही तितकेच महत्त्वाचे मानले गेले आहे. धर्मसत्ता आणि राजसत्ता या एकाच नाण्याच्या दोन बाजू, एकाच रथाची दोन चाके आहेत वगैरे म्हटले जाते. रामराज्यात या दोन सत्ता हातात हात घालून समाजाच्या संवेदनांचा आदर करत वाटचाल करीत होत्या, म्हणून सामाजिक स्वास्थ्य चांगले होते. जेथे समाज समाधानी असतो, तेथे प्रगती आणि संस्कृती हातात हात घालून वाटचाल करतात आणि समाजाने समाधानी असावे, अशी जेथे राज्यकर्त्यांची भावना असते, तेथे त्यांच्या सामाजिक संवेदना जपल्या जाणे महत्त्वाचे असते. राजसत्ता आणि धर्मसत्ता यांनी हातात हात घालून एकत्र वाटचाल करावी, असे मानले जाते. म्हणूनच सम्राट चंद्रगुप्ताने गुरुस्थानी असलेल्या चाणक्यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श राजसत्ता राबवून साम्राज्याचा विस्तार केला, धर्मसत्तेच्या छत्रपती शिवाजी महाराजांनीही रामराज्याची संकल्पना नजरेसमोर ठेवूनच राजसत्ता राबविली आणि महात्मा गांधी यांनीही रामराज्याच्या संकल्पनेचा सातत्याने पुरस्कार केला. जेथे कोणतीही एक सत्ता शिरजोर होते, तेथे समाजाचे मानसिक स्वास्थ्य बिघडते. राजसत्तेने धर्मसत्तेस कमी लेखून तिची गळचेपी करू नये किंवा धर्मसत्तेने राजसत्तेसमोर शिरजोरी करू नये, तर दोघांनीही एकत्रितपणे समाजहिताचा विचार करून समन्वयाने सहकार्याची भूमिका घ्यावी, अशी आदर्श समाजव्यवस्थेची कल्पना असते. जगातील अनेक देशांत जेथे धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्यात संघर्ष झाले, तेथे ती राज्ये लयास गेली, तेथील समाजजीवन अस्वस्थ झाले आणि अराजकसदृश स्थिती माजल्याचीही उदाहरणे आहेत. त्यामुळे धर्म ही केवळ समाजाच्या सुसंस्कृतपणाची आणि चांगल्या आचरणाची आदर्श संकल्पना असल्याने ती जोपासण्यासाठी राजसत्तेने पुढाकार घ्यायला हवा, अशी अनेकांची भावना असते. धर्मसत्ता समाजाला सन्मार्ग शिकविते आणि सन्मार्गाने आचरण करण्याचा समाज राजसत्तेवर दबाव निर्माण करू शकतो. जेव्हा राजसत्ता भ्रष्ट होते, तेव्हा धर्मसत्ता त्यास मार्गावर आणते, असे एक विधान महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या पहिल्या पर्वात एका धार्मिक सोहळ्यादरम्यान बोलताना केले, तेव्हा त्यावरून मोठे वादळ माजले. धर्मसत्तेचे अस्तित्व ज्यांना सातत्याने त्रासदायक वाटत असते, त्यांनी यावरून मोठा गदारोळही केला. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावाखाली जनतेच्या श्रद्धास्थानांची खिल्ली उडविण्याचा काही पुरोगामी मानसिकतेच्या लोकांनी यावर रण माजविले, पण त्या काळात धर्मसत्तेचे विधायक कामांची यादी देत स्पष्ट करून धर्मसत्तेकडून झालेल्या समाजहिताच्या कामांमुळे सामाजिक स्वास्थ्य सुधारल्याचे पुरावेच समोर मांडले गेल्याने, अस्वस्थांच्या फौजांना वैचारिक माघार घ्यावी लागली होती. कारण धर्मसत्तेशी सामाजिक संवेदनांचे जवळचे नाते असते. समाजाच्या धार्मिक भावनांची कदर केल्यास सामाजिक स्वास्थ्य संतुलित राहते व राजसत्तेला आपले समाजहितातील विहित काम करणे सोपे जाते, याची अनेक उदाहरणे याआधीही समोर आली आहेत. अयोध्येतील वादग्रस्त वास्तूच्या जागी श्रीरामाचे मंदिर उभारण्याचा प्रश्नही धर्मसत्ता आणि राजसत्तेने हातात हात घालून सामाजिक संवेदनांची कदर करीत सोडविल्यामुळे सहजपणे सुटला, हा इतिहास या देशातच निर्माण झाला आहे. अन्यथा अनेक शतकांपासून केवळ धार्मिक संवेदनांना धक्का लागण्याच्या भीतीने राजसत्तेने ही समस्या सोडविण्यात चालढकल केली नसती. जेव्हा धर्मसत्तेसोबत सामंजस्याने व सहमतीने या प्रश्नांची उकल करण्याची तयारी राजसत्तेने दाखविली, तेव्हा या प्रश्नाभोवती माजलेली समज-गैरसमजांची जळमटे दूर करून समस्या सोडविणे सोपे झाले. धर्मसत्ता आणि राजसत्ता यांच्या समन्वयाचे हे अलिकडच्या काळातील सर्वात श्रेष्ठ उदाहरण मानावयास हवे. यामुळे समाजाच्या धार्मिक संवेदनांची कदर करण्याचा, समाजाच्या धार्मिक भावना जपण्याचे आणि जोपासण्याचे महत्त्व राजसत्तेस उमगले आणि समाजालाही ते पटले. म्हणूनच नवतेची कास धरतानाच, प्रगतीच्या दिशेने वाटचाल करताना, परंपरांना पुरते झुगारून न देता परंपरांच्या शिकवणुकीचा धांडोळा घेत नव्या वाटचालीची दिशा निश्चित करण्याचे गेल्या दशकभरातील राजसत्तेचे धोरण देशाच्या हिताचे ठरताना दिसत आहे. या काळात धार्मिक तेढ माजून समाजस्वास्थ्य बिघडण्याच्या घटना अत्यंत अभावाने नोंदविल्या गेल्या, उलट, परस्परांच्या धार्मिक भावना जपण्याच्या जाणिवा प्रगल्भ होत गेल्याने जुन्यापुराण्या अनेक समस्यांवरील उत्तरेदेखील दृष्टिपथात येऊ लागली, जुन्या चुकांच्या जाणिवा जाग्या झाल्या आणि त्या सुधारण्याची संधी शोधण्याची मानसिकताही रुजू लागली. धर्मसत्तेने राजसत्तेशी समन्वयाने केलेल्या वाटचालीचा हा परिणाम अलिकडच्या दशकात नजरेआड करून चालणार नाही. अलिकडच्या काही वर्षांत समाजावरील धर्मसत्तेचा पगडा वाढू लागला असून धर्मसत्तेच्या अस्तित्वाचे जे काही चांगले परिणाम असतात, त्याची उदाहरणेही दिसू लागल्याने राजसत्तेने धर्मसत्तेच्या सन्मानाची भूमिका घेत आखलेल्या धोरणांचे स्वागत होणे साहजिकही आहे.

म्हणूनच १४४ वर्षांनी प्रयागराजच्या पवित्र संगमस्थळी पार पडलेल्या महाकुंभ मेळ्याचे नेटके आयोजन करून कोट्यवधी भाविकांच्या धार्मिक भावनांचा सन्मान करीत त्यांना समाधानाचा अनुभव देण्याचे समंजस नियोजन राजसत्तेकडून केले गेले. प्रयागराज येथील हा विक्रमी सोहळा अनुभवलेल्या भारतात आता धर्मसंवेदिविषयीच्या सामाजिक जाणिवांची नेमकी जाणीव झाली असेल, यात शंका नाही. धर्म ही एक जीवनशैली आहे आणि भारतातील बहुसंख्य समाज हीच जीवनशैली शेकडो-हजारो वर्षांपासून आचरणात आणत असल्याने त्याचा आदर करणे हे समंजस राज्यकर्त्यांचे कर्तव्य ठरते. याच जाणिवेतून केंद्रातील मोदी सरकारने आणि उत्तरप्रदेशातील योगी सरकारने प्रयागराजच्या महाकुंभ मेळ्याच्या निमित्ताने समाजाच्या संवेदनांना समाधान देणारे नेटके आयोजन करून धर्मसत्तेसोबत वाटचाल करण्याच्या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करून दाखविला आहे. असे केल्याने केवळ समाजाच्या मानसिक स्वास्थ्याचा सन्मान होतो एवढेच नाही, तर परंपरांचे जपणूक करताना आधुनिकतेच्या वाटचालीला बळ देणारे आर्थिक पाठबळही प्राप्त होते, हेही या निमित्ताने दिसून आले. महाकुंभ मेळ्याच्या मुहूर्तापासून पुण्य पदरी बांधण्यासाठी प्रयागराजला दाखल झालेल्या सुमारे ६५ कोटी भाविकांच्या सहभागामुळे उत्तरप्रदेशासारख्या राज्याच्या प्रगतीच्या वाटचालीस मिळालेले आर्थिक पाठबळ पुढच्या काळात सामाजिक विकासाच्या प्रकल्पांची नवी उंची गाठण्यासाठी साह्यभूत ठरणार आहे. ४५ दिवस चाललेल्या या जगातील सर्वात मोठ्या धार्मिक सोहळ्याची सांगता होत असताना समोर आलेली माहिती याची पुष्टी देणारी आहे. महाकुंभच्या सोहळ्याचा नेमका आकडा सांगायचा झाला, तर देश-विदेशातील ६६.३१ कोटी भाविकांनी प्रयागराज तीर्थाचे दर्शन घेत या सोहळ्यात सहभाग नोंदविला. अखेरच्या केवळ एकाच दिवसात या तीर्थस्थानी सुमारे अडीच कोटी भाविकांनी हजेरी लावली. प्रयागराजला भाविकांचा हा सोहळा पाहता चीन, भारतासारख्या देशांचा अपवाद करता, जगातील कोणत्याही देशाच्या लोकसंख्येहून अधिक भाविकांचा महासागर संगमस्थानी दाखल झाला, हे स्पष्ट होते. ७३ देशांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांनी या सोहळ्याचा अनुभव घेतला, नेपाळमधून सुमारे ५० लाख भाविकांनी प्रयागराजाच्या पवित्र संगमस्नानाचे पुण्य पदरी बांधून घेतले, तर पाश्चिमात्य देशांतूनही असंख्य भाविकांनी हा सोहळा याचि डोळा अनुभवण्यासाठी प्रयागराज गाठले. जगाच्या कानाकोपऱ्यातून सुमारे ४५ कोटी भाविक दाखल होतील, उत्तरप्रदेशाच्या अर्थव्यवस्थेस मोठी चालना मिळेल व राज्याच्या सकल उत्पन्नात साडेतीन लाख कोटींची भर पडेल, असा उत्तरप्रदेश सरकारचा अंदाज होता. प्रत्यक्षात ६६ कोटी भाविक या सोहळ्यात सहभागी झाल्याने उत्तरप्रदेशाच्या सकल राज्य उत्पन्नात चार लाख कोटींची भर पडणार असल्याचे सांगितले जात आहे. या महासोहळ्याच्या निमित्ताने सुमारे २८०० विमानांतून साडेचार लाख भाविकांनी प्रवास केला, भाड्याने घेतलेल्या ७०० विमानांमुळे या क्षेत्रातील व्यवसायात एक नवा विक्रम प्रस्थापित झाला, १८ हजार ८३० रेल्वेगाड्यांतून देशाच्या कानाकोपऱ्यांतून १५ कोटी भाविक प्रयागराजला दाखल झाले. धार्मिक सोहळ्यातून आर्थिक उन्नतीचा आगळा मार्ग दाखविणाऱ्या या महाकुंभ मेळ्याच्या नियोजनातून धर्मसत्तेने राजसत्तेस दिलेले आर्थिक बळ ही देशाच्या प्रगतीची मोठी शक्ती ठरणार आहे.

एकतेचा महायज्ञ ठरलेल्या या महाकुंभ मेळ्याची आता सांगता झाली आहे. गेल्या ४५ दिवसांत भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगाला भारतीयांच्या धार्मिक आस्थेचे, सामंजस्याचे आणि परस्पर सहकार्याचे अनोखे दर्शन या सोहळ्यातून घडले आहे. संस्कृती आणि वारसा यांचे बोट धरूनच देशाला भविष्याची वाटचाल करावयाची आहे, असा संदेश जणू या सोहळ्यातून भारतीय जनतेने राजसत्तेला दिला आहे. हा संकेत ओळखूनच धर्मसत्तेच्या हातात हात घालून राजसत्तेची वाटचाल सुरू राहील यासाठी सरकारने आपल्या कृतीतून दिलेली ग्वाही हेच समाजाचे संचित ठरणार आहे.

---

### दखल

# भाषा मरताहेत, जागे व्हा

**मोरेश्वर बडगे**

राजकारणाचा चिखल झाला आहे. राजकारण चिवडणे म्हणजे तो चिखल अंगावर उडवून घेण्यासारखे झाले आहे. तरीही माणसाला राजकारण सोडवत नाही. नुकतेच दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. त्यात साहित्य कमी आणि राजकारणच अधिक झालेले दिसले. साहित्य आणि एकूण मराठी साहित्य आणि मराठी भाषा यांच्याबद्दलच्या एकूणच उदासीनतेने या संपूर्ण प्रकाराला अलिकडे उत्सवी स्वरूप आले आहे. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांचा जन्मदिन आला की आपण 'मराठी भाषा दिन' म्हणून साजरा करतो. 'डोक्यावर सोनेरी मुकुट आणि फाटक्या वस्त्रानिशी माय मराठी मंत्रालयाच्या दारात उभी आहे' असे कुसुमाग्रजांनी म्हटले होते. ते गेले. मात्र माय मराठी आजही फाटकावरच आहे. तसे पाहिले तर मराठी ही काय लहानसहान भाषा नाही. १५० कोटी लोकसंख्येच्या भारतात मराठी भाषा बोलणारे सुमारे ८-१० कोटी लोक असावेत. भारताबाहेर जगभरात मराठी बोलणारे दोन कोटी लोक सहज असतील. त्यानुसार मराठी देशातील चौथ्या क्रमांकाची आणि जगातील दहाव्या क्रमांकाची भाषा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठी बोलली जात असली, तरी जागतिक बाजारात तिला फारसे स्थान नाही. म्हणून प्रतिष्ठा नाही. मराठी ही मृत्युपंथाला लागलेली भाषा आहे, असे फार पूर्वी इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी सांगून ठेवले होते. १९६० साली महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठीची तब्येत सुधारता आली असती. मात्र मराठीत कागदोपत्री राजभाषेचा दर्जा देण्यापलीकडे काही झाले नाही. मराठीच्या नावाने विद्यापीठांमध्ये मराठी विभाग आहेत, मराठीच्या नावाने संस्था आहेत, सरकारचा विभाग आहे तरीही मराठी खंगत चालली आहे. मग कशी वाचवायची मराठी?

नव्या परिस्थितीत मराठीला काही मर्यादा पडतात. जगभरातले नवे संशोधन, ज्ञान सर्वात आधी इंग्रजीतून येते. त्या अर्थाने इंग्रजी ही जागतिक पातळीवरचा ज्ञानभाषा आहे आणि बाजारपेठेचीही भाषा आहे. पण मराठीचे काय हाल केले आपण? तिला महाराष्ट्रापुरते करून ठेवले. महाराष्ट्रातही मराठी घरात बोलली जात असेल. मात्र बाहेर हिंदी-इंग्रजीत बोलताना मराठी माणसे दिसतात. साधी भाजी खरेदी करताना हिंदीत बोलणारी मराठी माणसे तुम्हाला गल्लोगल्ली दिसतील. 'महाराष्ट्रात राहायचे असेल तर मराठीत बोलले पाहिजे' हे सांगण्यासाठी आजही भांडावे लागते. मराठी शाळा बंद पडताहेत. नोकरी पाहिजे असेल तर इंग्रजी माध्यमातून शिकावे लागते हे कटू वास्तव आहे. डॉक्टर, इंजिनीअर व्हायचे असेल तर इंग्रजीशिवाय गत्यंतर नाही. अलिकडे तर इंटरनेट आणि संगणकाने धुमाकूळ घातला आहे. लहानांचेच नाही तर मोठ्यांचेही वाचन बंद झाले आहे. पुस्तक प्रदर्शनाला गर्दी होते ती केवळ दिखाव्यापुरती. आपण वाचतो, पण मोबाईलवर वाचतो. किंडलवर कादंबरी वाचल्याचे अनेक जण अभिमानाने सांगतात. लायब्ररीत जाऊन आवडीचे पुस्तक घरी आणून वाचणारे दुर्मिळ झाले आहेत. पूर्वी नव्या पुस्तक-कादंबरींवर चर्चा व्हायच्या. आज या सारी गोष्टी इतिहासजमा झाल्यासारख्या आहेत. 'ए.आय.' म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स या नव्या प्रकाराची सध्या प्रचंड मागणी आहे. हे शिकायचे म्हणून नवी पिढी झपाट्याने इंग्रजीकडे वळते आहे. दगडी पाटीची जागा संगणकाने घेतली हे कळले तेव्हा उशीर झाला होता.

नोकऱ्यांपासून व्यवसायापर्यंत कोणत्याही पातळीवर मराठी भाषेशिवाय पर्याय नसेल, अशी परिस्थिती महाराष्ट्रात आपल्याला निर्माण करता आली नाही. इंग्रजीत शिकवले जाणारे अभ्यासक्रम मराठीमध्ये अनुवाद करून शिकवले जाऊ शकतात. हे आव्हान पेलू शकतील एवढ्या ताकदीचे मराठी भाषाप्रभू आपल्याकडे अजूनही आहेत. पण सरकारी अनास्था मराठीला बुडवते आहे. मराठी भाषेला आपण अभिजात भाषेचा दर्जा मिळविला खरा; पण म्हणजे काय मिळविले? एक दिवस मराठीचा उत्सव करायचा म्हणजे ३६४ दिवस मराठीकडे दुर्लक्ष करायला मोकळे अशी ही विचित्र मानसिकता आहे.

प्रश्न केवळ मराठीचा नाही. 'युनिस्को'ने तर जगभरातील भाषा मरत असल्याबद्दल १९९१ पासूनच चिंता व्यक्त करायला सुरुवात केली आहे. त्या आधी भाषा कुठे होती? सुमारे ७० हजार वर्षांपूर्वी माणसाने शब्दांच्या माध्यमातून जगाला पकडण्याचा प्रयत्न सुरू केला. म्हणजेच माणसाच्या पाच लाख वर्षांच्या उत्क्रांतीच्या इतिहासात भाषेचा इतिहास सुमारे ७० हजार वर्षांचा आहे. मात्र आता काय झालंय, की आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे माणूस त्याची भाषा सोडून संवाद साधण्याच्या वेगळ्या दुनियेत जाऊ लागला आहे. भाषा नसती तर सूर्य-चंद्र अशा अगणीत गोष्टींना आपण ओळखू शकलो नसतो. पूर्व-पश्चिम या दिशा आहेत की नाहीत, आपल्याला माहीत नाही. परंतु कोणाच्या तरी सांगण्यावरून आपण तसे मानतो. भाषा असल्यानेच आपण प्रत्येक गोष्टीविषयी काही सांगू शकतो. मात्र, विकासाच्या नावाखाली आदिवासी, भटके-विमुक्त जातींना वेगळ्याच गर्दीत ढकलले तर त्या त्यांचीच भाषा विसरून नवी भाषा स्वीकारतील. जंगलातल्यांच्या भाषा ऐकू येईनाशा झाल्या आहेत. त्याचे कारण हे आहे. 'युनेस्को'च्या मते, जगातील सुमारे सात हजार भाषांपैकी चार हजार भाषा या पुढील ३० वर्षांत मरून जातील. उरलेल्यांपैकी १७०० भाषा या नेहमीच्या वापरात नसल्याने बाजूला पडतील. जगभरात जेमतेम ३०० भाषाच तग धरतील. कारण आठवड्याला एक किंवा त्याहून अधिक गतीने भाषा मरत आहेत. भाषा मरताहेत म्हणजे नेमके काय होते आहे? सोपे उदाहरण देतो. चिप, मेमरी बँक या साऱ्याचा प्रभाव इतका वाढत चालला आहे की, एखादी गोष्ट लक्षात ठेवायची माणसाची क्षमता घटत चालली आहे. परिणामी भविष्यात माणसाची बुद्धी ही अर्धी जैविक आणि अर्धी यांत्रिक होण्याची भीती दिसत आहे. महाराष्ट्रात मराठीच्या १७-१८ बोली आहेत आणि ५२ इतर भाषा आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांकडे मुलांचा ओढा वाढल्याचे परिणाम आपण पाहतो. मराठी कुटुंबातल्या शाळकरी मुलांना धड मराठी बोलता येत नाही. सध्याच्या डिजिटल जमान्यात लोकांचे लिहिणे-बोलणे कमी झाले आहे, संवाद कमी झाला आहे. पूर्वी ओळखीचे फोन नंबर आपल्याला तोंडपाठ असायचे. मात्र, या डिजिटल युगात काहीही लक्षात ठेवण्याचे कष्ट आपण घेत नाही. आपण पूर्णपणे तंत्रज्ञानाच्या आहारी जात आहोत. आपण थेट 'सेव्ह' करतो. काहीच लक्षात ठेवायचे नाही, अशी ही वृत्ती धोकादायक आहे. भाषा सोडून माणूस संवादाच्या वेगळ्याच जगात निघाला आहे. पूर्वी प्रत्येक जिल्ह्यामागे भाषा बदलायची. काही प्रमाणात आजही तुम्हाला ते समोरच्याच्या बोलण्यात जाणवते. बोलण्यावरूनच तुम्ही तो कुठल्या भागाचा आहे ते ओळखू शकाल. 'मले-तुले' हे शब्द खेड्यात बोलण्यात यायचे. आता खेड्यातही हे शब्द कमी ऐकायला येतात. म्हणजे ती गावरानी भाषा मरणपंथाला लागली आहे. शहरात दिसणारी सारी माणसे एकाच पट्टीत बोलताना जाणवतात. आधुनिक तंत्रज्ञान, जागतिकीकरण हे भाषासंहाराला कारण ठरत आहे. हवामान बदलही भाषांचा बळी घेताना दिसत आहे. हवामान बदलाने जगभरातील द्वीपसमूह आणि किनारे जसजसे बुडू लागतील तेव्हा त्यांच्यासोबत अनेक भाषाही चिरविश्रांती घेणार आहेत. कारण जिवाच्या भीतीने लोक इतरत्र राहायला जातील. ते जिथे कुठे जातील तिथली भाषा त्यांना शिकावी, बोलावी लागेल. म्हणजे त्यांच्या जुन्या भाषेचा मृत्यू. केवळ स्थलांतरण या कारणाने सध्या दर ४० दिवसांनी पृथ्वीच्या पाठीवरील एक भाषा मरत आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. भाषांच्या अस्तित्वाचे संकट हे असे बहुअंगी आहे. एक भाषा मरते म्हणजे काय होते? एका अर्थाने तिथल्या छोट्या संस्कृतीला आपण मूठमाती देत असतो. तेव्हा हे संकट ओळखा. आपापल्या भागातली भाषा वाचवली तरी तो खारीचा वाटा असेल. ■

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

### वेध

**संजय रामगिरवार**

# 'जिस धर्म के नाम से रोटी मिल जाये!'

**हाथ मे रोटी लिए उसने हँस के पूछा,**
**"किस धर्म से ताल्लुक रखते हो?"**
**उस भिखारी ने भी रोते कहा,**
**"जिस धर्म के नाम से वो रोटी मिल जाये!"**

हे खरे आहे, दानाला सर्वच धर्मांत महत्त्वाचे स्थान आहे. 'दानधर्म' या संज्ञेतून दान करणे म्हणजे धर्माचार मानला जातो आणि त्यावरच भिकाऱ्यांचे जीवन टिकले आहे. ज्यांच्याकडे जगण्यासाठी दुसरा काहीच पर्याय नसतो अशांना बाजूला ठेवले तरी जेव्हा धडधाकट व्यक्ती भीक मागताना दिसते, तेव्हा याच धर्माचाराचा दुरुपयोग होत असल्याची जाणीव अस्वस्थ करते. अशा भिकाऱ्यांचे राष्ट्रनिर्मितीत योगदान काय, हा प्रश्न आता आपसूक उपस्थित होतो.

परवा प्रयागराज येथील महाकुंभात असेच काही भिकारी भेटले. त्यांनी काही लहान मुलेही भीक मागायला सोडली होती. मुलांचे केविलवाणे चेहरे पाहून त्यांना पैसे दिले पाहिजे असे वाटत असतानाच, तुम्ही त्यांना वाईट सवय लावता आहात, असे एक मित्र म्हणाला. काही वर्षांपूर्वी एका जनहित याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविलेला अभिप्राय वाचला. तो अत्यंत महत्त्वाचा होता. 'निराधार व्यक्ती आणि भिकाऱ्यांनीदेखील देशासाठी काम करायला हवे' असे सुचवत तत्कालीन मुख्य न्यायाधीश दीपांकर दत्ता आणि न्या. गिरीश कुळकर्णी यांच्या खंडपीठाने याप्रकरणी दाखल याचिका निकाली काढली होती. बेघर आणि गरीब व्यक्ती तसेच भिकाऱ्यांना दिवसातून तीन वेळा पोषक अन्न, पिण्याचे स्वच्छ पाणी, निवारा व अन्य सुविधा उपलब्ध करण्यास मुंबई मनपाला बाध्य करावे, अशी विनंती याचिकाकर्त्याने तेव्हा केली होती. न्यायालयाने मात्र मनपाची भूमिका मान्य करीत, साऱ्याच गरजा सरकार पूर्ण करू शकत नाही, असा अभिप्राय नोंदविला. देश आत्मनिर्भतेकडे कलला असताना न्यायालयाचा हा निकाल या विषयावर गंभीरतेने चिंतन करण्यास भाग पाडणारा होता.

देश वेगाने आर्थिक प्रगतीकडे वाटचाल करीत असताना, भिक्षापात्रांची संख्याही तेवढ्याच वेगाने वाढत जाणे ही मोठी समस्या मानली पाहिजे. मानवाधिकार आयोगानुसार, दरवर्षी सुमारे ४० हजार मुलांचे अपहरण करून त्यांना भीक मागायला लावले जाते. त्यांचे पूर्ण आयुष्यच यात संपते. वाहतुकीच्या छेदनबिंदूवर लाल दिवे लागताच अशा कितीतरी मुलांसह महिला-पुरुष, ज्यात बहुतांश धडधाकटच असतात; मात्र भीक मागताना दिसतात. मंदिर, मशीद व अन्य धार्मिक ठिकाणांसह रेल्वेगाड्यांतूनही हेच चित्र दिसते. काही तर भिकेसाठी जबरदस्ती करताना दिसतात. त्यावेळी त्यांची कीव येण्याऐवजी राग जास्त येतो. सरकारी आकड्यानुसार, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेशात सर्वाधिक तर आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान व महाराष्ट्रातही मोठ्या संख्येत भिकारी आहेत आणि हा चिंतेचा विषय ठरावा.

बरे, सारेच भिकारी गरीब असतातच असे नाही. मुंबई-परळ भागातील भीक मागणारे भारत नामक गृहस्थ यांच्याकडे १ कोटी ४० लाखांच्या दोन सदनिका आहेत. दरमहा ७५ हजार रुपयांची भीक मागणारा हा इसम देशातील सर्वात श्रीमंत भिकारी मानला जातो. वयाच्या सोळाव्या वर्षीपासून लक्ष्मी नावाच्या महिलेने भीक मागायला सुरुवात केली आणि ५० पेक्षा अधिक वर्षांच्या आयुष्यात लाखो रुपये बँकेत जमा केले. दरमहा त्या ३०-४० हजार मिळवतात. मुंबईतीलच चर्नी मार्गावर भीक मागणाऱ्या गीताने एक सदनिका खरेदी केली आहे. त्या ४५ हजार रुपये महिन्याकाठी प्राप्त करतात. भीक मागून जगणाऱ्या गोवंडीतील चंद्र आझाद यांच्याकडे स्वतःचे घर, ८.७१ लाख रुपये बँक खात्यात तर १.५ लाख रुपयांची रोख जमा होती. २०१९ मध्ये रेल्वे अपघातात त्यांचा मृत्यू झाला. नंतर पोलिसांनी ही संपत्ती शोधून काढली. बिहारच्या पाटण्यातील रेल्वे प्लॅटफार्मवर भीक माणारा पप्पूसुद्धा श्रीमंत भिकाऱ्यांच्या यादीत आहे. त्याच्याकडे १.२५ कोटींची संपत्ती आहे.

भीक मागणे हा गुन्हा आहे की नाही, यावर वाद असू शकतो. मात्र, भारतीय रेल्वे कायदा (१९४१) नुसार रेल्वेगाड्यांतून भीक मागण्यावर प्रतिबंध आहे. तरीही गाड्यांत चढून पैसे मिळेपर्यंत मग्रुरीने उभे ठाकणारे भिकारी सर्वांच्याच अनुभवाचे असतील. ज्याला उदरनिर्वाहाचे प्रकट साधन नसेल किंवा जो आपणाविषयी व्यवस्थित माहिती देऊ शकत नसेल तोच भिकारी, अशी व्याख्या फौजदारी-व्यवहार-संहिता कलम १०९ मध्ये केली गेली आहे. धडधाकट तरुण यात मोडत नसतानाही सार्वजनिक ठिकाणी उपद्रव करून भीक मागताना तो दिसतो. अशांवर मात्र कलम १३३ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करता येते. विषय सामाजिक बदलाचा आहे. त्यावर समाजातच गंभीरतेने चिंतन झाले पाहिजे. ■

९८८१७१७८३२

---

### दृष्टिकोन

# भांडण : माणसाचा स्थायीभाव

**विजय पांढरीपांडे**

भांडण माणसाचा स्थायीभाव आहे. भांडण अनुभवले नाही अशी व्यक्ती सापडणे कठीण. आपला स्वभाव, आपले वागणे कितीही चांगले, संयमित असले तरी आपल्या भोवतीची माणसे, म्हणजे जवळची, दूरची नाती, मित्र तसे नसतात. उदाहरणार्थ आपण वाहन कितीही चांगले, सावधगिरीने चालवले, सगळे नियम पाळले तरी अपघात दुसऱ्याच्या चुकीने होतो. कधी कधी आपलीही चूक असते. कुणीही शंभर टक्के परफेक्ट नसतो. भांडणे घरात होतात. नवरा-बायको, भाऊ-बहीण, बाप-लेक, सासू-सून अशा कुठल्याही नात्यात केव्हाही, कुठल्याही कारणाने वितुष्ट येते. कधी कधी तर ही भांडणाची कारणे क्षुल्लक असतात. हास्यास्पद असतात, पण लहान-सहान कारणाने भांड्याला भांडे वाजते. पूर्वी इस्टेट, जमीनजुमला, हिस्सेवाटे यावरून भांडणे कॉमन होती. हे जमिनीचे वाद तर फक्त घरा-कुटुंबापुरते मर्यादित नसतात. दोन राज्यात, दोन देशात होणारी भांडणे वर्षानुवर्षे चालू आहेत. ती भयानक रक्तरंजितदेखील असतात. हे सारे स्वामित्वाच्या हक्काची जाणीव प्रबळ झाल्यापासून हजारो वर्षांपासून चालू आहे. रामायण-महाभारत म्हणजे भांडणाच्या कहाण्या. त्यात कुठे तीव्रता कमी-जास्त असेल; पण हे पुराण काळापासून चालू आहे, हे मात्र खरे. आपला मर्यादित संयम हे भांडणाचे मूळ असते. प्रत्येकाला आपले तेच खरे वाटण्याचा आग्रह हे भांडणाचे मूळ असते. आपण नेहमी दुसऱ्याला, प्रतिपक्षाला खोटे ठरविण्याचा प्रयत्न करतो. अहंभावाने प्रत्येकालाच घेरले असते. कुणी कोणतीही गीता सांगितली, तत्त्वद्यान पाजळले तरी ते आपल्या पचनी पडत नाही, ही वस्तुस्थिती आहे. माघार कुणी घ्यायची, यातच तू तू मी मी चालते! पाऊल मागे घेणे म्हणजे हार स्वीकारणे हा भयगंड असतो. या भयगंडाने आपण सगळेच ग्रासलो असतो.

कौटुंबिक भांडणाचा विचार करायचा झाला तर ज्या दोन पायावर संसार उभा असतो त्या नवरा-बायकोचे न पटणे ही सुरुवात असते. अरेंज मॅरेजचे सोडा, अगदी एकमेकांना आधी जीव लावणारी, लग्नाच्या बंधनात अडकली की मंगळसूत्राचेच जोखड वाटायला लागते! जी मुलगी लग्नानंतर स्वतंत्रपणे आपल्या भल्याचा, भविष्याचा विचार करण्याऐवजी आई-वडिलांची शिकवणी घेते, ती घटस्फोटाच्या पदवीची तयारी करीत असते! या तरुण, वयस्कर आपल्या पोटच्या तरुण अपत्याचीदेखील चिंता नसते. पूर्वी निदान मुलासाठी, कुटुंबाच्या प्रतिष्ठेसाठी समाज भयाने का होईना लग्न टिकवून ठेवणे, नाती निभावून नेणे याची धडपड होती. आता सुशिक्षित जोडीत तीही समंजस वृत्ती राहिली नाही. शिक्षणाने शहाणपण वाढण्याऐवजी वेडेपणा वाढला आहे. सगळ्याच क्षेत्रात, सगळ्याच बाबतीत! हे वेडेपण कुटुंबातील इतर नाते संबंधातील भांडणाला, वितुष्टाला तितकेच कारणीभूत आहे.

अगदी जवळचे म्हणणारे मित्र-मैत्रिणीदेखील साध्या कारणाने भांडतात. कधी स्पर्धा, कधी असूया, कधी साधे गैरसमज, कधी तोंडातून अनवधानाने निघून गेलेला अपशब्द असे कसलेही क्षुल्लक कारण भांडणाला, वर्षानुवर्षे जोपासलेला स्नेह संपायला पुरेसे ठरते. आधी एकमेकावर जीव ओवाळायचा न मग एक दुसऱ्याच्या छाताडावर बसायचे, एकमेकाचे लचके तोडायचे हे वर्तन समजुतीच्या पलीकडचे असते. आता तर अनेक छोट्या-मोठ्या राज्यात, देशात हिंसक भांडणे चालू आहेत. संहारक युद्ध पेटले आहे. वाद जमिनीचे, बॉर्डरचे वाटत असले, तरी जात, वर्ग, वंश, वर्ण भेद हे आपल्या संस्कृतीत खोलवर रुजले आहेत. धार्मिक मतभेद तर शतकानुशतके सुरू आहेत. तडजोड करायला, मध्यस्थी स्वीकारायला कुणाचीच तयारी नाही. मेरे मुर्गी की एकही टांग अशी जिद्दी वृत्ती आहे. या सीमारेषावर भयानक नरसंहार सुरू आहेत. स्त्रियांवर अत्याचार होताहेत. निष्पाप मुले अनाथ होताहेत. हे सगळे बघता दोन पायाचा माणूस बघता बघता चार पायांचा जनावर कसा झाला, हा प्रश्न पडतो. जगाला शांती-अहिंसेचा संदेश देणारे गांधीजी खरेच होऊन गेलेत का आधी, अशी शंका वाटावी; इतकी भयानक परिस्थिती आहे.

ज्या लोक प्रतिनिधींना लोकशाही पद्धतीने आपण निवडून देतो, ज्यांच्या कडून सुशासनाची, रामराज्याची अपेक्षा करतो तीही मंडळी सरकारचा कारभार करायचे सोडून एकमेकांशी भांडण्यात. एकमेकांची उणीदुणी काढण्यात, एकमेकांचे पाय ओढण्यात धन्यता मानतात. कुठेही वैचारिक निष्ठा, राष्ट्राची चिंता दिसत नाही. आहे ती सत्ता लालसा अन् स्वार्थ. अनेकदा ही नेते मंडळी आपल्या बोलण्या-वागण्यातून सभ्यतेचे ताळतंत्र सोडताना दिसतात.

आपण शिक्षणातील नवीन प्रयोगाच्या, धोरणाच्या गोष्टी करतो. शिक्षणाने माणूस मोठा होतो असे समजतो. शहाणा झाला असे म्हणतो. मग वाद करताना, भांडताना, एकमेकांच्या उरावर बसताना हे शिक्षण कुठे लपले असते? स्पर्धेच्या भयगंडाने प्रत्येक जण ग्रासला आहे. प्रत्येकाला फक्त आपले अस्तित्व टिकवायचे आहे. दुसऱ्याला पाडून त्याच्या खांद्यावर उभे राहून उंच व्हायचे आहे. आकाशाला भिडायचे आहे. भांडूनच सुटले तर प्रश्न सुटतील अशी ज्याची त्याची खोटी समजूत आहे. पण या अशा भांडणानेच समस्या वाढताहेत, याची कुणाला खबरबात नाही, चिंता नाही.

आपल्याला पुन्हा एकदा बुद्ध हवा आहे. आपल्यातल्या प्रत्येक अस्थिर अर्जुनाला श्रीकृष्ण हवा आहे अन् या भांडण नावाच्या रावणाचे दहन करणारा रामदेखील हवा आहे. ■

७६५९०८४५५५

---

## फडणवीसांचे नाव सुवर्णाक्षरात लिहिले जाईल

'फिक्सर आवडे सर्वांना' हा संपादकीय लेख २६ फेब्रुवारीच्या अंकातून वाचला. सरकारची स्वच्छ प्रतिमा डागाळली जाऊ नये व भ्रष्टाचाराला आळा बसावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या फिक्सरसंदर्भात जो निर्णय घेतला, तो खूपच कौतुकास्पद आहे. तरुण भारत संपादकांनी यासंदर्भात केलेले अभ्यासपूर्ण विश्लेषण खरंच वाचनीय आहे. काही वर्षांपूर्वीचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरींचे एक विनोदी भाषण आठवते. या भाषणात ते पीएचा उल्लेख 'चहापेक्षा केटली गरम' असा करतात आणि समोरील श्रोता वर्ग खळखळून हसायला लागतो. गडकरींचे हे विधान वस्तुस्थितीला खूपच धरून होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुद्धा खूप अनुभवी राजकारणी आहेत. शासन-प्रशासनातील बारकाव्यांवर त्यांचा अभ्यास आहे आणि म्हणूनच भ्रष्टाचाराला जिथे वाव आहे त्याच्या मुळावरच घाव घालण्याचा फडणवीसांचा प्रयत्न दिसतो. या निर्णयानंतर आता मंत्रिमंडळातील मंत्र्यांच्या पीएची नेमणूकसुद्धा फडणवीसांच्या संमतीने होईल. स्वच्छ प्रतिमेचीच माणसे शासन-प्रशासनातील भ्रष्टाचार दूर करू शकतात. फडणवीसांचा हा नवा पॅटर्न यशस्वी झाल्यास भ्रष्टाचार मुक्त राज्य म्हणून देशाच्या इतिहासात फडणवीसांचे नाव सुवर्णक्षरात लिहिले जाईल.

**अखिल देशपांडे**/ अकोला

●●●●

### वाचक पत्रे

## अ. भा. साहित्य संमेलनाबद्दल सम्यक अग्रलेख

तरुण भारत, नागपूरमधील वरील विषयावरचा 'सूप वाजण्याचा आवाज' अग्रलेख नेहमीसारखा सम्यक वाटला. सध्या सोशल मीडियावर या अखिल भारतीय साहित्य संमेलनाबद्दल बऱ्याच टोकाच्या प्रतिक्रिया उमटत आहेत, जे साहजिकही आहे. प्रत्येकच असे संमेलन म्हणजे शिमगा असतो जो पुढेही सुरूच राहतो. मराठी संमेलन आणि पाट्या इंग्रजी, पंतप्रधान, मुख्यमंत्री यांच्या नावांचा उल्लेखही नाही, सरकारवर अध्यक्षांचीच अनर्गल टीका वगैरे वगैरे. मोदीजींनी विरोधकांना मारलेले मुद्दे की गुद्दे वगैरे देखील. या अग्रलेखात मांडलेले मुद्दे पटले म्हणून हा लेखनप्रपंच.

**रवी वाघमारे**/ नागपूर

●●●●

## गंगाशुद्धतेविषयीचे खोटे कथानक



प्रयागराज येथील कुंभमेळ्यादरम्यान ६० कोटींहून अधिक लोकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केले. 'प्रयागराज येथे यंदा आलेला महाकुंभमेळ्याचा योग १४४ वर्षांनी आल्याने आयुष्यात असा योग पुन्हा मिळणार नाही' या विचाराने गंगामाता, हिंदू धर्म यावर श्रद्धा असणाऱ्यांनी तसेच धर्म-अध्यात्माबद्दल थोडीफार आस्था असणाऱ्यांनी आणि त्याच जोडीला अगदी धर्मविरोधकांनीही प्रयागराजला भेट देऊन त्रिवेणी संगमात स्नान केले. असे असले, तरी काही जणांनी गंगामातेच्या शुद्धतेविषयी शंका उपस्थित केली. गंगामातेचे पाणी पिण्यायोग्य राहिले नसून ते प्रदूषित झाले आहे, अशी आवई उठवली. पण या खोट्या कथानकाचे लगेचच 'पद्मश्री' पुरस्कार प्राप्त शास्त्रज्ञ डॉ. अजय सोनकर यांनी खुले आव्हान देऊन खंडन केले. ज्यांना गंगामातेच्या शुद्धतेविषयी शंका किंवा प्रश्न असतील, त्यांनी पाण्याचा नमुना घेऊन माझ्या प्रयोगशाळेत यावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांच्या प्रयोगाचे निष्कर्षही त्यांनी सांगितले आणि गंगामातेचे पाणी केवळ आंघोळीसाठीच नाही, तर पिण्यायोग्यही असल्याचे सांगितले. गंगा नदीत स्नान केल्याने रोग पसरल्याच्या नाही, तर उलट त्वचा रोगासारखे आजार दूर झाल्याच्या कित्येक घटना घडल्या आहेत. त्यामुळे गंगेत वा त्रिवेणी संगमात स्नान केलेल्यांनी गंगा नदी आणि सनातन धर्म रक्षणासाठी संकल्प करावा आणि कथित जलप्रदूषणापेक्षाही हिंदू धर्मविरोधकांचे जे विचार आहेत, ते अधिक प्रदूषणकारी अन् रोगट आहेत त्याचा संयत मार्गाने प्रतिकार करावा. ■

**संजय चौधरी**/ अमरावती

●●●●

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### फवारणीचे औषध तोंडात गेल्याने तरुणावर उपचार


**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
शेतात फवारणी करत असताना फवारणीचे औषध चुकून तोंडात गेल्याने तरुणाला उपचाराकरिता शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा प्रकार दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी येथे २६ फेब्रुवारी रोजी दुपारी चार वाजता घडला. नागेश सिद्धार्थ बानीकोल ( वय १७) तरुणाचे नाव आहे. बुधवारी दुपारी चारच्या सुमारास नागेश त्यांच्या स्वतःच्या शेतातील पिकावर फवारणी करत होता. त्यावेळी फवारणीचे औषध चुकून त्याच्या तोंडात गेले यामुळे त्यास त्रास होऊ लागला. सायंकाळी साडेसहाच्या सुमारास तो स्वतः शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल झाला या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### तोल जाऊन पडल्याने आश्रम शाळेतील नऊ वर्षांचा मुलगा जखमी

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
तोल जाऊन पडल्याने आश्रम शाळेतील नऊ वर्षांचा मुलगा जखमी झाला. हा प्रकार बुधवारी दुपारी साडेचार वाजता घडला. राम राजू वर्मा ( वय ९ रा. श्री संत गाडगेबाबा आश्रम शाळा) असे जखमी झालेल्या मुलाचे नाव आहे. राम हा उत्तर सोलापूर तालुक्यातील कवठे गाव परिसरातील श्री संत गाडगेबाबा प्राथमिक आश्रम शाळेत राहण्यास आहे. बुधवारी दुपारी चारच्या सुमारास शाळेत तो तोल जाऊन अचानक पडला. यामुळे डाव्या हातास मार लागून तो जखमी झाला. त्यास सायंकाळी सव्वा सहाच्या सुमारास शिपाई पवार यांनी उपचारात दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकी झाली आहे.

### कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून तरुण जखमी

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
दुचाकीच्या आडवा कुत्रा आल्याने घसरून झालेल्या अपघातात तरुण जखमी झाला. हा अपघात बुधवारी रात्री नऊ वाजता घडला. ओंकार अक्षय महिंद्रकर (वय १८, रा. पाथरूट चौक सोलापूर) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. ओंकार हा बुधवारी रात्री मर्केट यार्ड येथून दहिटणे गावाच्या दिशेने दुचाकी वर जात होता. त्यावेळी कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरली. यात खाली पडल्याने ओंकारच्या कपाळाला आणि नाकाला मार लागला. तसेच ओठालाही जखम झाली. मित्र रोहित याने रात्री नव्हतीस वाजता शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



### धक्का लागल्याने दोघांना बेदम मारहाण

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
बाथरूमला जाताना धक्का लागल्याने दोघांना बेदम मारहाण करण्यात आली. हा प्रकार अक्कलकोट रस्त्यावरील जय भवानी नगरात बुधवारी रात्री आठ वाजता घडला. बबलू महेबूब नदाफ (वय १८) व आफरीन सिकंदर नदाफ (वय २४ दोघे रा जय भवानीनगर) असे मारहाण झालेल्या दोघांची नावे आहेत. बुधवारी रात्री आठच्या सुमारास बबलू हा बाथरूमला जात होता. त्यावेळी वाटेत त्याचा महेश यास धक्का लागला. त्यानंतर धक्का का मारला या कारणातून महेश व इतर दोघांनी हाताने तसेच लाथा बुक्क्यांनी बबलू व आफरीन यांना मारहाण केली. यात दोघांनाही मुकामार लागल्याने मामा मौलाली यांनी उपचारात शासकीय रुग्णालयात दखल केले. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# कोट्यवधीची फसवणूक; पैलवानला न्यायालयीन कोठडी

**१२ जणांची सुमारे तीन कोटींची फसवणूक**

**पैलवानच्या पत्नीचा अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
शेअर बाजारात गुंतवणूक केल्यानंतर मोबदला मिळवून देण्याचे आमिष दाखवून ठेवीदारांची कोट्यावधी रुपयांची फसवणूक करणाऱ्या पैलवानास विशेष न्यायाधीश योगेश राणे यांनी न्यायालयीन सुनावली. तर पैलवानच्या फरार पत्नीने अटकपूर्व जामीनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

निवृत्ती मारुती पैलवान (रा. १०५, आर्यश रेसिडेन्सी, एसआरपीएफ कॅम्प जवळ, विजापूर रोड, सोलापूर) असे न्यायालयीन कोठडी मिळालेल्याचे नाव आहे. याबाबत आशिष अशोक पाटील (रा. जुळे सोलापूर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान सुरेखा निवृत्ती पैलवान यांनी अटकपूर्व जामीनासाठी जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

यातील आरोपीं निवृत्ती पैलवान व त्याची पत्नी सुरेखा पैलवान या दोघांनी फिर्यादी आशिष पाटील याचा विश्वास संपादन करून त्यांना शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवणूक करण्यास भाग पाडले. त्यांना ५ टक्के दराने मोबदला देण्याचे आमिष दाखवून त्यांच्या कडून वेळोवेळी रोख व ऑनलाईनच्या माध्यमातून एकूण ८० लाख रुपये घेतले. परंतु पाटील यांना ठरल्याप्रमाणे कोणताही मोबदला न देता त्यांची फसवणूक केली. याबाबत आशिष अशोक पाटील विजापूर नाका पोलिसात गुन्हा दाखल केल्यानंतर या गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला.

या गुन्ह्यात पोलिसांनी निवृत्ती पैलवान यास अटक करून पोलिस कोठडी घेतली होती. पोलिस कोठडीमध्ये झालेल्या तपासात या गुन्ह्यात फसवणुक झालेल्यांची संख्या ही ११ झाली असून फसवणुकीची रक्कम ही २ कोटी ९३ लाख ३५ हजार इतकी झाली आहे. पैलवान याच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्याने त्यास गुरुवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यावेळी न्यायाधीश राणे यांनी पैलवान यास न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. या गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक जीवन निरगुडे करीत आहेत.

# भाड्यावरून वादावादी घरमालकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
शहरातील दमाणी नगर परिसरात घराच्या भाड्यावरून घरमालक व भाडेकरू यांच्यात वादावादी होऊन घरमालकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना १३ फेब्रुवारी रोजी घडली.



याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन वैभव चौधरी, मोहन चौधरी, विशाल चौधरी, शैलेश चौधरी, शैलेश चौधरीचा लहान भाऊ, दोन अनोळखी बायका यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील पिडीत महिला ही तिच्या कुटुंबासमवेत वैभव चौधरी यांच्या घरात दमाणी नगर येथे भाड्याने राहात होती. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी पिडीत महिला ही घरी असताना घरमालक वैभव चौधरी, विशाल चौधरी हे घरी आले. त्यांनी पिडीतेकडे भाडे मागितले. त्यावेळी पिडीतेने भाडे देण्यासाठी दोन दिवसाची मुदत मागितली. त्यावेळी चौधरी यांनी पिडीतेला अश्लिल शिवीगाळ करून तिचा विनयभंग केला. तसेच दोन अनोळखी बायकांनी घरातील साहित्य घराबाहेर आणून ठेऊन घराला कुलूप लावले. म्हणून फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक आर पी खंडागळे पुढील तपास करीत आहेत.

## 'क्लिक टू अचीव्ह पार ॲडव्हान्टेज' उत्पादन सादर

**सोलापूर :** एचडीएफसी लाइफ या भारतातील आघाडीच्या आयुर्विमा कंपनीने एचडीएफसी लाइफ क्लिक टू अचीव्ह पार ॲडव्हांटेज हे आपले नवीनतम उत्पादन सर्वांसमोर आणले आहे. यावेळी अनीश खन्ना म्हणाले कि,आयुर्विमा उत्पादने ही प्रत्येक व्यक्तीच्या विशिष्ट गरजांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने विकसित केलेली असावीत. अधिक चांगला भविष्यकाळ निर्माण करण्यासाठी तसेच आर्थिक सुरक्षा उपायांच्या मदतीने अनिश्चिततांपासून आयुष्याचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्नशील व्यक्तींना एक साधन पुरवण्याच्या उद्देशाने हे उत्पादन विकसित करण्यात आले आहे.

॥ जो जे वांछिल तो ते लाहो ॥

मनोरमा परिवार अंतर्गत

**श्री सदाशिव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर**

कोटणीस नगर, विजापूर रोड, सोलापूर

**ग्राहकांच्या आग्रहास्तव खास ठेव योजना**

९० दिवसांसाठी ९.००% व्याजदर
६० दिवसांसाठी ८.००% व्याजदर
९९ महिन्यात दामदुप्पट ठेव योजना

अधिक महितीसाठी संपर्क

श्री. पुरुषोत्तम अनंत साखरे, चेअरमन (मो. ९१७५३६३९४५)
श्रीमती अनिता सुरेशराव जगताप, व्यवस्थापिका (मो. ८७८८३७४४३६)

# प्रेयसीच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**
प्रेयसीच्या अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिला मारहाण केल्याप्रकरणी एका महिलेसह दोघांविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत पिडीत अल्पवयीन मुलीच्या फिर्यादीवरुन एका महिलेसह नितीन राजकुमार वनसाळे (रा. बाळे, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील महिला ही पिडीतेची आई असून ती आणि नितीन वनसाळे हे एकत्रित राहतात. फेब्रुवारी महिन्यात वेगवेगळ्या दिवशी नितीन वनसाळे आणि पिडीतेच्या आईने पिडीतेला तसेच तिच्या भावाला वारंवार जबर मारहाण केली. याबाबत पिडीतेने चाईल्ड हेल्पलाईनला फोन करून याबाबत माहिती दिल्यावर पिडीतेला सोडविण्यात आले. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहायक फौजदार जाधव पुढील तपास करीत आहेत.

## पीएनजीच्या चेन, बँगल्स महोत्सवाला सुरुवात

**सोलापूर :** पीएनजी ज्वेलर्सने आपल्या ग्राहकांसाठी बहुप्रतीक्षित चेन आणि बँगल्स महोत्सवाची सुरुवात केली आहे.मर्यादित कालावधीसाठी असलेला हा विशेष महोत्सव पीएनजी ज्वेलर्सच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध असेल आणि स्टॉक संपेपर्यंत सुरू राहील.ग्राहकांना मेकिंग चार्जेसवर थेट १५% सवलत मिळणार आहे. संचालक डॉ. सौरभ गाडगीळ म्हणाले, चेन आणि बँगल्स महोत्सव हा आपल्या समृद्ध आणि सांस्कृतिक वारशाचा उत्सव आहे,जिथे प्रत्येक ग्राहकाला त्याच्या आवडीनुसार आणि शैलीशी सुसंगत असा परिपूर्ण दागिना मिळावा.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-निविदा सूचना**

वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TR/GSU), मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. निविदा क्रमांक: SUR/GSU/TD/T/2024/03R च्या संदर्भात कामाचे इलेक्ट्रिकल TRD भाग कामाचे नाव: 1) ADEN/PVR अंतर्गत पंढरपूर (PVR) स्टेशनवर 6.00 मीटर रुंद 2nd FOB 2) वाडी स्टेशन (NSG4) येथे नवीन FOB (6 मीटर रुंद) ची तरतूद आणि विद्यमान संरचनेचे स्थलांतर. (पुन्हा निमंत्रण). अंदाजे किंमत: 22,15,419.08/- बोली सुरक्षा: 44,300.00/- पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने ऑफरची वैधता: 60 दिवसांची तारीख आणि वेबसाइटवर निविदा बंद होण्याची वेळ: 27/03/2025 15.00 वाजता. ANJ-40

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ - शास्त्री नगर नगर व झोपडपट्टी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं. ४०३ ही मिळकत घरजागा आमचे अशिल इस्माईल बाशामिया सातखेड यांचे वडील पै. बाशामिया अलाउद्दीन सातखेड यांचे नावावर असून सदर ठिकाणी त्यांचे मालकीचे चार खोल्या आहेत. सदरच्या खोल्या वीट, मातीने बांधलेले वरती पन्हाळी पत्रे, वासे घातलेले आहेत.

आमचे अशिलांचे वडील पै. बाशामिया अलाउद्दीन सातखेड यांचे दिनांक. १७/०१/२००४ रोजी सोलापूर येथे राहते घरी मृत्यु झालेला आहे व तसेच आमचे अशिलांचे आई जहीराबी बाशामिया सातखेड यांचेही आमचे अशिलाचे बालपणीच मृत्यु झालेला आहे. या दोघांचे मृत्युपश्चात आमचे अशिल इस्माईल बाशामिया सातखेड मुलगा या नात्याने कायदेशीर वारस आहेत. यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत.

सदर ठिकाणी आमचे अशिल हे त्यांचे हयातीपासूनच सदरहू घरजागेवर आजपावेतो कुटुंबासह राहणेस आहेत. सदरहू घरजागेवरील आमचे अशिलांचे मयत वडील पै. बाशामिया अलाउद्दीन सातखेड यांचे नाव कमी करुन इस्माईल बाशामिया सातखेड यांचे नावाची सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नावे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल सोलापूर महानगरपालिकेकडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नावाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी विभाग, ग.व.सु. विभागाचे दप्तरी नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख : २७/०२/२०२५

सही/-
**ढेकणे एस.एम.**
**ॲडव्होकेट**
**रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे,**
**ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

Classifieds

**विकणे आहे**

**सैफुल ओमगर्जना चौक, प्लॉट नं. १७ व १८ प्रत्येकी ३,००० स्क्वे. फूट, खुला N.A. क्लिअर टायटल प्लॉट विकणे आहे.**
**संपर्क : ९७६६१५५२१४ ८२७७४९९६२९**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी शहर बार्शी येथील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी बार्शी म्यू पल हद्दीतील गट नं. ८२० पैकी प्लॉट नं. ७ याचे क्षेत्र २३१.०९ चौ.मी., असे असुन, यासी चतुःसिमा **पुर्वेस-** पारिजात हौसिंग सोसायटी, **दक्षिणेस-** श्री. शिवाजी महाविद्यालयाची मिळकत, **पश्चिमेस-** ९.१५ मी. रुंदीचा रस्ता व **उत्तरेस-** प्लॉट नं. ६ चेके यांचा प्लॉट असून याची पाणी वागणूक पश्चिमेकडील रस्त्याने जाते व आहे. येणेप्रमाणे चतुः सीमापुर्वक संपूर्ण प्लॉट आतील सर्व दगड माती व इतर तदंगभूत वस्तूसह तसेच वहिवाटीच्या हक्क व अधिकारासह.

सदर नमूद प्लॉटजागा ही **सौ. विधुलता बाबुराव भुरे व सौ. पल्लवी जयप्रकाश कोरे, रा. बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर** यांचे खरेदी मालकीची व कब्जेवहिवाटीची व ७/१२ सामाईक हक्कपत्रकी नोंद असलेली असून सदर मिळकत त्यांनी त्यांचे कौटूंबिक अडचणीकरीता व इतर कायदेशीर गरजेकरीता आमचे अशिलास विक्री करण्याचे ठरवले आहे. त्याप्रमाणे सदर प्लॉट जागेबाबत आमचे अशिलासोबत **सौ. विधुलता बाबुराव भुरे व सौ. पल्लवी जयप्रकाश कोरे,** यांनी इसारपावती व्यवहार केलेला आहे व सदर व्यवहारापोटी काही इसारादाखल रक्कमही स्विकारलेली आहे.

तरी सदर प्लॉट जागेबाबत कोणाचे कसलेही अधिकार, हक्क, म्हणजे साटेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, बहिण हिस्सा, चोळी बांगडी, गहाणपट्टा, बटईपत्र, विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही हक्क असल्यास ते कागदोपत्री पुराव्यासह आमचे कार्यालयात ०८ दिवसात लेखी हरकत नोंदवावी. कागदोपत्री पुराव्याशिवाय हरकत आल्यास त्याचा विचार करण्यात येणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास सदर प्लॉटजागेवर कोणाचाही हक्क नाही असे समजून आमचे अशिल सदर प्लॉटजागेबाबत खरेदीखत करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. २७/०२/२०२५

सही/-
**ॲड. सुरज संजय जामदार,**
**पत्ता:-** शिंदे प्लॉट, उपळाई रोड, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
**अशिलातर्फे ॲड**

## जाहीर प्रसिध्दीकरण

### जागा/जमीनीचे खरेदीखत दस्त हरविल्याबाबतचे

तमाम लोकांस विशेषतः जिल्हा सोलापूर ता. माढा पैकी माढा शहर व उपळाई (खु.) हद्दीतील व माढा तालुक्यातील आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर प्रसिध्दीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णनः-** अ) डि. सोलापूर सब. डि. व ता. माढा पैकी मौजे- माढा शहर नगरपंचायत हद्दीतील सि.स.नं. २२३५ ही घर मिळकतीची जागा याचे क्षेत्रफळ ४९१ चौ.मी., यांसी चतुःसिमा पुर्वेस- सि.स.नं. २२३५ पैकी राहिलेली जागा, दक्षिणेस सार्वजनिक बोळ, पश्चिमेस-मेन रोड व उत्तरेस- कथले यांची जागा व सामाईक बोळ, येणेप्रमाणे चतुः सिमापुर्वक घर जागेचा रजि. खरेदीखत दस्त क्र. २७८७/१९९२ चा दस्त आणि

ब) डि. सोलापूर सब. डि. व ता. माढा पैकी मौजे उपळाई (खु.) ग्रामपंचायत हद्दीतील सि.स.नं. ५४१ व यांसी ग्रामपंचायत नं. २०१ याचे क्षेत्रफळ १२७.५ चौ.मी. यांसी चतुःसिमा पुर्वेस- रस्ता, दक्षिणेस- हुकुम कोठारी यांची जागा, पश्चिमेस कदम यांची जागा व उत्तरेस - महाडिक यांची जागा. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक घर जागेचा रजि. खरेदीखत दस्त क्र. ६६१/२००७ हे दस्त आमचे अशिलांकडुन अनावधानाने गहाळ होऊन हरविलेले आहेत, ते अद्यापपर्यंत आढळून आलेले नाहीत.

तनंतर सदर मिळकती संदर्भाने मिळकती हस्तांतरणाचे कोणतेही व्यवहार केलेले नव्हते व नाहीत अथवा व्यवहाराबाबत कोणाकडुनही इसार म्हणुन रक्कम देखील स्विकारलेली नाही. तसेच सदर मिळकतींवर कोणत्याही बँकेकडून कर्ज घेतलेले नाही.

तरी, तमाम लोकांना कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतींचे खरेदीदस्त मिळाल्यास त्याचा गैरवापर करु नये, सदरचे दस्त मिळाल्यास खालील पत्यावर आणुन दयावेत. सदर दस्ताचे अनुषंगाने कुणीही कोणत्याही प्रकारचे बनावट कागदपत्रे तयार करुन मिळकतीबाबत व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार हा आमचे अशिलावर अथवा आमचे अशिलाचे हक्कावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तरी, सदर मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, सदर मिळकतीबाबत पुर्व साठेखत, गहाणखत, खरेदीखत, भाडेपट्टा, दान, लिज, पोटगी, बोजा, बक्षीस, मृत्युपत्र किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त करु नये, कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास या जाहीर प्रसिध्दीकरणापासून ०८ दिवसाचे आत खालील पत्यावर कळवावी, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण दिले असे. दि. २७/०२/२०२५

सही/-
**ॲड. सुप्रिया शेखर गुंडपाटील**
**धर्माधिकारी प्लॉट, गाडेगांव रोड, बार्शी,**
**ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो. नं. ९५११८२१३१४**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. २०/२०२५
निशानी नं. ५

### बार्शी येथील मे. सह. दिवाणी न्यायाधिश क. स्तर बार्शी यांचे न्यायालयात

**सुनिल शंकर वाघमोडे, वगैरे** - **अर्जदार**
विरुध्द
**कोणीही नाही** - **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. १ ते ३ हे मयत शंकर तुकाराम वाघमोडे यांचे वारस आहेत. तसेच मयत शंकर तुकाराम वाघमोडे यांचे कायदेशीर वारस म्हणून अर्जदारांचे नांवे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत यातील अर्जदार यांनी सदरचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी त्याकामी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश व्हावेत म्हणून अर्जदाराने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी यातील अर्जदार हे मयत शंकर तुकाराम वाघमोडे यांचे वारस आहेत अथवा कसे त्याबाबत त्यांना वारस प्रमाणपत्र देणे कामी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश देऊन तसे वारस प्रमाणपत्र देणेकामी जर का कोणाचीही हरकत अथवा तक्रार असलेस हे प्रसिध्दीकरण प्रसिध्द झालेपासून पुढील नेमलेल्या ता. २८/०३/२०२५ रोजीपर्यंत मे. कोर्टात हजर राहून स्वतः अगर आपल्या विधिज्ञा मार्फत म्हणणे मांडावेत तसे मुदतीत करणेस कसुर केल्यास त्या अर्जाचा अनुषंगाने पुढील योग्य ते आदेश पारीत होतील याची नोंद घ्यावी हे प्रसिध्दीकरण दिले असे, ता. १८/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपिक** | कोर्टाचा शिक्का | सही/- **सहा. अधिक्षक दिवाणी न्यायालय क. स्तर, बार्शी**

## जाहीर प्रसिध्दीकरण

सिव्हिल किरकोळ अर्ज क्रं. ९/२०२५
निशाण नं. ५

### अक्कलकोट येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो, यांच्या कोर्टात

**१. श्रीमती जिनत हजरत बिलाल सय्यद**
वय - ३२ वर्षे, धंदा - घरकाम
**२. निहाद हजरत बिलाल सय्यद**
वय-३ वर्षे, धंदा - काही नाही
**३. सामिया हजरत बिलाल सय्यद**
वय २ वर्षे, धंदा - काही नाही
रा. २०३८, रामवाडी, पारशी बंगला, सोलापूर — **अर्जदार**
विरूध्द
**श्रीमती जहीराबी निसार अहमद सय्यद**
वय ४८ वर्षे, धंदा - घरकाम
रा. मुजावर गल्ली, अक्कलकोट,
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — **सामनेवाला**

ज्याअर्थी कै. हजरत बिलाल निसार अहमद सय्यद यांचे दि. २३/०४/२०२१ रोजी सोलापूर येथील जिशान हॉस्पिटल मध्ये उपचारादरम्यान मयत झालेले आहेत. त्यांच्या पश्चात यातील अर्जदार यांनी अक्कलकोट येथील सिटी सर्व्हे नं. १४१७/अ त्यासी क्षेत्र ४३.० चौ.मी., १४२२ त्यासी क्षेत्र ४२.१ चौमी., १४२३/३ त्यासी क्षेत्र ७९.६ चौ.मी. या मिळकतीवर वारसदार म्हणून आपल्या नावाची नोंद होऊन मिळणेकरीता या मे कोर्टात वारस अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जदार हिस वारस दाखला देण्याकरीता कुणाचेही हरकत तक्रार म्हणणे इत्यादी असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाच्या आत किंवा दि. ०८/०४/२०२५ रोजी स्वतः अगर वकीलामार्फत पूराव्यानिशी हजर राहून आपले म्हणणे सादर करावे अन्यथा कुणाचेही तक्रार नाही असे समजून पुढील आदेश पारीत करण्यात येतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले असे तारीख : २५/०२/२०२५

सही/- **कनिष्ठ लिपिक** | कोर्टाचा शिक्का | सही/- **सहा. अधिक्षक दिवाणी न्यायाधीश सो, कनिष्ठ स्तर अक्कलकोट**

## प्रकरण वर्ग झालेबाबतची जाहीर नोटीस

स्पे.द. नंबर ४३/२०२३ नि-४०

### माढा येथील मे. सि. ज. सि. डी. साहेब यांचे कोर्टात

**(श्री. ए.ओ. जैन साहेब कोर्ट)**

ऋषिकेश रमेश बागल / वगैरे -- वादी (D.H)
**विरुध्द**
विक्रमसिंह (दादा) शिंदे ग्रामीण बि. शेती सहकारी पतसंस्था मर्या, लहु ता. माढा/वगैरे -- प्रतिवादी (J.D)

ज्याअर्थी यातील वादी (D.H) / वगैरे यांनी प्रतिवादी नंबर १२ हरिदास जालिंदर अवचर रा. लहु ता. माढा, जि. सोलापूर हल्ली रा. अरुण पाटील यांचे घरी, पोलीस कॉलनी समोर, परंडा, ता. परंडा, जि. धाराशिव यांचे विरुध्द यातील हल्ली नमुद पत्यावर बेलिफ सदरची दरखास्त माढा कोर्टात वर्ग झालेबाबतची नोटीस बजावणेसाठी गेली असता सदरचे प्रतिवादी नंबर १२ हे आमचे इथं भाडयाने राहत होते, आता ते येथे राहत नाही असे बेलिफ रिपोर्ट आलेवरुन,

**प्रतिवादी नंबर १२ -** हरिदास जालिंदर अवचर
रा. लहु ता. माढा, जि. सोलापूर

या प्रतिवादीं नंबर १२ यांना या जाहीर प्रकरण वर्ग झालेबाबतचे नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, वादी (D.H) यांनी आपले विरुध्द माढा दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे स्पे.द.नंबर ४३/२०२३ ची दाखल केलेली असुन सदरची दरखास्त ही बार्शी येथील वरिष्ठ कोर्टातुन माढा येथील वरिष्ठ न्यायालयामध्ये वर्ग झालेली आहे व त्याकामी पुढील नेमलेली ता. १७/०४/२०२५ रोजी या कोर्टात स्वतः अगर वकिलांमार्फत हजर राहावे, तसेच आपला राहता पत्ता, मोबाईल नंबर सादर करावा. वरिल तारखेस गैरहजर राहिलेस आपले काही म्हणणे नाही असे समजुन पुढील योग्य ते आदेश केले जातील.

**माझे सही व शिक्यानिशी प्रसिध्द केले असे. तारीख २७/०२/२०२५**

सही/- **सहाय्यक अधिक्षक सि.ज.सि.डी. सो कोर्ट माढा ता. माढा, जि. सोलापूर** | शिक्का | सही/- **कनिष्ठ लिपीक सि.ज. सि.डी. सो कोर्ट माढा, सा. माढा, जि. सोलापूर**

## FORM VII
## (SEE RULE 11 (1))

NOTICE FOR APPEARANCE UNDER SECTION 13(1) OF THE PROTECTION OF WOMEN FROM DOMESTIC VIOLENCE ACT, 2005 IN THE COURT OF 9th JUDICIAL MAGISTRATE FIRST CLASS AT, LATUR

**IN THE MATTER OF PWDVA NO. 108/2018**

**Priyanka Dinesh Murumkar**
Vs
**Dinesh Sambhaji Murumkar**

To,
1) Dinesh Sambhaji Murumkar - 9834059104
2) Savita Jagdish Rokde
3) Baby Navnath Sonkamble
4) Navnath Bhujang Sonkamble
R/o. All Above Panchyat Samiti, Akkalkot,
Tq. Dist. Solapur.

Where as the petitioner has filed an application under section of the protection of women from Domestic Violence Act, 2005 (43 of 2005).

You are hereby directed D.V. act to appear before this court on the 21/04/2025 11.00 O'clock in the afternoon personally or through a duly authorized counsel of this court to show cause why the relief claimed by the applicant against you should not be granted failing which the court shall proceed Ex-party against you.

Given under my hand the seal of the court of 15.02.2025.

Court Stamp

**Sd/-**
**(Asst. Supdt)**
**Chief Judicial Magistrate Court, Latur**

## सोलापूर महानगरपालिका सोलापूर

पत्ता - इंद्रभुवन, पुण्यश्लोक आप्पासाहेब वारदपथ, रेल्वे लाईनस सोलापूर -४१३००१
नगर अभियंता कार्यालय, बांधकाम-२ विभाग
EMIL-SMCAECIVILWORKS@GMIL.COM मो. ७७४४००९९७९

जा.क्र./नगर अभियंता/बांधकाम-२/२२४१ दि.२७/२/२०२५

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सोलापूर महानगरपालिकेमार्फत नगर अभियंता खात्याकडील काही विशिष्ट कामासाठी स्ट्रक्चरल डिझाइन तसेच स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी तपासणीकामी स्ट्रक्चरल इंजिनिअरचे पॅनल तयार करावयाचे आहे. त्यासाठी इंडियन सोसायटी ऑफ स्ट्रक्चरल इंजिनिअरकडे नोंदणीकृत असलेल्या स्ट्रक्चरल इंजिनिअरकडून निविदा मागवित आहेत.

**E-Tender ID - 2025_SMC_1143026_1**

या कामाचे टेंडर शासनाच्या **http:/www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर दि. २६/०२/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता पासून उपलब्ध असेल.

क. दि. २५/०२/२०२५

सही/-
**उपअभियंता**
**बांधकाम १ व २ विभाग**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत ही शिंदे कुटंबाची मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची तसेच वडिलोपार्जित मिळकत असून सदर मिळकतीत आमचे अशिल श्रीकांत औदुंबर शिंदे यांचा वडिलोपार्जित मिळकतीमध्ये हक्क, संबंध व मालक या नात्याने सदर मिळकतीच्या ७/१२ उता-यास सदरील नावे आहेत. आमचे अशिल श्रीकांत औदुंबर शिंदे यांचे नाव त्याचे वडिल मयत झाल्यानंतर त्यांची आई व इतर मुलांची नावे वारस या नात्याने मालक म्हणून सातबाराच्या उता-यास नावे लागलेली आहेत. सदरची मिळकत ही वडीलोपार्जित असल्याने सदर मिळकतीचे अदयापपर्यंत सरसनिरस मानाने वाटप झालेले नाही असे असताना सदर मिळकतीच्या ७/१२ सदरी इतर शिंदे म्हणजेच अशोक शिंदे, तुकाराम शिंदे, दिगंबर शिंदे, चंद्रकांत शिंदे, नंदा शिंदे, युवराज शिंदे, निलेश शिंदे, दिपक शिंदे यांची नावे ७/१२ सदरी असल्याने त्याचाच फायदा घेवून सदरची मिळकत शिंदे कुटुंबातील इतर लोकं या मिळकतीचे खरेदीखत, बक्षीसपत्र, गहाण, दान, लीज, कुलमुखत्यापत्र, वारसाहक्क, ताबा, लीज पैडसी, लीव्ह लायसन्स, भाडेपट्टा, कुळ, पोटगी, तोंडी अथवा लेखी करार मदार करण्याची शक्यता आहे तरी इत्यादी प्रकारचे कोणतेही व्यवहार करू नये असे केल्यास ते निरर्थक ठरेल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच याउपर असे व्यवहार केल्यास ते आमच्या अशिलांच्या मालकी व ताबे वहिवाटीवर कधीही बंधनकारक राहणार नाहीत. तसे केल्यास ते रद्दबातल होतील त्याचप्रमाणे पुढे जावून कोणतीही कसलीही कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही सावधानतेची जाहीर नोटीस प्रसिध्द केली असे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन-** अ) जि. सोलापूर, ता. पंढरपूर यांचे नगरपालिका हद्दीतील गाव मौजे आढीव येथील मिळकत गट नं ८९ यांसी एकून क्षेत्र ३ हे ३८ आर यांसी आकार रू. ४ ८० पै यांसी चतुःसीमा
पूर्व : गट नं ९१ भोसले व पवार यांचे क्षेत्र, पश्चिम : गट नं. ८८ तानाजी शिंदे यांचे क्षेत्र
दक्षिण : गट नं. ८७ पवार यांचे हद्दीतील रस्ता उत्तर : गट नं. ९० शिंदे यांचेमधील सामाईक क्षेत्र

ब) जि. सोलापूर, ता. पंढरपूर यांचे नगरपालिका हद्दीतील गाव मौजे अढीव येथील मिळकत गट नं. ९०/२/ब यांसी एकूण क्षेत्र २ हे ४३ आर यांसी आकार रू. १. ८५पै. यांसी चतुःसीमा
पूर्व : गट नं. ९१ भोसले यांचे क्षेत्र, पश्चिम : रस्ता व गट नं. ८८ तानाजी शिंदे यांचे क्षेत्र
दक्षिण : गट नं. ८८ तानाजी शिंदे व गट नं. ८९ अशोक शिंदे व इतर सामाईक क्षेत्र
उत्तर : गट नं. ११६ कबाडे

यांची जमीन येणेप्रमाणे जाहिर नोटीस प्रसिध्द.

सही/-
**ॲड. संतोष सुरेश शिरसीकर ॲडव्होकेट**
पत्ता - फ्लॅट नं. ११, ३ रा मजला, वैष्णवी हाईटस, गणपती ज्वेलर्स जवळ, घायरी फाटा सिंहगड रोड, पुणे ४११०४१
मो.नं. ९५५२४६९९७४/७४९८९३००९४

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### ओडिशा एफसीची प्ले-ऑफसाठी धडपड

**भुवनेश्वर** : इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ मध्ये कलिंगा स्टेडियमवर शुक्रवारी ओडिशा एफसा आणि मोहम्मेडन एससी यांच्यादरम्यान महत्त्वपूर्ण सामना खेळला जाणार आहे. ओडिशा एफसीला प्ले-ऑफमध्ये स्थान मिळविण्याच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी या सामन्यातून तीन गुण मिळविणे आवश्यक आहे व हेच ओडिशाचे लक्ष्य आहे. गत पाच सामन्यांमध्ये घरच्या संघाला दोनदा पराभव आणि बरोबरी मिळाली आह. त्यामुळे ओडिशा संघाला अव्वल ६ मध्ये स्थान मिळवण्याच्या संधींना धक्का बसला आहे. ते सध्या २२ सामन्यांमधून २९ गुणांसह सात विजय आणि आठ बरोबरीसह सातव्या स्थानावर आहेत. सहाव्या स्थानावर असलेल्या मुंबई सिटी एफसी (३२) पेक्षा तीन गुणांनी मागे आहेत. ईस्ट बंगाल एफसी आणि केरळ ब्लास्टर्स एफसीशी देखील स्पर्धा करत आहेत, त्यांचे २२ व २१ सामन्यांमध्ये अनुक्रमे २७ आणि २४ गुण आहेत. ओडिशा एफसीला अशीही आशा आहे की मुंबई सिटी एफसी आणि/किंवा नॉर्थईस्ट युनायटेड एफसी पुढे गुण गमावतील आणि सर्जियो लोबेरा यांच्या प्रशिक्षकपदाखालील संघ स्पर्धेच्या पुढील टप्प्यांसाठी शर्यतीत राहील. दुसरीकडे मोहम्मेडन एससीला गत पाचही सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे आणि २१ सामन्यांतून ११ गुणांसह ते तळाशी आहेत.

### सिंधूने केले सचिन तेंडुलकर विराट, नीरजला नामांकित



**नवी दिल्ली** : दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'लठ्ठपणाविरुद्ध लढा' मोहिमेत सहभागी होण्यासाठी आपल्या दैनंदिन दिनचर्येतून तेल कमी करण्याचे वचन दिले. तिने पुढे सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि टोकियो ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा यांना या चळवळीत सहभागी होण्यासाठी नामांकित केले. सिंधूला दुहेरी ऑलिम्पिक कांस्यपदक विजेती नेमबाज मनू भाकर यांनी नामांकन दिले आणि सचिन, विराट, नीरज, दिग्गज क्रीडा स्टार- अंजू बॉबी जॉर्ज, सानिया मिर्झा, मेरी कोम, गगन नारंग, वीरेन रस्किंहा - आणि तेलुगू चित्रपट अभिनेते महेश बाबू आणि चिरंजीवी कोनिडेला यांच्यासह १० जणांना ही जबाबदारी सोपवली. सिंधूने एक्सवर लिहिले, "मला नामांकित केल्याबद्दल धन्यवाद. माझ्या समोसे आणि पकोड्यांबद्दल बोलण्याची वेळ आली आहे असे दिसते - "तुम्ही नाही, मी आहे. निरोगी भारतासाठी कमी तेल खा, अधिक कष्ट करा!" पुढील लोकांना नामांकित करण्याची जबाबदारी मी या अविश्वसनीय विजेत्यांना देत आहे," ती पुढे म्हणाली. यापूर्वी, नाऊ आणि टोकियो ऑलिम्पिक रौप्यपदक विजेती भारोत्तोलक मीराबाई चानू यांनी लठ्ठपणाविरुद्धच्या लढाईत भाग घेतला आणि या कारणासाठी जागरूकता पसरवण्यासाठी प्रत्येकी १० जणांना नामांकित केले.

### मेदवेदेव उपांत्यपूर्व फेरीत



दुबई : बुधवारी दुबई टेनि चॅम्पियनशिपमध्ये सहाव्या क्रमांकावर असलेल्या रशियाच्या डॅनिल मेदवेदेवने फ्रान्सचा २१ वर्षीय जियोव्हानी म्पेत्शी पेरिकार्डवर ६-४, ६-४ असा विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरी गाठली. आता मेदवेदेवचा पुढील सामना टॅलोन ग्रिक्सपूरशी होईल. टॅलोनने गतविजेत्या उगो हम्बर्टला ४-६, ६-३, ६-२ असा पराभवाचा धक्का देत आगेकूच केली. २०१४ च्या अमेरिकन ओपन विजेता मारिन सिलिकने पहिल्या फेरीत दुसऱ्या मानांकित ॲलेक्स डी मिनौरला पराभूत केले होते. त्याने ॲलेक्से पोपिरिनला ५-७, ६-३, ६-४ असे हरवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. रशियन खेळाड मेदवेदेवने २३० किमी प्रति तास (143 मैल प्रति तास) पेक्षा जास्त वेगाने सर्व्हिस केली. मी केवळ आपला सर्वोत्तम खेळ करण्याचा प्रयत्न केला व मी आज खूप चांगला खेळलो, असे मेदवेदेव पुढे म्हणाला.

### जडेजाची 'कॉफी डेट'

दुबई : दुबईमध्ये सरावाच्या ब्रेक दरम्यान भारताचा अष्टपैलू रवींद्र जडेजा कॉफीच्या कपसोबत आराम करत होता. रविवारी शेवटच्या गट साखळी सामन्यात न्यूझीलंडविरुद्ध सामना करण्यापूर्वी भारताला एक आठवडा सुट्टी आहे. पहिल्या दोन सामन्यात बांगलादेश आणि पाकिस्तानला हरवून त्यांनी चॅम्पियन्स चषकाच्या उपांत्य फेरीत प्रवेश मिळवला आहे. दोन सामन्यात एक बळी घेणाऱ्या जडेजाने स्थानिक मॉलमध्ये कॉफी पिण्यासाठी थोडा वेळ काढला. 'दुबईमध्ये कॉफी डेट,' असे त्याने इंस्टाग्राम पोस्टला कॅप्शन दिले.

# दानिश मालेवार १५३, विदर्भ ३७९

## रणजी करंडक अंतिम सामना

### आदित्य सरवटे नाबाद ६६ केरळ ३ बाद १३१



आदित्य सरवटेची नाबाद अर्धशतकी खेळी



प्रारंभीच केरळला दोन धक्के देणारा दर्शन नळकांडे

◆ **नागपूर, २७ फेब्रुवारी**
व्हीसीए स्टेडियमवर सुरु असलेल्या प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दुसऱ्या दिवशी दानिश मालेवारच्या दीडशतकी खेळीच्या जोरावर विदर्भाने केरळविरुद्ध पहिल्या डावांत १२३.१ षटकांत सर्वबाद ३७९ धावा उभारल्या. प्रत्युत्तरात मूळ विदर्भाचा, परंतु सध्या केरळचे प्रतिनिधीत्व करत असलेल्या अष्टपैलू आदित्य सरवटेने नाबाद ६६ धावांची खेळी करत दिवस अखेरपर्यंत केरळला पहिल्या डावांत ३९ षटकांत ३ बाद १३१ धावांपर्यंत मजल मारून दिली. केरळ अजूनही २४८ धावांनी पिछाडीवर आहे.

विदर्भाने ४ बाद २५४ धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. कालचे नाबादवीर दानिश मालेवार व यश ठाकूरने सकाळच्या सत्रात आपल्या संघाच्या खात्यात ३६ धावांची भर घातली. दरम्यान दानिश मालेवारने आपल्या दीडशे धावांचा टप्पा गाठला. याचवेळी नेदुमनकुझी बासिलने दानिशची घोडदौड रोखली. दानिश मालेवारने २८५ चेंडूंत १५ चौकार व ३ षट्कारांसह १५३ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. मालेवारने यश ठाकूरसोबत पाचव्या गड्यासाठी ५१ धावांची भागीदारी केली. पुढे यश ठाकूरला बासिलने पायचित केले. यश ठाकूरने ६० चेंडूंत २ चौकारांसह २५ धावा केल्या. नंतर एडन ॲपल टॉम विदर्भासाठी घातक ठरला व त्याने यश राठोड (३) व कर्णधार अक्षय वाडकरला (२३) तंबूचा रस्ता दाखवला. अक्षय कर्णेवार (१२) जालाज सक्सेनाच्या गोलंदाजीला बळी पडला. अकराव्या क्रमांकावर खेळणाऱ्या नचिकेत भुतेने ३८ चेंडूत ३२ धावा केल्या. दहाव्या गड्यासाठी भुते व हर्ष दुबे यांच्यात ४४ धावांची भागीदारी झाली. उपहारानंर काही काळातच विदर्भाचा पहिला डाव ३७९ धावांवर आटोपला.

केरळकडून मोहम्मद निधीश व ईडन ॲपल टॉमने प्रत्येकी ३ बळी, बासिलने २ बळी, तर जालाज सक्सेनाने एक ब ळी टिपला.

प्रत्युत्तर देताना प्रारंभीच केरळच्या डावाला भगदाड पडले. विदर्भाचा वेगवान गोलंदाज दर्शन नळकांडेने पहिल्या दोन षटकांत अक्षय चंद्रन (१४) व रोहन कुन्नूमल (०) या सलामी जोडीला तंबूत परत पाठवले. केरळने २.३ षटकांत १४ धावांत आपली सलामी जोडी गमावली. मात्र त्यानंतर मूळ विदर्भाचा परंतु सध्या केरळचे प्रतिनिधित्व करत असलेल्या आदित्य सरवटेने अहमद इम्रानच्या साथीने केरळचा डाव सावरला. या दोघांनी ९३ धावांची भागीदारी करत केरळला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. यश ठाकूरच्या बाऊन्सरवर अहमद इम्रानचा उडालेला झेल बदली खेळाडू मोखाडेने पकडला. इम्रानने ३७ धावा केल्या.

पुढे दिवस अखेर आदित्य सरवटे व कर्णधार सचिन बेबीने नाबाद खेळी करत दिवस अखेर केरळला पहिल्या डावात ३ बाद १३१ धावांचा टप्पा गाठून दिला. विदर्भाकडून दर्शन नळकांडेने २ बळी, तर यश ठाकूरने एक बळी मिळवला.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

# उपांत्य फेरीपूर्वी भारताचा स्टार खेळाडू पडला आजारी

◆ **दुबई, २७ फेब्रुवारी**
टीम इंडियाचा पुढील लीग सामना न्यूझीलंडशी असेल. हे दोन्ही संघ आधीच उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले आहेत आणि हा सामना पॉईंट टेबलमध्ये पहिल्या स्थानाच्या लढाईसाठी असेल. या सामन्यासाठी टीम इंडिया जोरदार सराव करीत आहे. त्याचवेळी शुभमन गिलची तब्येत बिघडल्याने सामन्यापूर्वी टीम इंडियाचा ताण वाढला आहे.




भारतीय संघाचा पुढील सामना २ मार्च रोजी न्यूझीलंडशी होईल. सराव सत्रात कर्णधार रोहित शर्मा आणि उपकर्णधार शुभमन गिल दोघेही अनुपस्थित होते. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात हिटमनला हॅमस्ट्रिंगची दुखापत झाली. दरम्यान, गिलची तब्येत बिघडल्याने तो सरावात सहभागी झाला नाही, असे सांगण्यात येत आहे.

एका वृत्तानुसार, शुभमन गिलने प्रकृती अस्वास्थ्यामुळे सराव सत्रात भाग घेतला नाही. तथापि, न्यूझीलंडविरुद्धच्या सामन्यापूर्वी गिल बरा होण्याची अपेक्षा आहे. दुसरीकडे, आजारी ऋषभ पंतनेही झालेल्या सराव सत्रात घाम गाळला. याशिवाय, मोहम्मद शमीने फलंदाजांना जोरदार गोलंदाजी केली. शुभमन गिल चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. आतापर्यंत गिलच्या बॅटमधून एक शतक आले आहे, जे त्याने बांगलादेशविरुद्ध खेळलेल्या सामन्यात केले होते. या सामन्यात गिलने १०१ धावांची नाबाद खेळी केली. याशिवाय गिलने पाकिस्तानविरुद्ध ४६ धावांची खेळी खेळली होती.

◂ *(वृत्तसंस्था)*

## पाकिस्तान- बांगलादेश सामना पावसामुळे रद्द

◆ **रावळपिंडी, २७ फेब्रुवारी**
येथे गुरुवारी यजमान पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्यादरम्यानचा चॅम्पियन्स चषक क्रिकेट साखळी सामना सततच्या पावसामुळे एकही चेंडू न टाकता रद्द करण्यात आला.

२९ वर्षांत पहिल्यांदाच आयसीसी स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या पाकिस्तानने अशा प्रकारे एकही विजय न नोंदवता आपल्या दुर्दैवी मोहिमेचा शेवट केला.

बांगलादेशनेही विजय न मिळवता आपला प्रवास संपवला आणि संघ आत्मपरीक्षण करण्यासाठी भरपूर काही घेऊन मायदेशी परतणार आहे. दोन्ही संघांना एक गुण मिळेल. हे दोन्ही संघ आधीच स्पर्धेतून बाहेर झाले होते. आजचा सामना हा त्यांचा आत्मसन्मानासाठी होता, परंतु त्याच्यावरही पावसाने पाणी फेरले.

या स्पर्धेत पाकिस्तानच्या अविस्मरणीय कामगिरीबद्दल टीका झाली आहे, ज्यात दुबईमध्ये पारंपारिक प्रतिस्पर्धी भारताकडून सहा गडी राखून पराभवाचा समावेश होता. रावळपिंडीमध्ये चेंडू न टाकता सामना रद्द करण्याची ही दुसरी वेळ आहे. या आठवड्याच्या सुरुवातीला दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पावसामुळे पहिला सामना रद्द करण्यात आला.

◂ *(वृत्तसंस्था)*

# पुण्याचा शुभम सिदनाले विजेता

## शंकरनगरच्या कुस्ती मैदानात कोल्हापूरच्या गणेश कुंकुलेला घिसा डावावर केले चितपट



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २७ फेब्रुवारी-**
महाशिवरात्री यात्रा महोत्सव समिती चॅरिटेबल ट्रस्ट शंकरनगर यांच्यावतीने महाशिवरात्री यात्रा निमित्त आयोजित केलेल्या शिवतीर्थ आखाड्यात अंतिम कुस्तीच्या लढतीत सुमारे १५ मिनिटांच्या अटीतटी नंतर पुण्याच्या शुभम सिदनाले या मल्लांने कोल्हापूरच्या गणेश कुंकुले याला घिसा डावावर आस्मान दाखवित चितपट करताच. या वेळी मैदानावर उपस्थित असलेल्या हजारो कुस्ती शौकिनांनी एकच जल्लोष केला. आणि हलगीचा कडकडाट झाला.

शिवतीर्थ आखाडा येथे आयोजित केलेल्या कुस्ती मैदानासाठी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, समितीचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, कार्याध्यक्ष मदनसिंह मोहिते पाटील, शंकरराव माने देशमुख, महाराष्ट्र केसरी छोटा रावसाहेब मगर, राजेंद्र चौगुले, निवेदक उपमहाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर, वसंतराव जाधव यांचे सह परिसरातील विविध संस्थांचे आजी-माजी सदस्य, पदाधिकारी व कुस्ती शौकीन मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाशिवरात्री यात्रा महोत्सव समितीच्या वतीने शंकरनगरच्या शिवतीर्थ आखाड्यात ५० रुपये पासून ते एक लाख रुपये बक्षीसाच्या सुमारे ४०० हून अधिक कुस्त्या झाल्या. या कुस्ती मैदानासाठी कोल्हापूर, पुणे, सोलापूर, सातारा आदी भागातून विविध वजन गटाचे मल्ल सहभागी झाले होते. सुमारे आठ लाख रुपयांची बक्षीसे या वेळी वाटप करण्यात या मैदानाचे खास वैशिष्ट्य म्हणजे येथे विजेते मल्ला बरोबरच पराभूत मल्लालाही बक्षिसाच्या २०% रक्कम दिली जाते अंतीम कुस्तीसाठी मदनसिंह मोहिते पाटील व एन. आय. एस. कोच सद्दाम जमादार यांनी पंच म्हणून काम पाहिले.



# सोलापूरचा शुटींगबॉलचा पुरुष संघ राज्यात अव्वल

## अंतिम फेरीत छत्रपती संभाजीनगरवर मात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**
राज्य शूटिंगबॉल असोसिएशनच्या स्पर्धेमध्ये सोलापूरच्या पुरुष संघाने प्रथम पटकाविला.

नुकत्याच जालना जिल्हातील भोकरदन येथे झालेल्या ३८व्या राज्यस्तरीय शूटिंगबॉल निवड चाचणी स्पर्धा दिमाख्यात पार पडल्या. शोएब बेगमपुरे आणि आमीर काझी यांच्या नेतृत्वाखाली संघाने अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली. उपांत्यपूर्व फेरीत जळगाववर २१-११ ने विजय मिळवला. उपांत्य फेरीत सांगलीवर २१-१६ अशी मात केली.

अंतिम फेरीत संघनायक शोएब बेगमपुरे, अमीर काझी आणि गणेश मोरे विनायक नाडे अमन शेख यांनी अतिशय उत्कृष्ट कामगिरी करत औरंगाबाद म.न.पा जिल्ह्याचा पराभव २१-१५ने पराभव केला. संघाचे जिल्हा शूटिंगबॉल असोसिएशनचे अध्यक्ष संजय सावंत, सचिव फैजअहमद बेगमपुरे, श्रीनिवास कामूर्ती, रफी दिवाण, सलीम करणकोट, तौसिफ बागवान, आमीर कुमठे व कलीम करमकोट यांनी अभिनंदन केले आहे.

**विजेता संघ :** शोएब बेगमपुरे, अमीर काझी, गणेश मोरे, फैजान इनामदार, भूषण कांबळे, विनायक नाळे, अमन शेख, फरहान लालकोट, शाहिद शेख, कामरान दलाल, अफरोज काझी, प्रज्वल वाघमोडे. संघ प्रशिक्षक:- श्रीनिवास कामूर्ती. संघ व्यवस्थापक:- सलीम करणकोट

# किरण स्पोर्ट्स क्लबला दुहेरी मुकुट

## पुरुष व महिला गट जिल्हा अजिंक्यपद खो-खो स्पर्धा





**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**
पुरुष व महिला गट जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी खो खो स्पर्धेत किरण स्पोर्ट्स क्लबने पुरुष व महिला या दोन्ही गटात विजेतेपद पटकावीत दुहेरी संपादला.

ह. दे. प्रशालेच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेची पारितोषिके सहाय्यक पोलीस निरीक्षक शितलकुमार गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजित लकडे, विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळाचे विश्वस्थ रेवणसिद्ध बिज्जरगी, सिद्धाराया होर्टीकर, विजय शाबादी व निवृत्त तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव यांच्या हस्ते देण्यात आली. विजयी संघाचे सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी अभिनंदन केले. पुरुष संघासाठी कै. राजेश विजय शाबादी यांच्या स्मरणार्थ शाबादी परिवारातर्फे तर महिलांसाठी विजापूर रोड मध्यवर्ती गणेशोत्सव मंडळ विश्वस्थ रेवणसिद्ध बिज्जरगी व गणेश कोळी यांच्यातर्फे फिरता करंडक व सोलापूर शहर पोलीस संघातर्फे प्रथम, द्वितीय व तृतीय संघासाठी करंडक व सर्वोत्कृष्ट अष्टपैलू आक्रमक व संरक्षक या खेळाडूंसाठी ट्रॉफ्या देण्यात आल्या.

या स्पर्धेसाठी उत्कर्ष क्रीडा मंडळाचे प्रशिक्षक आशिष अवधूर्त व त्यांचे खेळाडूनी तर शहर पोलीस संघाचे सुनील चव्हाण, सचिन हार, वैभव लिगाडे, अर्जुन पवार व अमित कांबळे यांनी सहकार्य केले. यावेळी सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस ए. बी. संगवे, उपाध्यक्ष सुनील चव्हाण, खजिनदार श्रीरंग बनसोडे, सहखजिनदार सोमनाथ बनसोडे, सहसचिव मोहन रजपूत, राजाराम शितोळे, शरद व्हनकडे, संतोष कदम, अजित शिंदे, निवड समिती सदस्य धोंडीराम पाटील, विजय दत्तू व उमाकांत गायकवाड आदी उपस्थित होते. पंच म्हणून पुंडलिक कलखांबकर, लखन कांबळे, विजय अडगळे, श्रीकांत खटके, श्रीकांत चव्हाण, नौशाद मुजावर, शिवशंकर राठोड, शेखलाल शेख, अनिकेत जाधव, श्रीकृष्ण कोळी, सागर बगले,अक्षय पवार, आनंद जगताप, सुरज शेवाळे, मधुकर राठोड यांनी काम पाहिले

**सर्वोत्कृष्ट पुरुष व महिला खेळाडू**
अष्टपैलू : सौरभ चव्हाण, सादिया मुल्ला (दोघे किरण स्पोर्ट्स). संरक्षक : जुबेर शेख (उत्कर्ष), अर्चना व्हनमाने (किरण स्पोर्ट्स). आक्रमक : अजित रणदिवे (वेळापूर), स्नेहा लामकाने (वाडीकुरोली).

**अंतिम प्रथम तीन संघ**
**पुरुष :** किरण स्पोर्ट्स क्लब सोलापूर , अर्धनारी नटेश्वर क्रीडा मंडळ वेळापूर, उत्कर्ष क्रीडा मंडळ सोलापूर. **महिला :** किरण स्पोर्ट्स क्लब सोलापूर, वसंतराव काळे प्रशाला वाडीकुरोली, कल्याणराव काळे स्पोर्टस क्लब वाडीकुरोली.

# ऑस्ट्रेलिया व अफगाणिस्तान यांच्यात उपांत्य फेरीसाठी महत्त्वपूर्ण लढत

## चॅम्पियन्स चषक क्रिकेट

**लाहोर, २७ फेब्रुवारी**
आयसीसी चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी ऑस्ट्रेलिया आणि अफगाणिस्तान यांच्यादरम्यान ब गटातील महत्त्वपूर्ण साखळी सामना खेळला जाणार आहे. बुधवारी अफगाणि स्तानने इंग्लंडवर विजय मिळवून स्पर्धेत चुरस निर्माण केली असून आता ते आणखी एक विजय नोंदवून स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्याचा प्रयत्न करणार आहे.

सध्या ब गटात दोन सामन्यातून एका विजयासह दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया प्रत्येकी ३ गुणांसह अववल दोन क्रमांकावर आहे. अफगाणि स्तानने दोन सामन्यातील एका विजयासह २ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. आता अफगाणि स्तानला ऑस्ट्रेलियावर विजय संपादन करून स्पर्धेची उपांत्य फेरी गाठण्याची संधी आहे.

अमेरिकेत झालेल्या टी-२० विश्वच काच्या उपांत्य फेरी गाठल्यानंतर अफगाणि स्तानला एका वर्षापेक्षा कमी कालावधीत जागतिक स्पर्धेच्या सलग दुसऱ्या उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची वास्तविक संधी आहे.

**ऑस्ट्रेलिया - अफगाणिस्तान**
**स्थळ :** गद्दाफी स्टेडियम, लाहोर
**वेळ :** दुपारी २.३० पासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

**दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाचा विजय**
स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित करेल अशी अपेक्षा आहे. एक सामना शिल्लक असताना अफगाणि स्तानला पराभूत करेल, हे सांगणे सोपे आहे. ऑस्ट्रेलियाकडे भक्कम फलंदाजीची फळी आहे. परंतु संघाला घाला मिचेल स्टार्क, पॅट कमिन्स व जोश हेझलवूड या तीन आघाडीच्या वेगवान गोलंदाजांची कमतरता भासणार आहे. दोन वेळा विजेता ऑस्ट्रेलिया १५ वर्षांच्या अंतरानंतर चॅम्पियन्स चषकाचे जेतेपद पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यांनी २००६ व २०१९ मध्ये सलग दोन जेतेपदे जिंकली होती, परंतु २०१३ व २०१७ च्या आवृत्तीत अंतिम फेरी गाठण्यात त्यांना अपयश आले. त्यानंतर ही स्पर्धा बंद करण्यात आली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### सेवकांच्या सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाळासाहेब शिंदे

**सदाशिवनगर, दि. २७ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुका जि. प. सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित माळशिरस या संस्थेची संचालक मंडळाची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध झाली. चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीची सभा अध्यासी अधिकारी. बंडगर साहेब यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या माळशिरस येथील कार्यालयात पार पडल पंचायत समिती माळशिरसचे (अर्थ विभाग) लेखाधिकारी बाळासाहेब शिंदे यांची चेअरमनपदी व ग्राम पंचायत अधिकारी बाळासाहेब भोसले यांची व्हाईस चेअरमनपदी निवड करण्यात आली. मावळते चेअरमन रवींद्र पवार यांनी नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा सत्कार करून अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. तदनंतर उपस्थित संचालकांचा नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. संस्थेची संचालक मंडळ बिनविरोध करण्यासाठी विविध कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले त्याही पदाधिकाऱ्यांचा संस्थेच्या वतीने सन्मान करण्यात आला. सदर चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीच्या प्रक्रियेवेळी नवनिर्वाचित सर्वच संचालक उपस्थित होते. निवडणूक प्रक्रियेनंतर नवनिर्वाचित चेअरमन, व्हाईस चेअरमन यांचे जिल्हा परिषदेच्या विविध संघटनांच्या वतीने सन्मान करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. सदर वेळी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे माळशिरस तालुका अध्यक्ष तथा नवनिर्वाचित संचालक. धन्यकुमार काळे, मार्गदर्शक ग्राम पंचायत अधिकारी दिपक गोरे, माळशिरस तालुका अध्यक्ष विजयसिंह माने देशमुख ग्राम पंचायत अधिकारी. पानसरे भाऊसाहेब, ग्रामपंचायत अधिकारी पी. एम. एकतपुरे, ग्रामपंचायत अधिकारी, ए. वाय. होळ, आडगळे उपस्थित होते. निवडणूक निर्णय अधिकारी बंडगर व सहाय्यक निवडणूक अधिकारी म्हणून संस्थेचे सचिव राजेंद्र मिसाळ यांनी काम पाहिले.

### सह्याद्री फार्मसीच्या प्रा. सुनयना माळी यांना पीएच. डी प्रदान

**सांगोला, दि. २७ फेब्रुवारी-**



सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता.सांगोला येथील प्रा.सुनयना औदुंबर माळी यांना आईइएस विद्यापीठ, भोपाळ, मध्यप्रदेश या विद्यापीठाने औषधनिर्माणशास्त्र क्षेत्रांतील त्यांच्या संशोधनास पीएचडी पदवी देऊन सन्मानित केले. त्यांनी आपला फायटोकेमिकल इन्वेस्टीगेशन अँड फार्माकॉलॉजिकल इव्हाल्युएशन ऑफ क्रिनम सोलापुरेन्स लिव्हज फॉर इट्स अँटीडायबेटिक अँड अँटिऑक्सिडंट ऍक्टिव्हिटी हा शोधनिबंध सादर करून पीएचडी पदवी प्राप्त केली. त्यांना हा शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी डॉ. गौरव जैन, डॉ. ज्योतीराम सावळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी आपला हा शोधनिबंध विविध सहा नामांकित राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय जर्नल्समध्ये प्रकाशित केला. तसेच विविध पाच राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केले आहे. या त्यांच्या यशाबद्दल संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ. मनोजकुमार पाटील यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले.



### करकंबच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**करकंब, दि. २७ फेब्रुवारी-**

करकंब येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कवी कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन मराठी शिक्षक उंबरजे व चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे, सचिव अविनाश देवकते, स्कूल कमिटी अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापिका संगीता करमाळकर, पर्यवेक्षक लक्ष्मी शिंदे उपस्थित होते.

## निधन वृत्त..

### अनिल ग्राम



**अक्कलकोट, दि. २७ फेब्रुवारी-**

शिरशी येथील रहिवासी अनिल भालचंद्र ग्राम (वय ६५) यांचे गुरुवारी सकाळी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सून, नातवंड, भावजय, बहिण असा परिवार आहे.

### गजानन भागवत



**श्रीपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

माळीनगर, सवतगव्हाण येथील गजानन रंगनाथ भागवत (वय ८७) यांचे निधन झाले. श्रीपूर येथिल ब्रिमा सागर डिस्टलरी महाराष्ट्रचे उपव्यवस्थापक चंद्रकांत भागवत यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### शांताराम वजाळे



**श्रीपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

श्रीपूर येथील ब्रिमा सागर डिस्टलरीतील सेवानिवृत्त कामगार शांताराम एकनाथ वजाळे यांचे (वय ८१) यांचे निधन झाले. महामानव प्रतिष्ठानचे विश्वजीत वजाळे यांचे ते आजोबा होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे असा परिवार आहे.

### विजय जाधव



**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

कुमठे, मड्डी वस्ती येथील रहिवासी विजय रामचंद्र जाधव (वय ४६) यांचे गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, मुलगी, दोन मुले, भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. ते माजी सैनिक दिगंबर जाधव यांचे लहान भाऊ होत.

# मराठीच्या समृद्धीसाठी वापर वाढावा

**प्रा. विनय कुलकर्णी : करकंबच्या रामभाऊ जोशी हायस्कूल येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२७ फेब्रुवारी-**

मराठी भाषा समृद्ध होणे गरजेचे असून त्यासाठी सर्वच स्तरावर भाषेचा वापर वाढविला पाहिजे असे मत प्रा. विनय कुलकर्णी यांनी व्यक्त केले.मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा. कुलकर्णी यांनी मराठी भाषेच्या विकासाचे टप्पे सांगून कुसुमाग्रज यांचे साहित्यावर विस्तुत विवेचन केले.प्रा.नागेश घुले यांनी मराठी भाषा आणखी समृद्ध करावयाची असल्यास भाषा शुद्ध बोलण्याचा व लिहिण्याचा सराव करावा असे मनोगत व्यक्त केले.



याप्रसंगी मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, महादेव पुजारी यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक हेमंत कदम, पर्यवेक्षक धनवंत करळे, प्रा. नरसिंग एबोते, स्काऊट मास्तर महादेव पुजारी, प्रा. नागेश घुले, प्रा. दर्शिका खोबरखेडे, शकूर बागवान, अफ्रिन शेख यांच्यासह मराठी भाषा अभ्यासक शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन अतुल अभंगराव यांनी तर आभार मनिषा ढोबळे यांनी मानले.

## प्रा. डॉ. राहुल पालके यांनी मायमराठी कवितेने जिंकली विद्यार्थ्यांची मने

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

बार्शीत आयोजित कार्यक्रमात प्रा. डॉ. राहुल पालके यांनी मायमराठी कवितेने विद्यार्थ्यांची मने जिंकली.



मराठी ही समृद्ध भाषा असून तिची थोरवी संतांनी गायली आहे. मराठी संस्कृतीची गाणी मराठम ोळ्या माणसांना आपलेसे करतात. मराठी भाषेचे संस्कार अनन्यसाधारण असून त्यातून आपलेपणा दिसून येतो. बहिणाबाईंच्या कविता मनाचा ठाव घेतात. वि. स. खांडेकर, कवी कुसुमाग्रज, विं.दा. करंदीकर,भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य समजून घेवून मराठी संस्कृती जपली पाहिजे. नारायण सुर्वे यांच्या कविता कामगारांच्या व्यथा मांडतात. हा कामगार कष्टाची भाकरी खातो. मराठीने अटकेपार झेंडा फडकविला आहे. मराठीच्या विविध रुपातून मराठी संस्कृतीचे विविधांगी दर्शन घडते. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी महत्त्वाचे स्थान दिले. तरी युवकांनी मराठी भाषेचे समृद्ध जाणून तिचे संवर्धन करावे तिची महती समजून, उमजून घ्यावी, अशा आशायाच्या कवितेचे सादरीकरण प्रा. डॉ. राहुल पालके यांनी मराठी गौरव भाषा दिनानिमित्त यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती ग्रंथालयात व बी.एस्सी. भाग तीनमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत केले. याप्रसंगी ग्रंथपाल माधव टिपरसे व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## उमा महाविद्यालयात ‘लेखक आपल्या भेटीला’

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील उमा महाविद्यालयात मराठी विभागांतर्गत ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठीतील ज्येष्ठ साहित्यिक वि. वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीच्या निमित्ताने २७ फेब्रुवारी हा दिवस ‘मराठी भाषा गौरव दिन’ म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमानिमित्त ’लेखक आपल्या भेटीला’या उपक्रमांतर्गत कवी रविराज सोनार यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी त्यांनी मराठी भाषा संवर्धित करण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.यासाठी मराठी लोकभाषेतील शब्द तसेच नवनवीन शब्द आपल्या बोलण्यात आणून मराठी भाषा प्रवाही ठेवली पाहिजे. प्रत्येकाच्या मनामध्ये सुप्तावस्थेत एक लेखक दडलेला असतो.आपल्याला आलेले अनुभव लेखनातून माध्यमातून व्यक्त करावेत. त्यातून समाज संस्कृतीचे प्रतिबिंब साहित्यामध्ये पडते. ते सम ाजाला दिशादर्शक ठरणारे असते.यामुळे आपले लेखन एक ऐतिहासिक दस्तऐवज ठरण्याची शक्यता असते, असे प्रतिपादन केले. अध्यक्ष स्थानावरून बोलताना म हाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी, कुसुमाग्रजांनी मराठीसाहित्य लेखनाने मराठी भाषा समृद्ध व विकसित केली आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे.यामध्ये साहित्यिकांचे मोठे योगदान आहे.मराठी भाषा ही मातृभाषा असल्यामुळे ती ज्ञानभाषा आहे. म्हणूनच मराठीतून शिकत असताना ज्ञानाचे दृढीकरण होते. त्यामुळे मराठी भाषेचे संवर्धन करून ती विकसित करावी असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. बागवान एन एस, आय क्यू एसी कॉर्डिनेटर प्रा.अविनाश देशपांडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.लोखंडे एन एस, प्रा.सिंधू खिलारे, भूगोल विभागाचे विभाग प्रमुख प्रो. डॉ. मगर टी. आर., प्रा. कुलकर्णी ए. व्ही., ग्रंथपाल प्रो. डॉ. चौरे ए. ए. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सर्वगोड नागिन यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. दत्ता सरगर यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रा. वर्षा सरतापे यांनी मानले.



## कर्मवीर ग्रंथालयात मराठीचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील कर्मवीर सार्वजनिक ग्रंथालयात ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कविश्रेष्ठ कुसुमाग्रज तथा पद्मभूषण वि. वा. उर्फ तात्यासाहेब शिरवाडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्याने मराठी राजभाषा गौरव दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

प्रमुख मान्यवरांचे हस्ते प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षपदी कर्मवीर ग्रंथालयाचे उपाध्यक्ष धैयशील देशमुख तर प्रमुख पाहुणे म्हणून वृक्षमित्र सुनिल फल्ले हे होते. मराठी राजभाषा गौरव दिनाच्या अनुषंगाने मराठी भाषेचे महत्व आपल्या मनोगतात प्रमुख मान्यवरांनी विषद केले. यावेळी जेष्ठ सभासद अनिल धाट,सुरेश शिंदे, प्रेम अग्रवाल, राहुल लोंढे यांचेसह बालवाचक आर्यन पोकळे, मंथन घावटे,अक्षय पोकळे, शौनक अग्रवाल यांचेसह वाचक व सभासद उपस्थित होते, कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन ग्रंथपाल विनोद गायकवाड यांनी केले.

## श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालयात राजभाषा गौरव दिन उत्साहात



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय,बार्शी येथे आज गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. कवीवर्य वि.वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जन्मदिना निमित्त मराठी राज्यभाषा गौरव दिन साजरा करण्यात आला.

प्रथमतः वि.वा. शिरवाडकर यांच्या फोटोचे पूजन वाचनालयाचे अध्यक्ष किशोर श्रीश्रीमाळ, संचालक धिरज कुंकूलोळ, रुपेश कांकरिया, प्रमोद भंडारी यांच्या हस्ते करुन विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी सभासद नितीन पोपळघाट, विश्वास पाटील, आझर शेख, युनुस बागवान, अनिल मुसळे, ग्रंथपाल सुरेश यादव, पल्लवी तौर, विरज पतंगे उपस्थित होते. अनिल मुसळे यांनी शिरवाडकर यांच्या जीवनावर आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार वाचनालयाचे संचालक धिरज कुंकूलोळ यांनी केले.



## वखारिया विद्यालयात मराठी राजभाषा दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित उपळे दुम ाला येथील वखारिया विद्यालयात इनचार्ज आर. आर. लंकेश्वर यांच्या उपस्थितीत राजभाषा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

ज्ञानपीठ तथा पद्मभूषण पुरस्कार प्राप्त कुसुमाग्रज अर्थात वि.वा. शिरवाडकर यांचा जन्म दिवस मराठी भाषा गौरव दिन, मराठी राजभाषा दिन म्हणून विद्यालयात गुरुवार दि. २७ फेब्रुवारी रोजी साजरा करण्यात आला. प्रारंभी विद्यालयातील जेष्ठ शिक्षक शंकर शिंदे सर यांचे हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

अलिकडेच मराठी भाषेला ’अभिजात भाषेचा ’दर्जा देण्यात आलेला आहे. मराठी भाषा ही जगातील दहावी तर भारत देशातील तिसरी मोठी भाषा आहे, अशी माहिती यावेळी सांगण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मकरंद जगदाळे यांनी केले. याप्रसंगी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## ‘लेखक आपल्या भेटीला’ उपक्रमांतर्गत कवी धनंजय सोनलकर यांचे पंढरीत व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी-**

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात ‘मराठी भाषा गौरव दिना’निमित्त झालेल्या साहित्यिक-सांस्कृतिक कार्यक्रमात कवी धनंजय सोलंकर यांनी कवी कुसुमाग्रज तथा विष्णू वामन शिरवाडकर यांच्या साहित्यिक वारसाचा आवर्जून उल्लेख करत मराठी भाषेतील मूल्याधारित साहित्यनिर्मितीचे महत्त्व रेखांकित केले. मराठी विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQC) यांनी रुसा काम्पोनंट आठ फॅकल्टी एक्स्चेंज उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे हे होते.



कवी धनंजय सोलंकर यांनी कुसुम ाग्रज यांच्या साहित्यातील प्रामाणिकपणा, संवेदनशीलता, समाजप्रेम आणि माणुसकी हे तत्त्वज्ञान विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्यांच्या भाषणात ते म्हणाले की, कुसुमाग्रज केवळ कवी नव्हते, तर ते शेतकरी, कामगार आणि समाजसेवक यांच्या भूमिकेतून साहित्यरचना करणारे युगप्रवर्तक होते. त्यांच्या कवितेतून युवकांना संघर्षाची प्रेरणा मिळाली. परस्त्रीला आई-बहीण मानणे हाच खरा पुरुषार्थ आणि ईश्वरी संकेत आहे. सोलंकरांनी स्वतःच्या साहित्यिक प्रवासाबद्दल सांगताना सामान्य माणसाचे जीवन, स्त्रीचे मातृत्व आणि गुरूजनांचे मार्गदर्शन यांना कवितेची प्रेरणा म्हणून उद्धृत केले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रमेश शिंदे म्हणाले की, साहित्य हे भावनांच्या अभिव्यक्तीचे माध्यम असते. साहित्याम ुळेच भाषा समृद्ध होते. मराठीचा गौरव म्हणजे तिच्या परंपरा आणि प्रयोगशीलतेचा समन्वय, विद्यार्थ्यांना भाषा आणि भावनांचा अभ्यास करण्याचे आवाहनही केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी करून दिला.

प्रा. सारिका भांगे यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. सुमित साळुंखे, डॉ. बापूसाहेब घोडके, अमोल माने, अभिजीत जाधव, ओंकार नेहतराव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकळस, विविध विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचारी हे उपस्थित होते. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. हरीभजन कांबळे यांनी मानले.

## मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी सामुदायिक प्रयत्न व्हावेत

**प्रशांत अरबाळे : कल्याणशेट्टी महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन**

**तला वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ फेब्रुवारी-**

मराठी भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे, त्यामुळे ही भाषा समृद्ध करण्यासाठी सामुदायिक प्रयत्न करणे गरजेचे आहे, तसेच इंग्रजीचे गोडवे गाणाऱ्या नागरिकांनी ही भाषा ज्ञानभाषा कशी होईल यासाठी जाणीवपूर्वक मोहीम हाती घेतली पाहिजे असे प्रतिपादन अक्कलकोट चे गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे यांनी व्यक्त केले.

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील वांग्मय मंडळांनी मराठी भाषा दिन निमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी हे होते. पुढे ते म्हणाले की, लहानपणापासूनच अस्खलित मराठी भाषेत ज्ञान देण्यासाठी शैक्षणिक संस्थेतून प्रयत्न झाले पाहिजेत. परंतु आपल्या मुलाला इंग्रजी भाषा आलीच पाहिजे, असा आग्रह धरणारे पालक तुलनेने अधिक आहेत. आता त्यांनी मराठी भाषेचा आग्रह धरला पाहिजे. तेव्हाच मराठी भाषा ज्ञानभाषा होईल. मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देऊन मराठीचा गौरव केला आहे. मराठी भाषेची गोडी अवीट आहे. साहित्य देखील विपुल आहेत, त्याचे वाचन केले पाहिजे. राज्यातील प्रत्येक व्यक्तीने मराठी भाषा बोलण्याचा आग्रह धरला पाहिजे, कारण सर्व जाती धर्माला जोडून घेणारी ही अभिजात भाषा आहे.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मराठीचे थोर साहित्यिक वा कवी वि. वा. शिरवाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, बसवराज शावरी प्रा. नेहा गंदमल आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा. शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा. प्राची गणेचारी यांनी मानले.

## श्रम ही साधना, सेवा ही आराधना

**राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस उत्साहात**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी यांच्या वतीने मौजे आगळगाव येथे सुरू असलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचा पाचवा दिवस २६ फेब्रुवारी रोजी अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता अभियान आणि प्रेरणादायी मार्गदर्शनपर कार्यक्रमामधून श्रमसंस्कारांचे मूर्तिमंत उदाहरण सादर केले.



स्वच्छता मोहिमेच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपली. सकाळी ९ वाजता स्वयंसेवकांनी आगळगाव विद्यालय परिसराच्या स्वच्छतेसाठी मोहीम राबवली. स्वच्छ भारत, सुंदर भारत या संकल्पनेला समोर ठेवत स्वयंसेवकांनी परिसरातील कचरा संकलित केला, गवत काढले आणि परिसर सुशोभित करण्यासाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाधिकारी डॉ. महादेव ढगे सर आणि प्रा. के. माळी सर यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करत त्यांच्यासोबत श्रमदानात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी परिश्रम घेत परिसर स्वच्छ आणि सुंदर केला.

स्वच्छतेने समाज घडतो, पर्यावरणाचा सन्मान वाढतो! यानंतर दुपारच्या सत्राम ध्ये काव्यरुपी प्रेरणा विनोद गाडेकर सरांचे मनमोहक मार्गदर्शन दुपारच्या सत्रात सुप्रसिद्ध कवी, गीतकार आणि लेखक श्री. विनोद गाडेकर सर यांचे प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांच्या ओघवत्या शैलीतून त्यांनी युवकांसाठी कविता, प्रेरणादायी कथा आणि ऐतिहासिक संदर्भ मांडले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील एक संस्मरणीय प्रसंग सांगत संघटन, धैर्य आणि नेतृत्व या गुणांचे महत्त्व पटवून दिले. तसेच, आपल्या आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा आणि सकारात्म क दृष्टिकोन किती आवश्यक आहे, यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. बी. डी. लांडे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाधिकारी डॉ. महादेव ढगे, प्रा. के. एम. माळी, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. के. बी. चपटे आणि कविता वरडे यांची उपस्थिती होती.

# सोलापूर बाजार समितीत विकासकामे प्रगतीपथावर

## ● शेतकऱ्यांना मूलभूत सुविधा देण्यासाठी कटिबध्द : प्रशासक मोहन निंबाळकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

कांद्याच्या विक्रमी उलाढालीसाठी राज्यात दुसऱ्या क्रमांकावर असणाऱ्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विविध विकास कामांना गती मिळाली आहे. बाजार समितीच्या तत्कालीन संचालक मंडळाच्या कार्यकाळात कांदा सेलहॉलचे नूतनीकरण करणे, फळ व भाजीपाला विभागात अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्ते करणे, सांडपाण्याच्या निचऱ्यासाठी ड्रेनेज चेंबर लाईन, पिण्याच्या पाण्याची पाईप लाईन असे अनेक कामांना प्रशासक कार्यकाळात मंजुरी मिळाली. त्यानंतर प्रत्यक्षात याचे कामकाज सुरू करण्यात आले आहे.





दरम्यान, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीला राज्याचे पणन संचालक विकास रसाळ यांनी डिसेंबर महिन्यात भेट दिली होती. तेव्हा त्यांनी बाजार समिती मधील विविध विभागांचा तपशीलवार आढावा घेऊन विभागांची बैठक घेत, कांदा विभागातील कांदा सेलहॉलची आणि लिलावाची पाहणी करत शेतकऱ्यांशी संवाद साधला होता. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना बाजार समितीकडून उपलब्ध करण्यात येणाऱ्या सुविधा तसेच कांद्याच्या दराबाबत चर्चा केली होती.शेतकऱ्यांनी देखील तेवढ्याच तत्परतेने संचालकांना बाजार समितीमधील सुविधांची आणि दराची माहिती दिली. या चर्चेदरम्यान संचालक रसाळ यांनी कांदा सेलहॉल मधील पत्रा शेड नूतनीकरण करण्यासाठी यापूर्वीच्या संचालक मंडळांनी सादर केलेल्या विकास कामांना मंजुरी देत असल्याचे जाहीर केले होते. तसेच फळ विभागात देखील उर्वरित सिमेंट काँक्रीट रोडच्या कामांना देखील हिरवा कंदील दिला होता. त्यानुसार बाजार समितीमध्ये सर्व विकास कामे प्रगतीपथावर असल्याचे बाजार समिती प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. सद्या कांद्याच्या बाजारपेठेत पत्राशेड बदलण्याचे काम जोरात सुरू असल्याचे दिसून आले.

### पावसाळ्यात भिजणारा कांदा भिजणार नाही असे नियोजन हवे



सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत विक्रीसाठी आणलेला कांदा लिलाव अगोदरच गळक्या पत्राशेडमुळे भिजून खराब होतो. त्यामुळे त्या भिजलेल्या कांद्याला चांगला दर मिळत नाही. अशा अवस्थेत शेतकऱ्यांना कोणाचेच सहकार्य लाभत नाही. त्यामुळे बाजार समिती प्रशासनाने पावसाळ्यात भिजणारा कांदा यंदाच्या पावसात भिजणार नाही, असे योग्य नियोजन करायला हवे. त्याच प्रमाणे पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्यात यावेत. एवढीच अपेक्षा आहे.

**- गणा कोळी, शेतकरी**

### बाजार समितीमध्ये विविध विकास कामांना गती

कांदा लिलाव सेलहॉल मधील जुने पत्रे काढण्यात येत आहेत. तसेच लोखंडी अँगल देखील बदलण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे फळ फुले आणि भाजीपाला विभागात अंतर्गत सिमेंट काँक्रिट रस्त्याचे कार्य सुरू असल्याचे चित्र दिसत आहे. पावसाळ्यापूर्वी सदरची कामे पूर्ण होतील. या विकास कामासाठी सुमारे नऊ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. तसेच शेतकऱ्यांना मूलभूत सुविधा देण्यासाठी बाजार समिती प्रशासन कटिबध्द आहे.

**- मोहन निंबाळकर,**
**पणन उपसंचालक तथा प्रशासक बाजार समिती सोलापूर**

---

## संक्षिप्त वृत्त



### मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचा सन्मान

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

साहित्य, शिक्षण आणि वन्यजीव संरक्षण यामध्ये असाधारण योगदान दिल्याने सोलापूरचे भूषण अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना नुकतेच पद्मश्री पुरस्काराने गौरवण्यात आले होते. मराठी भाषा गौरव दिन असल्याचे औचित्य साधून येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने चितमपल्ली यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प देऊन विशेष सन्मान करण्यात आला. पद्मश्री मारुती चितमपल्ली यांनी मराठी भाषेला एक लाखाहून अधिक शब्द देवून मराठी भाषा संपन्न आणि समृद्ध केली. त्यांच्या या योगदानाबद्दल आज मराठी भाषा गौरव दिनानिमित्त त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने हा सन्मान करून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, जेष्ठ पत्रकार दशरथ वडतीले, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, सांस्कृतिक व चित्रपट विभाग शहराध्यक्ष आशुतोष नाटकर, सोशल मीडिया विभाग शहराध्यक्ष वैभव गंगणे यांची उपस्थिती होती.



### सकस लेखनासाठी मराठी भाषेवर प्रभुत्व हवे : डॉ. श्रुती वडगबाळकर

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

मराठीत लेखनासाठी मराठी भाषेवर प्रभुत्व पाहिजे. या भाषेतील साहित्यिकांचे लेखन वाचले पाहिजे, त्याचे मनन व चिंतन केले पाहिजे. प्रत्येक शब्दाचा अर्थ नेमकेपणाने ओळखून त्याचा वापर केला पाहिजे. मराठी भाषा संपन्न व समृद्ध आहे. तिचा वापर केलाच पाहिजे, असे मत महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्ष डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी व्यक्त केले. द. सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही.जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त डॉ. वडगबाळकर यांच्या मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होते. त्या म्हणाल्या की, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ . डी. एस. सुत्रावे हे होते. डॉ. वडगबाळकर यांनी मुलाखतीमध्ये विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची अत्यंत मनमोकळेपणाने उत्तर देत एका लेखिकेचा प्रवास उलगडला. तसेच मराठी भाषेची थोरवी सांगून आजच्या काळात मराठी भाषा संवर्धनासाठी ती ज्ञानभाषा व व्यवहाराची भाषा म्हणून रुजवण्यासाठी शासन स्तरांबरोबर सामान्य जनतेनेही प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.शुभदा उपासे यांनी केले. डॉ. डी डी बनसोडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अंजली पाटील व साक्षी हिरापुरे यांनी ही मुलाखत घेतली होती. अल्फीया शेख हिने सूत्रसंचालन केले व अमृता कुसळकर हिने आभार प्रदर्शन केले.



### डॉ. शिरीष बंडगर यांना छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्कार प्रदान

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

डॉ. शिरीष अनिता शामराव बंडगर यांच्या विनाअनुदानित संकल्पना व स्वरुप या पुस्तकास विद्यापीठाचा सन्मानाचा छत्रपती शंभुराजे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आला. कुलगुरु प्रा. डॉ. प्रकाश महानवर, प्र. कुलगुरु प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, भाषा व वाडमय संकुलाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे, कुलसचिव योगिनी घारे, लेखिका डॉ. श्रुती वडगबाळकर, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. केदारनाथ काळवणे या मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुस्तकामध्ये लेखक डॉ. बंडगर यांनी उच्च शिक्षणातील विनाअनुदानित व्यवस्थेची संकल्पना, त्यातील आव्हाने, आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी याचे सविस्तर विवेचन केलेले आहे. या पुस्तकामुळे शैक्षणिक व्यवस्थेत सकारात्मक विचारप्रवास निर्माण होण्यास मदत मिळेल, असे मत प्रा. डॉ. दामा यांनी यावेळी व्यक्त केले.



### स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजवीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य आरोग्य निरीक्षक संघटना सोलापूर शाखेचे अध्यक्ष शेषराव शिरसट, भालचंद्र साखरे, नाशिर खान आदी उपस्थित होते.

---

# जिल्ह्यातील ९९ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर पीएम किसान सन्मान निधी वर्ग

### अवघा १ टक्का शेतकऱ्यांचे ई-केवायसी अभावी अडकले पैसे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशातील शेतकरी कुटुंबांच्या खात्यात 'पीएम किसान सन्मान निधीचे' २२ हजार कोटी नुकतेच वितरीत करण्यात आले असून, सोलापूर जिल्ह्यातील ५ लाख १८ हजार २७६ शेतकरी लाभार्थ्यांपैकी ५ लाख १२ हजार ५३५ लाभार्थ्यांच्या खात्यावर (९९ टक्के) हा निधी वर्ग झाला आहे. तर ५ हजार ७४१ जणांनी ई-केवायसी केली नसल्याने (१ टक्का) निधी पेंडिंग राहिला आहे.





पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारमधील भागलपूर येथे 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण' झाले. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा फायदा होत आहे. राज्य शासनही केंद्राप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना 'नमो किसान सन्मान निधी योजनेंतर्गत' ६ हजार रुपये देत असून, लवकरच हे अर्थसहाय ३ हजार रुपयांनी वाढविण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही आता केली आहे.

दरम्यान, सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय स्थिती पाहता अक्कलकोट येथील ४० हजार ८१८ शेतकऱ्यांना ही मदत मिळाली आहे. तर बार्शी ४९ हजार ९५३, करमाळा ६२ हजार ७१७, माढा ५३ हजार ९९४, माळशिरस ५६ हजार ४७१, मंगळवेढा ३९ हजार ४७२, मोहोळ ४० हजार ४५६, पंढरपूर ६० हजार ३४७, सांगोला ५८ हजार ०१२, उत्तर सोलापूर १४ हजार ८८१, द. सोलापूर ३५ हजार ४१४ अशा ई-केवायसी पूर्ण केलेल्या ५ लाख १२ हजार ५३५ लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग झाले आहेत. तर अजून ५ हजार ७४१ जणांना ई-केवायसी पेंडिंग असल्याने याचा लाभ मिळाला नाही.

**अॅग्रीस्टॅक योजनेचाही शेतकऱ्यांना होणार फायदा**

शेतकरी उत्पादक गटांना रोजगारक्षम कृषी प्रक्रिया उद्योग, ग्रेडींग व्यवस्था आदी समग्र सुविधा पुरवणारी 'स्मार्ट योजना' आणली असून त्याचा बहुतांश शेतकरी लाभ घेवून विकास साधत आहेत. अॅग्रीस्टॅक ही महत्वाची योजना हाती घेण्यात आली आहे. याद्वारे संपूर्ण शेतीचे डिजीटायजेशन करून प्रत्येक शेतकऱ्याला आवश्यक लाभ देण्यात येणार आहे. मध्यस्थाशिवाय शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून त्याला लाभ मिळणार आहे. राज्यात आतापर्यंत अॅग्रीस्टॅक अंतर्गत ५४ टक्के शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे.

---



### महाशिवरात्रीनिमित्त योगविहार येथे सामूहिक ईस्टलिंग पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापर, दि. २७ फेब्रुवारी-**

आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळातर्फे महातपस्वी श्री कुमारस्वामीजी आश्रम योगविहार, विजापूररोडयेथेमहाशिवरात्रीनिमित्त सामूहिक ईस्टलिंग पूजन करण्यात आले.

माजी कुलगुरू इरेश स्वामी यांनी मार्गदर्शन केले. आंतरराष्ट्रीय प्रार्थनायोग मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र मायनाळ यांनी प्रास्ताविक केले. इरेश स्वामी यांचा उपाध्यक्ष निळकंठप्पा कोनापुरे यांनी सत्कार केला. सोमेश्वर लवंगे, बाबासाहेब कुलकर्णी, सावित्री मुंडेवाडीकर, सुभाष मुंडेवाडीकर, सुभाष कुलकर्णी, महेश नरोनी, उषाताई लोणी, संध्यारजनी दानवे, अंजली जाधव, सुनिता घाटे, सुवर्णा पांढरे, सुचिता गायकवाड उपस्थित होते. विश्वनाथ म्हेत्रे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन नागनाथ चौगुले यांनी केले.

---



### स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

सोलापूर महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्यवीर विनायक सावरकर यांच्या पुण्यतिथी दिनानिमित्त श्री मार्कंडेय उद्यान येथील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यास उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विभागीय अधिकारी महेश क्षीरसागर,विश्वनाथ बेंद्रे,पांडुरंग दीड्डी, रामचंद्र जन्नू, विजय पुकाळे, दत्तात्रय वाळवेकर, राम तडवळकर, उमेश काशीकार, अमृता गोसावी आदी उपस्थित होते.

---

# मध्यवर्ती दोन चौकातील अतिक्रमण हटविले

### अतिरिक्त आयुक्त रवी पवार ऑन द स्पॉट; महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने नियमित कारवाई सुरू आहे. आज पथकाकडून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार हे या कारवाईदरम्यान ''ऑन द स्पॉट'' उपस्थित होते. या मोहिमेत तीन हात गाड्या, दोन लोखंडी काउंटर आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी आणि सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, आज महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या उपस्थितीत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक, डॉ. द्वारकानाथ कोटणीस स्मारक परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यात आले. या ठिकाणी असलेल्या अतिक्रमित दोन हात गाड्या, फळे व इतर साहित्य जप्त करण्यात आले. त्याचबरोबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरातील रस्त्याच्या कडेला असलेले अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत एक हात गाडी, दोन लोखंडी काउंटर व इतर साहित्य जप्त करण्यात आले. कारवाई दरम्यान बघण्यासाठी लोकांनी गर्दी केली होती. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे, मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.



---

# मनोरमा बँक आर्थिकदृष्ट्या समृद्ध व सक्षम : गांगल

▸ सलग सात वर्षे मनोरमा बँकेचा एनपीए शून्य टक्के

▸ मनोरमाच्या नवव्या निंबर्गी शाखेचे ऑनलाईन उद्घाटन





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

बँकिंग क्षेत्रात काम करत असताना टॅलेंट आणि टेक्नॉलॉजी उत्तम असायला हवी. तरच सहकाराचा पाया मजबूत होतो. आज आर्थिक विषमता दूर करण्याचे काम सहकाराने केले. सहकारी बँक चालवताना नैतिकता महत्त्वाची आहे. तरच शाश्वतपणा आपल्याला टिकवता येतो. मनोरमा बँक आजही आर्थिकदृष्ट्या समृद्ध व सक्षम आहे. सलग सातव्या वर्षीही 'मनोरमा'ने शून्य टक्के एनपीए राखले आहे, असे गौरवोद्गार ठाणे जनता सह. बँकेचे चेअरमन शरद गांगल यांनी काढले.

मनोरमा को ऑप. बँकेची नववी शाखा निंबर्गी (ता. दक्षिण सोलापूर) येथे कार्यान्वित करण्यात आली. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुभाष देशमुख होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून कॉसमॉस को ऑप. बँकेचे चेअरमन अॅड. प्रल्हाद कोकरे, माजी सह. आयुक्त, निवडणूक प्राधिकरण सह. संस्था पुणेचे संजय खडके, माजी कामगार सह. आयुक्त संभाजी काकडे, मनोरमा बँकेचे चेअरमन श्रीकांत मोरे, मल्टिस्टेटच्या चेअरमन शोभा मोरे, डॉ. सुमित मोरे, कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड सीईओ शिल्पा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मनोरमा बँक निंबर्गी शाखा व मल्टिस्टेट शाखेचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. चेअरमन मोरे म्हणाले, अर्थकारण प्रवाही असले पाहिजे. ग्रोथ ही वाढलीच पाहिजे. यशस्वी व्हायचे असेल तर थांबा नाही. सहकार चळवळ वाढली पाहिजे. मनोरमा परिवार २५ हजार सभासदांचा आहे. यशस्वी उद्योजक, यशस्वी शेतकरी, आदर्श शिक्षकांचा सन्मान परिवाराने केला आहे. ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल असलेल्या गटात अव्वल स्थान मिळाल्यामुळेच बँकेस आदर्श बँकेचा प्रथम पुरस्कार मिळाला आहे.

यावेळी शिक्षिका सुवर्णा बोरगावकर, जिल्हा सरकारी वकील अॅड. प्रदीपसिंग रजपूत, आदर्श शेतकरी गंगाधर बिराजदार, सीताराम महाराज साखर कारखान्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी राजलक्ष्मी गायकवाड, सौ. व श्री. काळुंगे यांचा सन्मान करण्यात आला. कार्याध्यक्षा अस्मिता गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. प्राजक्ता गव्हाणे यांनी प्रास्ताविक केले. व्हा. चेअरमन संतोष सुरवसे यांनी आभार मानले.

---



### ▸▸ संभाजी ब्रिगेडच्या पाठपुराला यश

# अखेर जात पडताळणी समितीला मिळाले अध्यक्ष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

राज्यात जात पडताळणी कार्यालयाकडे अनेक महिन्यापासून अध्यक्ष पद रिक्त होती त्यामुळे अनेक प्रकरण मंजुरीसाठी प्रलंबित होती याचा विचार करून शासनाने काल तात्काळ २९ अध्यक्ष ची नेमणूक केली त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे जात पडतानीचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने शासनाचे अभिनंदन करण्यासाठी सोलापूर जात पडताळणी समिती सदस्य सचिन कवले यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, कार्याध्यक्ष अरविंद शेळके, उपाध्यक्ष संतोष सुरवसे, लखन पारसे, दिलीप निंबाळकर, आकाश नाईकवाडी आदी उपस्थित होते.

संभाजी ब्रिगेडच्या वतीने मुख्यमंत्री व कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांना ई-मेलद्वारे कळविण्यात आले होते. याची दखल घेऊन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी २९ जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या अध्यक्षांची नेमणूक केली आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राह फाउंडेशनतर्फे आज प्रमाणपत्र वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

राह फाउंडेशन अंतर्गत सेवा फाउंडेशन सेंटरच्या वतीने विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण समारंभ आणि नोकरी मेळावा शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० वाजता समाज कल्याण केंद्र, रंगभवन समोर, सोलापूर येथे आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती वरिष्ठ व्यवस्थापक शुभम खरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

समर्थ कौशल्य विकास कार्यक्रम ांतर्गत युवकांना संगणक ज्ञान , संवाद कौशल्य व रोजगार क्षमतेसाठी आवश्यक प्रशिक्षण दिले जाणार आहे. या अंतर्गतच विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. नोकरी मेळावाही होणार आहे. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते प्रमाणपत्र करण्यात येणार आहेत. या नोकरी मेळाव्यात विविध कंपन्या सहभागी होणार आहेत. कौशल्य विकासातून रोजगाराची दिशा देण्याचा प्रयत्न संस्थेच्या वतीने करण्यात येत आहे, असे वरिष्ठ व्यवस्थापक शुभम खरात यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस अश्विन साखरे, मनीषा वाघमारे, शितल कानडे, शितल कांबळे, विवेक वाघमारे, नितीन मिसाळ आदी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## संक्षिप्त वृत्त...

### बनावट माल विक्री करून जवळ बाळगला; एकावर गुन्हा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

बनावट पादत्रानेचा माल विक्री करून जवळ बाळगल्या प्रकरणी एकाविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना ५ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान कमल एजन्सी मुरारजी पेठ येथे घडली. याप्रकरणी निखिल दिनकर पाटील (वय-३३, रा. शाहू मिल कॉलनी, उंचगाव कोल्हापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हरचंदराम अमराराम संदेशा (वय-३१, रा. २,गोल्ड फिंच पेठ, सोलापूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. हरचंदराम संदेशा याने स्वतःच्या आर्थिक फायदा करिता पॅरागॉन ऐवजी पॅराडॉन असे लिहिलेले एकूण ११२ नग पादत्राने स्वतः बाळगताना मिळून आले. तसेच पॅरेगॉन या कंपनीचा ट्रेडमार्क पी याचा वापर करून पोडॉदर असे लिहिलेले तीन नग चप्पल विक्री करिता ठेवलेले असताना मिळून आले. अशा प्रकारे एकूण १५ हजार १७७ रुपये किंमतीचा बनावट नकली माल ग्राहकांना विक्री करण्याकरिताजवळ मिळून आला. तपास पोलीस उपनिरीक्षक रोहन खंडागळे करीत आहेत.

### घराच्या भिंतीवरून लोखंडी रॉडने मारहाण; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

तुम्ही आमच्या घरासमोर असलेली तुमच्या घराची भिंत फेसोफेस बांधली आहे.तुमची गॅलरी रस्त्यावर येत आहे.तुम्ही रस्त्यावर येईल असे गॅलरी घेऊ नका. या कारणावरून चार जणांनी मिळून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत एकाने फिर्यादी यांचा मुलगा सुमितराजे याच्या डोक्यात लोखंडी रॉड मारून जखमी करत धमकी दिल्याची घटना कळमण तालुका उत्तर सोलापूर येथे २६ फेब्रुवारी रोजी सकाळी घडली. याप्रकरणी विश्वनाथ सिताराम वाघमोडे (वय-५२, रा. कळमण, तालुका उत्तर सोलापूर) यांनी तालुका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून नितीन बाळू शिंदे, गजानन भारत पाटील, प्रदीप देविदास शिंदे, सचिन बाळू शिंदे (सर्व.रा.कळमण,तालुका उत्तर सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास हवालदार मिस्त्री हे करीत आहेत.

### शेतात म्हैस गेल्यावरून कोयत्याने मारहाण

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

बांधलेली म्हैस मोकळी सुटून भावकीच्या शेतात गेल्याच्या कारणावरून तीन जणांनी मिळून कोयत्याने मारहाण करून शिवीगाळ करत दमदाटी केल्याची फिर्याद विठ्ठल जगदेव बंडगर (वय-२२, रा.अंत्रोळी शिवार) यांनी मंद्रूप पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. हावण्णा म्हाळप्पा बंडगर,बिरप्पा हावण्णा बंडगर व धुंडव्वा हावण्णा बंडगर (सर्व.रा.कंदलगाव) यांच्याविरुद्ध मंद्रुप पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना २४ फेब्रुवारी रोजी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास घडली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक चव्हाण करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेत दुचाकीस्वार महिला जखमी

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

दुचाकी स्वाराने दिलेल्या धडकेत महिला दुचाकी स्वार जखमी झाली. हा प्रकार २४ फेब्रुवारीला रात्री दहा वाजता सात रस्ता ते पत्रकार भवन यादरम्यान घडला. संगीता रामचंद्र कसबे (वय ६३, रा. विशाल नगर) असे जखमी म हिलेचे नाव आहे. यातील जखमी संगीता या २४ फेब्रुवारी रोजी रात्री दहाच्या सुमारास सात रस्ता येथून पत्रकार भवनच्या दिशेने दुचाकीवर जात होत्या. त्यावेळी अचानकपणे आलेल्या ाह१३ डीपी ८०४० क्रमांकाच्या दुचाकी स्वाराने संगीता यांच्या दुचाकीला धडक दिली. यात संगीता या जखमी झाल्या. तसेच त्यांच्या दुचाकीचे सुमारे दहा हजाराचे नुकसान करण्यास एमएच १३ डीपी ८०४० क्रमांकाचा दुचाकी स्वार कारणीभूत ठरला. याप्रकरणी संगीता कसबे यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून हवालदार वाघमारे तपास करत आहेत.

### न्यू बुधवार पेठेतून दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**

न्यू बुधवार पेठ येथे हँडल लॉक करून ठेवलेले दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीजेड.९७६२ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना २५ फेब्रुवारी रोजी घडली. याप्रकरणी अशोक मुरलीधर जाधव (वय-४५, रा.न्यू बुधवार पेठ, मुकुंद चौक) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पोलीस नाईक भिमदे करीत आहेत.

# एसटी स्थानकाची सुरक्षा रामभरोसे!

## ● केवळ १२ सुरक्षा रक्षकांवर एसटी परीसराच्या सुरक्षेची भिस्त

**तभा वृत्तसेवा । यशवंत गुरव**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

पुणे येथील स्वारगेट बस स्थानकात एका तरुणीवर आत्याच्यार झाल्याची दुर्दैवी घटना घडल्यानंतर, राज्यातील विविध एसटी बसस्थानक परिसराच्या सुरक्षेचा विषय आता एरणीवर आला आहे. राज्यातील बस स्थानक सुरक्षित आहेत का? हा प्रश्न आता प्रवासी वर्गातून उपस्थित केला जात आहे. एसटीचा प्रवास हा सुरक्षित प्रवास मानला जातो. यामुळे प्रवासी एसटीला प्राधान्य देतात. परंतु एसटी परिसरच सुरक्षित नसेल तर, प्रवाशांनी प्रवास कसा करायचा अशी धाकधुक निर्माण झाली आहे.

- अप्रिय घटना टाळण्यासाठी सोलापूर बस स्थानकात परिसरात सुरक्षारक्षक वाढवण्याची गरज
- परिसरात २३ सीसीटीव्ही कॅमेरे तर १२ सुरक्षारक्षकांचा समावेश
- मेस्को कंपनीद्वारे माजी सैनिक व सैनिक पाल्यांची सुरक्षारक्षक पदावर भरती
- सुरक्षारक्षक वाढवण्यासाठी प्रस्ताव

दरम्यान, सोलापूर मध्यवर्ती बस स्थानकाच्या सुरक्षेची भिस्त केवळ १२ सुरक्षारक्षकांवरच आहे. मेस्को या कंपनीद्वारे या १२ सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. परंतु ही सुरक्षा तुटपुंजी व अपुरी आहे. सोलापूर बस स्थानकाचे क्षेत्रफळ पाहता वाढीव सुरक्षारक्षकांची गरज आहे. परंतु सोलापूर एसटी महामंडळाकडे सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्यासंबंधीचा अधिकार नसल्याने सदरचा पॉलिसी मॅटर मध्यवर्ती कार्यालयाकडे असल्याने विविध बस स्थानकात सुरक्षा रक्षकांची नेमणूक किती असावी, हा निर्णय मध्यवर्ती कार्यालयाकडून ठरवण्यात येत आहे.



### एसटी परिसरात सुरक्षेसाठी वाढीव सुरक्षा यंत्रणेचा प्रस्ताव

सोलापूर बस स्थानक परिसरात तसेच कार्यशाळा आणि डेपो येथे सुरक्षारक्षकांची संख्या वाढवण्यासंबंधी बैठक संपन्न झाली आहे. मध्यवर्ती कार्यालयाकडे याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे. म ध्यवर्ती कार्यालयाकडून यावर निर्णय घेण्यात येईल.

**- विनोद खंदारे, सुरक्षा व दक्षता अधिकारी एसटी विभाग सोलापूर**

### गांभीर्याने दखल घेणे आवश्यक

सध्या सोलापूर बस स्थानकात सीसीटीव्ही कॅमेरा आणि सुरक्षारक्षक यांची गरज आहे. प्रवासी संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असताना, अशा अप्रिय आणि अनुचित घटना टाळण्यासाठी सुरक्षारक्षक तसेच सीसीटीव्ही कॅमेरा असणे गरजेचे. त्यामुळे एसटी महामंडळ आणि शासनाने याकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

**- शितल म्हात्रे, महिला प्रवासी**

### एसटीच्या लॉक सिस्टीमवर प्रश्नचिन्ह?

ज्या शिवशाही बसमध्ये ही दुर्दैवी घटना घडली. त्या शिवशाही बसच्या लॉक सिस्टिमचे कोडे अद्यापही गुलदस्त्यात आहे. शिवशाही बसच्या लॉक सिस्टिममध्ये बिघाड झाल्यामुळे ही घटना घडली. जर लॉक सिस्टिम व्यवस्थित असली असती, तर ही दुर्दैवी घटना घडली नसती. त्यामुळे विविध बससेच्या लॉक सिस्टीमचा आढावा घ्यावा.

**- नामदेव चव्हाण, प्रवासी**

### सुरक्षा रक्षकांची नेमणूक करावी

एसटी महामंडळाने स्वतःच्या मालकीची सुरक्षारक्षकांची निर्मिती करावी. यापूर्वी एसटी म हामंडळातर्फे सुरक्षारक्षक या पदावर पदभरती केली जात होती. परंतु २०१६ नंतर ही पदभरती बंद करण्यात आली आहे. ही पदभारती पुन्हा एकदा सुरू करावी अशी मागणी आत जोर धरू लागलेली आहे.

सोलापूर बस स्थानकात सुरक्षाच्या दृष्टिकोनातून एकूण २३ सीसीटीव्ही कॅमेरा लावण्यात आले आहेत. त्यातील दोन कॅमेरे हे बंद अवस्थेत आहेत. अशातच कॅमेऱ्याची देखभाल दुरुस्तीचा मक्त्याचा कालावधी संपुष्टात आल्याने, कॅमेराची देखभाल दुरुस्ती देखील रामभरोसे बनली आहे.

यामुळे सुरक्षितता हा विषय गंभीर बनला आहे. यावर विभागीय स्तरावर बैठक घेऊन सुरक्षारक्षक वाढवण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# महिला सुरक्षेबाबत संभाजी ब्रिगेडचा आंदोलनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**



पुण्यातील स्वारगेट येथील बसस्थानकावर पहाटे एका महिलेवर अतिप्रसंग झाला त्यामुळे महाराष्ट्रातील लाडकी बहीण असुरक्षित असल्याचे वातावरण निर्माण झाले हे प्रकरण ताजे असतानाच आज संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांच्या वतीने महिलांच्या सुरक्षेबाबत सोलापूर बस स्थानक परिसराची पाहणी रात्री दहा वाजता करण्यात आली.

बस स्थानक परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे काही ठिकाणी नसल्याचे दिसून आले रात्री मुक्कामी जिथे बस थांबवल्या जातात. तिथे अंधाराचे साम्राज्य आहे डेपो मध्ये एसटीचे दरवाजे केबिन खुले आहेत. सुरक्षा रक्षक यांची कमतरता आहे. अवघे तीन-चार सुरक्षा रक्षक आहेत शौचालयाची दुरावस्था झालेली आहे. महिलांना बसण्याची जागा अपुरी आहे. एवढा मोठा बस स्थानक परिसराम ध्ये पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणूक नाही याबाबत आगर व्यवस्थापक नागेश जाधव यांना या प्रश्नाबाबत व महिलांच्या सुरक्षेचे बाबत काय दक्षता घेतली याचा संभाजी ब्रिगेडच्या वतीने जाब विचारण्यात आला पुण्यातील प्रकरणानंतर हि सोलापूर बस स्थानक प्रशासन यंत्रणा याबाबत गंभीर नसल्याचे दिसून आले. संभाजी ब्रिगेडच्या स्टाईलने आंदोलन करण्याचा इशारा देताच तातडीने वरील उपाययोजना करण्याचे आश्वासन संभाजी ब्रिगेडला आगर प्रमुख नागेश जाधव यांनी दिले. यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र



अध्यक्ष शाम कदम, जिल्हाध्यक्ष संभाजीराजे भोसले, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, गोवर्धन गुंड, संपर्कप्रमुख शत्रुघ्न माने, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष ॲड. गणेश कदम, दक्षिण तालुका अध्यक्ष शेखर चौगुले, यशवंत लोंढे, उपाध्यक्ष प्रशांत देशमुख, संतोष सुरवसे, राजेंद्र माने, संघटक सतीश वावरे, संघटक चंद्रशेखर कंटीकर, राजेश गायकवाड, सिद्धराम सावळे आदी उपस्थित होते.

# साहित्यिक लांडगेंच्या चार पुस्तकांचे रविवारी प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील साहित्यिक प्रा. संजय लांडगे यांच्या ईश्वररूप आई, मराठी गझल संग्रह हृदयी प्रेम फुलताना, मराठी रंगभूमी आणि सत्तरोत्तरी नाटकांचा विचार (नाट्य समीक्षा) तसेच साहित्यिक प्रमोद लांडगे लिखित ''अंगार-मूक वेदनांचा'' कथासंग्रह या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा रविवार दि. २ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे,अशी माहिती डॉ. शिरीष भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

समता साहित्य व कला मंडळाने हा कार्यक्रम समाज कल्याण केंद्र, रंगभवन चौक, सोलापूर येथे आयोजिला आहे. हा प्रकाशन सोहळा पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश म हानवर यांच्या हस्ते व ज्येष्ठ साहित्यिक योगीराज वाघम रे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कविवर्य हेमकिरण पत्की, प्रमोद लांडगे, ज्येष्ठ कवयित्री वंदना कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शिरिष भोसले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या पत्रकार परिषदेस प्रा. दत्तात्रय हरवाळकर, दत्ता भोसले, किरण साबळे आदी उपस्थित होते.


# तुर हमीभाव खरेदी केंद्रांत माढ्यातील शेतकऱ्यांची सर्वाधिक नोंदणी

## किमान आधारभूत किंमत मिळतेय ७५००

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी-**

राज्य शासनाच्या आदेशानुसार जिल्हा पणन कार्यालयाच्यावतीने सोलापूर जिल्ह्यात तूर हमीभाव खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहे. एन.सी.सी.एफ (भारतीय राष्ट्रीय उपभोक्ता सहकारी संघ) यांच्या द्वारा खरेदी केंद्र सुरू करण्यात आले आहेत. सदरच्या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना एक हेक्टर क्षेत्रावर लागवड केलेल्या तुरची केंद्रात विक्री करता येणार आहे.

सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुका स्तरावर हे केंद्र सुरू करण्यात आले आहे. त्यामध्ये सोलापूर, अक्कलकोट, मंगळवेढा, पंढरपूर, करमाळा, कुर्डूवाडी, बार्शी मानेगाव (माढा) या केंद्रांचा समावेश आहे. दरम्यान, मंगळवेढा तालुक्यातील शेतकऱ्यांनी सर्वाधिक नोंदणी तूर हमीभाव खरेदी केंद्रांत केली आहे. एकूण ९४ शेतकऱ्यांनी खरेदी केंद्रात तूरची विक्रीसाठी नोंदणी केली आहे. त्यात ७५ शेतकरी हे मंगळवेढा तालुक्यातील आहेत. यंदा प्रथमच हमीभाव खरेदी केंद्रापेक्षा बाजार तुरीला चांगला दर मिळत आहे. प्रतवारी नुसार तुरीला ७,००० ते ८,००० प्रती क्विंटल असा दर मिळत आहे. तर दुसरीकडे खरेदी केंद्राच्या वतीने आधारभूत किंमत ७,५०० इतकी ठरविण्यात आलेली आहे. ती सुद्धा केवळ एक हेक्टर क्षेत्रसाठी, परंतु बाजारात व्यापारी सर्वच तुरीला चांगला दर देत असल्याने, शेतकऱ्यांनी हमीभाव खरेदी केंद्राकडे पाठ फिरवली असल्याचे चित्र दिसत आहे.



**तूर उत्पादन**
- ७५ हजार ३०५ मे.टन
- हमीभाव खरेदी केंद्र उद्दिष्ट १८,८२६ मे.टन
- प्रति हेक्टर ७६० क्विंटल

**हमीभाव खरेदी केंद्र निहाय नोंदणीची संख्या**

| केंद्र | शेतकऱ्यांची संख्या |
|---|---|
| सोलापूर | ० |
| अक्कलकोट | ० |
| मंगळवेढा | ७५ |
| पंढरपूर | ० |
| करमाळा | १५ |
| कुर्डूवाडी | ० |
| माढा | ३ |
| बार्शी | १ |
| एकूण | ९४ |

हमीभाव खरेदी केंद्रापेक्षा शेतकऱ्यांना जास्त भाव अपेक्षित आहे. बाजारपेठेत काही व्यापारी तुरीच्या प्रतवारीनुसार चांगला दर देत आहेत. त्यामुळे शेतकरी खरेदी केंद्राकडे न येता थेट व्यापारी यांच्याशी संपर्क साधत आहेत. शेतातूनच तूर खरेदी केली जात आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येत घट झालेली आहे.

**- हरिदास भोसले, जिल्हा पणन अधिकारी**

# जिल्हा परिषदेची दुर्धर आजार योजना ठरतेय रुग्णांसाठी वरदान

## ● ४५ लाभार्थ्यांना ६ लाख ७५ हजार रूपये अनुदान वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

किडनी विकार, हृदयरोग व कर्करोग या रोगांसाठी जिल्हा परिषदेच्या सेस फंडामधून दुर्धर आजार अर्थसाहाय्य योजना राबविण्यात येते. या योजने अंतर्गत लाभार्थ्याला विविध कागदपत्रांसह प्रस्ताव आरोग्य विभागाकडे सादर करावा लागतो. दुर्धर आजार योजना समितीच्या बैठकीत प्रस्ताव पात्र झाल्यानंतर लाभार्थ्याला पंधरा हजार रूपये अनुदान देण्यात येते. चालू वर्षात दुर्धर आजार अर्थ सहाय योजनेसाठी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत जिल्ह्यातून ७६ लाभार्थ्यांकडून अर्ज प्राप्त झाले असून यापैकी ४५ लाभार्थ्यांना सहा लाख ७५ हजार रुपयांचे अनुदान त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. ७६ प्रस्तावापैकी ३१ प्रस्ताव अपात्र झाले आहेत.

जिल्हा परिषदेत पदाधिकारी असताना सेस फंडमधून ७० लाखांची तरतूद करण्यात आली होती. मात्र प्रशासकांच्या काळात या योजनेसाठी अंत्यत तुटपुंजी तरतूद करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून जानेवारी अखेरपर्यंत ७६ लाभार्थ्यांनी प्रस्तार सादर केले आहेत. यात आरोग्य विभागाकडून ३१ प्रस्ताव अपात्र करण्यात आले आहेत. ४५ लाभार्थ्यांना प्रति लाभार्थी १५ हजार रूपयांप्रमाणे सहा लाख ७५ हजार रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले असून अद्याप १३ लाख २६ हजार रूपये अनुदान शिल्लक आहे. १३ लाभार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. उपचार घेणारे रूग्णालय शासनमान्य नसेल, योजनेत न बसणारा आजार, दुबार लाभ घेणारा अर्ज, शहरी भागाचा लाभार्थी व अपूर्ण कागदपत्रांमुळे या योजनेत प्रस्ताव अपात्र करण्यात येते. लाभार्थ्यांनी नियमानुसार प्रस्ताव व निकषात बसलेल्या लाभार्थींचे अर्ज पात्र करण्यात आले आहेत. लाभार्थी ग्रामीण भागातील जिल्हा परीषद मतदारसंघ क्षेत्रातील रहिवाशी असावा. सोलापूर शहरासह मंगळवेढा, पंढरपूर, बार्शी, करमाळा, सांगोला, माळशिरस, अक्कलकोट, दुधनी, मैंदर्गी, कुर्डूवाडी यासह अन्य नागरी भागातील रहिवासी अर्जदार असल्यास अशा लाभार्थ्यांचेही अर्ज अपात्र करण्यात आले आहेत.



- तरतूद रक्कम २० लाख रूपये
- अनुदान खर्च ६ लाख ७५ हजार
- शिल्लक १३ लाख २५ हजार रूपये
- जानेवारी अखेरपर्यंत ७६ प्रस्ताव
- पात्र प्रस्ताव ४५
- अपात्र प्रस्ताव ३१
- प्रलंबित प्रस्ताव १३
- अनुदान खात्यावर लाभार्थी ४५

### आठ दिवसात अनुदान मिळावे

ग्रामीण भागातील दुर्धर आजारग्रस्त रुग्णांसाठी सेसमधून प्रति लाभार्थ्याला मिळणारे १५ हजार रुपये अनुदान रुग्णाने अर्ज सादर केल्यानंतर आठ दिवसात त्यांच्या बँक खात्यात आठ दिवसांच्या आत अनुदान जमा करावे. आरोग्य विभागाकडे १३ प्रस्ताव अनुदानासाठी प्रलंबित आहेत.

**-सुरेश हसापुरे, माजी सदस्य, जिल्हा परिषद**

दुर्धर आजार योजना समितीची दर तीन महिन्याला मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली , जिल्हा आरोग्य अधिकारी व इतर सदस्यांच्या उपस्थितीत बैठक घेतली जाते. या बैठकीत प्राप्त अर्जावर चर्चा करुन लाभार्थ्यांची निवड केली जाते. समितीच्या बैठकीत प्रस्ताव पात्र झाल्यानंतर अनुदान रक्कम रुग्णाच्या बँक खात्यात जमा केली जाते.

**- महिबूब निटोरे, दुर्धर आजार योजना, जि.प. सोलापूर**

### दुर्धर आजार योजनेमुळे अर्थसहाय

जिल्हा परीषदेच्या दुर्धर आजार अर्थ सहाय योजनेमुळे आजारी असताना पंधरा हजार रूपयांचे अनुदान मिळाले. यामुळे आजारपणात उपचार घेण्यासाठी अर्थसहाय मिळाले.

**-लाभार्थी, मंद्रुप**

जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत सेस फंडामधून किडनी, हृदयरोग व कर्करोग या आजारांसाठी १५ हजार रूपये अनुदान देण्यात येते. पात्र लाभार्थ्यांनी आरोग्य विभागाकडे प्रस्ताव सादर करून अनुदानाचे लाभ घ्यावे.

**- संतोष नवले, आरोग्य अधिकारी, जिल्हा परीषद सोलापूर**

### भाड्यावरून वादावादी घरमालकावर गुन्हा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी -**


शहरातील दमाणी नगर परिसरात घराच्या भाड्यावरून घरमालक व भाडेकरू यांच्यात वादावादी होऊन घरमालकावर विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला. ही घटना १३ फेब्रुवारी रोजी घडली.

याबाबत पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन वैभव चौधरी, मोहन चौधरी, विशाल चौधरी, शैलेश चौधरी, शैलेश चौधरीचा लहान भाऊ, दोन अनोळखी बायका यांच्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ फेब्रुवारी रोजी दुपारी पिडीत महिला ही घरी असताना घरम ालक वैभव चौधरी, विशाल चौधरी हे घरी आले. त्यांनी पिडीतेकडे भाडे मागितले. त्यावेळी पिडीतेने भाडे देण्यासाठी दोन दिवसाची मुदत मागितली. त्यावेळी चौधरी यांनी पिडीतेला अश्लिल शिवीगाळ करून तिचा विनयभंग केला. तसेच दोन अनोळखी बायकांनी घरातील साहित्य घराबाहेर आणून ठेऊन घराला कुलूप लावले. स. पोलिस निरीक्षक आर. पी. खंडागळे पुढील तपास करीत आहेत.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०४२

**पाहा पां अनुरागें भजे । जे प्रियोत्तमें मानिजे ।**
**ते पतिहीहून काय न वर्णिजे । प्रतिव्रता ? ।।**

सेवा, प्रेम, आपुलकी, विश्वास असे विषय स्पष्ट करुन दाखविण्याचा प्रसंग आला की, माऊली लागलीच स्त्रीकडे वळतात. स्त्री ही ममत्वाची, प्रेमाची, विश्वासाची, निस्वार्थसेवेची मूर्ती असल्याने माऊली स्त्रीच्या माध्यमातून आपला अवघड विषय अत्यंत सुलभतेने श्रोत्यांच्या गळी उतरवतात. माऊली प्रमाणे आपण सर्वांनी स्त्रीला असे महत्वाचे स्थान दिले तर, समाजात बलात्कार, खूण, हूंडाबळी, बालविवाह असे अनिष्ट प्रकार होणार नाहीत. निर्गुण असणारा परम ात्मा अर्जुनाच्या प्रेमापोटी सगुण झाला आहे. अर्जुनाच्या प्रेमापोटी श्रीकृष्ण स्वत:ला विसरुन गेले आहेत. त्याच्या शंका-कुशंकाचे समाधान ते करीत आहेत. वयाच्या शेवटी म्हातारपणी एखादया वांझ स्त्रीला जर मुल झाले तर ती पुत्रम ोहाची मुर्तिमंत पुतळी जणू नाचु लागते. तशीच स्थिती श्रीकृष्णांची अर्जुनाच्या बाबतीत प्रेमापोटी झाल्याचे माऊली म्हणतात. येथे प्रेमाचे किती नवल आहे. पहा केवढा आत्मज्ञानाचा उपदेश । केवढी युध्दभुमीवरील झुंज ।



अशा अवस्थेत युध्दभूमीवर अर्जुनापुढे श्रीकृष्णप्रेमाचे बाहुले नाचत आहे. आवड आणि लाज, व्यसन आणि तिटकारा, भ्रांत आणि शुध्दी या जोडया एकत्र असणे संभवत नाही. आवड म्हटले की लाज संपते, व्यसन म्हटले की तिटकारा संपतो आणि भ्रांत म्हटले की, शुध्दी सरते. अर्जुनाच्या प्रेमापोटी श्रीकृष्णाने हे सर्व प्रत्यक्षात उतरवून दाखविले आहे. श्रीकृष्णाचे अर्जुनावरील प्रेम पाहिल्यानंतर माऊलींना श्रीकृष्णापेक्षा अर्जुनाचेच जास्त गुण गाण करावे वाटत आहे. माऊली हे पटवून देतांना म्हणतात, पाहा पां अनुरागें भजे ! जे प्रियोत्तमें मानिजे । ते पतिहीहूनि काय न वर्णिजे! प्रतिव्रता ? ।। अर्थात, जी पत्नी पतीची एकनिष्ठपणे सेवा करते आणि तिचा पती तिच्या प्रेमसेवेमुळे तिचा बहुमान ठेवतो. अशा पतिव्रतेची पतीपेक्षाही अधिक स्तुती केली जाते. अशी पत्नी त्या स्तुतीस पात्र असते. अर्जुनाच्या बाबतीत या प्रेमाचे स्पष्टीकरण करतांना माऊली म्हणतात, तैसा अर्जुनुचि विशेषे स्तवावा ! ऐसें आवडलें मज जीवा । जे तो त्रिभुवनींचिया दैवां । एकायतनु जाहला ।। याप्रमाणे देवापेक्षाही देवाला प्रिय असणा-या अर्जुनाचेच विशेष गुणवर्णन करावे, असे माझ्या मनाला आवडते. कारण त्रैलोक्यातील सर्व पुण्याई त्याच्या वाटयाला आली आहे. असे माऊली म्हणतात. एखादा महान व्यक्ति, नेता, महात्मा एखादयाच्या घरी आला तर आपण ज्याच्या घरी अशी महान व्यक्ति आली त्या व्यक्तिचे गुणगान करतो. कारण हे महान नेतृत्व त्या व्यक्तिच्या प्रेमापोटी त्याच्या घरी आलेले असते. अगदी तसेच निर्गुण परमात्मा अर्जुनासाठी साकार होऊन त्याच्यासाठीच आले आणि स्वत:चे सर्वस्व विसरुन त्याच्या समोर कटपुतली प्रमाणे त्याच्या ईशारावर त्याला पाहिजे ते करीत आहेत. म्हणून माऊली अर्जुनाचे स्तवन करण्यात आनंद मानत आहेत. अर्जुनाला मार्गदर्शन करण्यासाठी श्रीकृष्ण लाभले. त्याप्रमाणे आपणाला संसाराच्या म ोहातून व मीपणाच्या जाळयातून बाहेर काढण्यासाठी ज्ञानेश्वर माऊली ज्ञानेश्वरीच्या रुपाने आले आहेत, म्हणून आपणसुध्दा अर्जुनाच्या पंक्तीला बसण्यास पात्र झालो आहोत..

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. २८ फेब्रुवारी २०२५ | राष्ट्रीय विज्ञान दिन |
| विक्रम संवत् २०८०-८१ | गोकर्ण-महाबळेश्वर रथोत्सव |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - फाल्गुन | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. प्रतिपदा (२७.१६) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वसंत | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - शततारका (१३.४०) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सिध्द (२०.०७) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - किस्तुघ (१९.३७) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा म ध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ** : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन**: व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मि ळण्याची शक्यता.

**कर्क**: अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह** : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद होईल.

**कन्या** : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. काम काजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ** : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल.

**वृश्चिक** : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दु:खी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर** : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मि ळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वत: निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन**: कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल.

# तासिका तत्वावरील प्राध्यापकांना मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

## प्राध्यापिकेस सेवा सातत्यासह सेवेत कायम करण्याची शिफारस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

तासिका तत्वावरील प्राध्यापकांना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. डॉ. श्रीमती राजश्री नितीन गायकवाड यांनी मुंबई उच्च न्यायालयात यांनी तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या हक्कासंदर्भात दाखल केलेली याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या दोन न्यायमूर्तींनी मंजूर करताना तासिका तत्वावरील प्राध्यापिकेस सेवा सातत्यासह सेवेत कायम करण्याची शिफारस केलेली आहे.



ही याचिका मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश रविंद्र घुगे आणि न्यायाधीश अश्विन भोबे यांनी दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी मंजूर केली आहे. याबाबत थोडक्यात माहिती अशी की, डॉ. राजश्री नितीन गायकवाड या तासिका तत्वावर रयत शिक्षण संस्थेच्या संस्था संचलित एल.बी.एस. कॉलेज, सातारा येथे सन २००५ पासून सेवेत होत्या. सेवेत असताना त्यांनी त्याची शैक्षणिक अर्हता परिक्षार्थी होवून वाढविण्याचा प्रयत्न केला आणि त्यात त्यांना यश मिळाले. या तासिका तत्वावरील प्राध्यापिकेला कायम प्राध्यापिकेचा दर्जा मि ळावा, त्याच प्रमाणे सेवा सातत्य मिळावे आणि सेवानिवृत्ती नंतरचे देखील सर्व फरक व फायदे मिळावेत अशा स्वरुपाची याचिका मुंबई उच्च न्यायालयात या प्राध्यापिकेने ॲड. आय.एम. खैरदी यांच्यामार्फत दाखल केली होती. या याचिकेस शिक्षण संस्था आणि शिवाजी विद्यापिठ या दोघांनी तसेच महाराष्ट्र शासनाने देखील विरोध केला होता. हा विरोध करताना या प्राध्यापिकेस मास्टर डिर्गी घेताना ५५ टक्के पेक्षा जास्त मार्क मिळाले नाहीत. त्यामुळे त्या इ+ या प्रवर्गात मोडत नाहीत. तसेच तासिका तत्वावरील कर्मचाऱ्यांना कोणतेही फायदे कायद्याने मिळत नाहीत अशी भुमिका शासनाच्या वतीने घेण्यात आली होती. मात्र मुंबई उच्च न्यायालयात अशा प्राध्यापिकेला देण्यात आलेले गुण, त्या गुण वाढीची संकल्पना याची मुद्देसूद मांडणी करण्यात येवून विद्यापिठ कायद्याअंतर्गत ही महिला प्राध्यापिका सर्व कायदेशीर बाबी पुर्ण करत असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यामुळे दर ११ महिन्यानी या प्राध्यापिकेस दिला जात असलेला नियुक्ती आदेश हा अन्यायकारक असून सदर महिला प्राध्यापिका या तिचे सेवेतील सात्यत पाहता कायम झालेल्या आहेत. त्यामुळे विद्यापिठ अनुदान आयोगाच्या निर्णयाचा आधार घेवून या प्राध्यापिकेविरुध्द कोणतीही कारवाई करता येणार नाही अशी भुमिका मांडण्यात आली. मुंबई उच्च न्यायालयाने याचा सखोल निर्णय देताना तौलनीक पध्दतीने उहापोह करुन सदर प्राध्यापिका या तिचे सेवासात्यतासह कायम प्राध्यापिका म्हणून कार्यरत राहतील.

त्याचा तसा प्रस्ताव विद्यापिठाकडे व्यवस्थापनाने पाठवावा आणि या प्रस्तावास ३० दिवसाच्या आत विद्यापिठाने मान्यता द्यावी. तसेच या महिला प्राध्यापिकेस सेवानिवृत्तीचे सर्व फरक फायदे देखील दिले जावेत. अशा स्वरुपाचे निर्देशनाचे आदेश देवून ही याचिका पुर्णपणे मंजूर केली. अशा पध्दतीचा निकाल हा तासिका तत्वावरील प्राध्यपकांसाठी मोठा दिलासा देणारा ठरलेलाच आहे. न्यायीक इतिहासातील हा पहिलाच निकाल असल्यामुळे या निर्णयाचे मोठे पडसाद महाराष्ट्रातच नव्हे तर देशात देखील भविष्यात दिसून येतील.

याकामी याचिकाकर्त्याकडून ॲड. आय.एम. खैरदी, ड. नितीन हबीब यांनी यांनी कामकाज पाहिले. तर शासनातर्फे ॲड. विक्रम वालवाकर, शिवाजी विद्यापिठातर्फे ॲड. स्वप्नील कांबळे, ॲड. मिलींद देशमुख वगैरे कामकाज पाहिले.



# वंडर वुमन २०२५ पुरस्कारांची घोषणा

### २ मार्चला वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

सोलापूरमधील म्युझिक आर्ट डान्स ॲकॅडमीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त देण्यात येणाऱ्या 'वंडर वुमन २०२५' पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सोलापुरातील मान्यवर महिलांचा यंदा सन्मान केला जाणार आहे.

यंदाच्यावर्षी पुरस्कार जाहिर झालेल्या मान्यवर महिलांमध्ये डॉ. शोनाली वळसंगकर, डॉ. श्रद्धा पांढरे, डॉ. मोनिका उंबरदंड, डॉ. गौरी कहाते, शर्मिला शहा, श्वेता मेगेरी, ॲड.साधना संगवे, गौतमी साबळे, समर कारिगर यांचा सम ावेश आहे. हा पुरस्कार वितरण सोहळा २ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता जुळे सोलापुरातील होटल गोल्डन फोर्क येथे होणार यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जनकल्याण पतसंस्थेच्या सौ. आशा हजारे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रम ाचे आयोजन म्युझिक आर्ट डान्स ॲकॅडमीचे अध्यक्ष सौ. असावरी गांधी, अर्टिस्ट विकास गोसावी, कोरिग्राफर भोमिशा शहा, सोनाली वाघमोडे, डॉ अंशु शर्मा, आदित्यविक्रम गांधी, सचिन जगताप, ॲड. मनोज गिरी यांनी केले आहे.

या सोहळ्याच्या माध्यमातून सोलापुरातील महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार असून, त्यांच्या योगदानाची दखल घेत त्यांना प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सन्मानित करण्यात येणार आहे. महिला सशक्तीकरणाचा उत्सव म्हणून हा सोहळा साजरा होणार असल्याचे ॲकॅडमीच्या अध्यक्षा आसावरी गांधी यांनी सांगितले.

# महिलांच्या सुरक्षिततेसाठी तयार होत आहे मोबाईल ॲप

### पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

सोलापूर ग्रामीण पोलिसांच्यावतीने महिलांच्या सुरक्षिततेसाठी ॲप तयार करता आहोत. मुलींनो निर्भयपणे शिक्षण घ्या. महिलांच्या सुरक्षितते साठी पोलिस प्रशासन कटीबद्ध आहे, असेही पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी सांगितले.

पंढरपूर तालुक्यातील सिध्देवाडी येथे जिल्हास्तरीय सेंद्रीय शेती कार्यशाळेत युवकांना मार्गदर्शन करताना पोलिस अधिक्षक कुलकर्णी बोलत होते. जिल्ह्यात सेंद्रीय शेतीची चळवळ सुरू होत आहे. सिध्देवाडी सेंद्रिय शेतीचे रोज मॉडेल करा, असे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले. याप्रसंगी पोलिस उप अधिक्षक अर्जून भोसले, तालुका पोलिस निरीक्षक तय्यब मुजावर, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, सरपंच रोहिणी जाधव, पोलिस दत्तात्रय जाधव, उप सरपंच आनंदा जाधव, दीपक भालेकर, तंटामुक्ती चे अध्यक्ष समाधान जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी चौधरी, कार्यक्रम अधिकारी केंद्रे प्रमुख उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कर्मवारी भाऊराव पाटील महाविद्यालय, ग्रामपंचायत सिध्दवाडी, कै. स्वाती जाधव महिला फाऊंडेशन यांचे संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करणेत आले होते.

सिध्देवाडी गावात शेतकरी यांनी दोन गुंठे जमीन स्वतः साठी मोहिम राबविणेत येत आहे. यासाठी सर्व तांत्रिक सहाय्य करणेस टीम तयार आहे. घरगुती स्तरावर परसबागांचे नियोजन करा. स्वतः चे घरा साठी भाजीपाला निर्माण करा. सध्या युवकांचे माध्यम ातून अन्न सुरक्षा व विषमुक्त शेतीचे प्रयोग सुरू करा.



या मध्ये महिलांचा सहभाग महत्वाचा आहे.

तसेच नदीकाठाची जमिनीची धूप थांबविण्यासाठी बांबू लागवड व वृक्षारोपण, नदीकाठी स्वच्छता मोहिम, पर्यावरण चांगले राहणे साठी देशी वृक्ष लागवड असे उपक्रम करण्यात येणार आहेत. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संगिता सुरेश गोडसे, बेबीनंदा बाबुराव गोडसे, आप्पा जाधव, रमेश बनसोडे, विजय जाधव, भास्कर जाधव, सरपंच रोहिणी सारंग जाधव, सारंग जाधव, ग्रामसेवक महादेव भुसे, दैवशीला घुले, पोलीस पाटील चिचुंबे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन रमांकात गायकवाड यांनी आभार एम.बी. जाधव यांनी मानले.

# कापूस, सोयाबीन उत्पादकांना मिळणार अर्थसहाय्य

### आधार संमती अन् ना हरकत प्रमाणपत्र सादर करा

### जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी भोसले यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

कृषी विभागाच्या सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य योजनेंतर्गत अर्थसहाय्य निधी अप्राप्त असलेल्या खातेदारांनी दि. २८ फेब्रुवारीपर्यंत आधार संमती व ना हरकत प्रमाणपत्र कृषी विभागाकडे सादर करावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

सन २०२३ या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी योजनेंतर्गत ५००० रुपये प्रति हेक्टर प्रमाणे अर्थसहाय्य कमाल २ हेक्टरच्या मर्यादेत देण्यात येत आहे. यासाठी खरीप २०२३ मध्ये ई-पिक पाहणी केलेले कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकरी, ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई. पिक पहाणी पोर्टलवर नोंद केलेली नाही तथापि ज्यांच्या खरीप २०२३ च्या ७/१२ उताऱ्यावर कापूस किंवा सोयाबीन पिकाची नोंद आहे, असे खरीप २०२३ कापूस सोयाबीन उत्पादक वैयक्तिक व सामाईक खातेदार पात्र आहेत पात्र शेतकऱ्यांनी ई-पिक पहाणी पोर्टलवरील यादीत आपले नाव असलेबाबत खातरजमा करुन घ्यावी तसेच ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई. पिक पहाणी पोर्टलवर नोंद केलेली नाही तथापि ज्यांच्या खरीप २०२३ च्या ७/१२ उताऱ्यावर कापूस किंवा सोयाबीन पिकाची नोंद आहे. अशा शेतक-यांनी आपल्या गावातील संबंधित तलाठी यांचेशी संपर्क साधावा.

# सुरत-चेन्नई बाधितांचे ४९१ कोटी प्रलंबित

## ३३ निवाड्यांतून २०६.६४ हे. आर क्षेत्र संपादित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडोर प्रकल्प कामकाजाअंतर्गत अक्कलकोट, बार्शी, दक्षिण सोलापूर व उत्तर सोलापूर तालुक्यातील ५८ गावांतील जमिनी संपादित करण्यात आलेल्या आहेत. महामार्गाकरिता प्राप्त प्रस्तावामधील नुकसानभरपाई मंजुरी आदेश भूमी राशी पोर्टल (एफटीओ) द्वारे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यात आले असून सदर कार्यवाही एनएचआय स्तरावरुन प्रलंबित असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.११) प्रमोद गायकवाड यांनी दिली. दरम्यान, ३३ निवाड्यांतून २०६.६४ हे. आर क्षेत्र संपादित केले असून, याचे ४९१.५३ कोटी रूपये प्रलंबित असल्याचेही त्यांनी सांगितले.

संपादीत करण्यात आलेल्या तालुका व गावनिहाय प्रलंबित नुकसान भरपाई, वाटपाची माहिती दि. २३ जानेवारी ते २० फेब्रुवारी २०२५ या कालावधीतील अक्कलकोट,



बार्शी, दक्षिण सोलापूर तालुक्यातील एकूण ८४ नुकसानभरपाई मंजुरी आदेश व ३०८ खातेदारांची नुकसानभरपाई रक्कम रु. १५.९२ कोटी भूधारकांच्या खातेमध्ये जमा करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सोलापूर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. या प्रकरणांमधील पुढील कार्यवाही करणेची जबाबदारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागाची असून प्राधिकरणामार्फत सदरची रक्कम बाधीत भूधारकांच्या खातेवर जमा करण्यात आलेली नाही.

तसेच अहमदनगर- सोलापूर- अक्कलकोट (कर्नाटक हद्द) चौपदरीकरणासाठी भूसंपादन (सुरत-चेन्नई ग्रीनफिल्ड कॉरिडोर प्रकल्प) कामकाजाअंतर्गत सन २०२३ ते २०२५ या कालावधीमध्ये एकूण ३३ मूळ व पुरवणी निवाडे जाहीर करण्यात आले असून, निधी मंजुरीकरिता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण सोलापूर यांचे कार्यालयाकडे पाठविण्यात आले आहेत. सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून घोषीत करण्यात आलेल्या ३३ निवाडयांम धील एकूण संपादित क्षेत्र २०६.६४ हे. आर करीता निवाड्याची रक्कम रुपये ४९१.५३ कोटी अनुदान उपलब्ध होऊन मिळणेबाबत प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण सोलापूर व महाव्यवस्थापक (तां), राष्ट्रीय महामार्ग प्रादेशिक कार्यालय, मुंबई या कार्यालयाकडे पाठपुरावा करण्यात आलेला आहे. प्रस्तावित महामार्गाकरिता जाहीर करण्यात आलेल्या निवाडयांमध्ये निधी उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण विभागाची असल्याचेही उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र.११) गायकवाड यांनी कळविले आहे.

# दमाणी नगरचा रेल्वे पूल होणार जमीनदोस्त

## मध्य रेल्वेच्या ग्रीन सिग्नलची प्रतीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

शहरातील भैय्या चौक ते दमानी नगर जोडणारा ब्रिटिश कालीन शंभर वर्षांपूर्वीचा पूल पाडून नवा बांधण्यात येणार आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या कामासाठी गोयल इन्फ्रा कंपनीला ३५ कोटींचा मत्का दिला आहे. महिनाभरापूर्वी वर्क ऑर्डर दिली आहे. मात्र मध्य रेल्वे विभागाकडून पूल पाडण्याच्या आराखड्याला अद्याप मंजुरी मिळाली नसल्याने काम सुरू झालेले नाही.

दरम्यान, पूल पाडण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने सहा महिन्यांपूर्वी रेल्वेच्या विभागीय कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला होता.

परंतु अद्याप त्याला रेल्वे विभागाकडून ग्रीन सिग्नल मिळाला नाही.त्यामुळे पुलाची काम रखडलेले आहे. रेल्वे प्रशासनाने या आराखड्यास मंजुरी दिल्यानंतर तातडीने याचे काम सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

> **रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर कामास सुरुवात**
>
> दमाणीनगर रेल्वे पुलाचे काम तत्काळ सुरू करण्याचा प्रयत्न आहे. तो पाडण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून मंजुरी मिळाल्यानंतर लगेच कामास सुरुवात केली जाईल. सध्याचा जुना पूल पाडून पावसाळ्यापूर्वीच नवा पूल उभारणीचे फाउंडेशन तयार करण्याचा प्रयत्न आहे. तसे नियोजन केले आहे.
>
> **- राकेश जवादे,** प्रकल्प संचालक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलकः- (६५) बालस्वयंसेवक

संघाने प्रारंभापासूनच दहा वर्षाखालील मुलांचा शिशुवर्ग व ११ ते १४ वर्षातील मुलांचा बालवर्ग ठरवला होता. विशेष करून संघ शाखेत या वयातील मुलांवर होणाऱ्या संस्कारक्षम गोष्टींचा आवर्जून समावेश होत असे. मनाला देशभक्ती कळली, रुचली तरच हे बाल स्वयंसेवक भारत मातेची सेवा करण्यासाठी त्यांच्या पुढील आयुष्यात तत्पर असतील, ते देशद्रोही कृत्य करणार नाहीत असा डॉक्टरांना विश्वास होता. ते शाखेच्या

वर्गशिक्षकांना नेहमी म्हणायचे या शिशु- बाल वर्गाला खेळवणे सोपे काम नसते. त्यांना खेळवताना कधी कधी निरसपणा वाटतो, कंटाळा येतो. पण ही कंटाळवाणी कामे राष्ट्राकरता करायलाच हवीत. या वयातच त्यांना जीवन जगण्याचे शास्त्र कळले पाहिजे. कारण हे शास्त्र तेजस्वी हिंदू राष्ट्र घडवण्यासाठी समर्थ ठरणार आहे व ही ज्येष्ठांची जबाबदारी व कर्तव्य आहे अशा रीतीने संघाचा मार्ग अचूक; उत्साह अपूर्व; काळ अनुकूल; व नेतृत्व असामान्य होते. अशा असामान्य सरसंघचालकांना मी शतशत नमन करते।

क्रमशः

## माय मराठीचा जागर



### मराठी भाषा गौरव दिन साजरा

**सोलापूर, दि. २७ फेब्रुवारी-**

कवी कुसुमाग्रज यांची जयंती सर्वत्र मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी शाळा, महाविद्यालये आणि विविध संस्थांच्या वतीने विविध उपक्रमही राबविण्यात आले.

### अकलूजमध्ये ग्रंथदिंडी

**अकलूज :** कवी विष्णू वामन शिरवाडकर यांची जयंती आज मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी मुख्याध्यापक अमोल फुले, डॉ विश्वनाथ आवड, उपमुख्याध्यापक दत्तात्रय घंटे, उपप्राचार्य झाकीर सय्यद, व्यवसाय विभागाचे उपप्राचार्य भारत शिंदे आदी उपस्थित होते. प्रारंभी मुख्य रस्त्यावरून ग्रंथ दिंडी काढण्यात आली. विद्यालयातील वाद्यवृंदाने मराठी गौरव गीत सादर केले. त्यानंतर उपस्थित सर्व मान्यवरांचा व मराठी विषयाचे अध्यापन करणाऱ्या सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या चित्रतरंग या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. सुमित खामगळ व शिक्षिका लक्ष्मी अस्वरे यांची भाषणे झाली. डॉ. विश्वनाथ आवड यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सुनिता ठोंबरे यांनी केले. सूत्रसंचालन तेजश्री माने तर आभार अंजली कदम यांनी मानले.



### कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी

**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी व महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती तथा मराठी राजभाषा दिन पार पडला. यावेळी खजिनदार जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे, मसाप बार्शी शाखाचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर, बी. आर. देशमुख, प्रकाश गव्हाणे, प्रकाश महामुनी, दिलीप कल्याणी, शारदा पानगावकर, सुमन चंद्रशेखर, गिरीश सोनार, डॉ. आर. ए. फुरडे, डॉ. पी. ए. पाटील उपस्थित होते. शारदा पानगावकर यांनी मराठी गौरव गीत सादर केले. बी. एड. प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. पां. न. निपाणीकर यांनी प्रास्ताविक केले. वक्तृत्व स्पर्धेत यश संपादन केलेल्या स्पर्धकांचा सत्कार करण्यात आला. यात कोमल नहार, आनंद लोंढे व रणजीत भालेराव यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला. वक्तृत्व स्पर्धा परीक्षक म्हणून डॉ. आर. ए. फुरडे व डॉ. एम. व्ही. मते यांनी काम पाहिले. कोमल नहार यांनी मनोगत व्यक्त केले. बी. आर. देशमुख व दिलीप कल्याणी, जयकुमार शितोळे, प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी मार्गदर्शन केले. आभार डॉ. पी. ए. पाटील यांनी मानले. सुचिता गायकवाड व अफरोजजहान मोमीन यांनी सूत्रसंचालन केले.



### जवाहर विद्यालय, अणदूर

**अणदूर, दि. २७ फेब्रुवारी-**

येथील जवाहर विद्यालयात अभिजात मराठी राजभाषा दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी व मराठी विषय शिक्षक सिध्देश्वर मसुते, प्रमिला सलगरे, संध्या जाधव, जयश्री रेडेकर, अश्विनी केंद्रेकर यांनी जेष्ठ कविवर्य, नाटककार, पटकथाकार, समीक्षक विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन केले. मराठी राज भाषादिनानिमित्त विद्यार्थी आरूष बलसुरकर, करण गिरी, रजत गायकवाड, आदित्य घोडके, शुभांगी गिराम, श्रीकांत शिदोरे, अक्षय घोडके, पूर्वी जाधव, कृष्णा कुताडे, गायत्री बिराजदार, निधी बिराजदार, श्रृती नाईकवाडे, अपूर्वा बिराजदार यांनी मराठी भाषेचे महत्त्व, विविध सामुदायिक गीते, कविता सादर केल्या. शिक्षक मनोगतात मसुते, रेडेकर, ज्योती चौधरी यांनी मराठी राजभाषा साजरा दिनाबद्दल मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक गोपाळ कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन आर्या घुगे, श्रृती नाईकवाडे यांनी केले तर आभार रोहित मोरे यांनी मानले.

### एच. जी. प्रचंडे प्रशाला, नागणसूर

**अक्कलकोट, दि. २७ फेब्रुवारी-**

नागणसूर येथील एच. जी. प्रचंडे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सोलापूर आकाशवाणीचे वृत्तनिवेदक व पत्रकार मारुती बावडे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य शंकर व्हनमाने होते. प्रास्ताविक प्रा. प्रशांत नागुरे यांनी केले. यावेळी प्रा. इरण्णा धानशेट्टी, प्रा. शरणू मणुरे, बसवराज धानशेट्टी, प्रा. अनिल इंगळे, चन्नवीर कल्याण आदी उपस्थित होते. यावेळी प्रा. चिदानंद मठपती, थावरु चव्हाण, प्राचार्य शंकर व्हनमाने यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी उत्कृष्ठ ग्रंथ वाचक पुरस्कार, ग्रंथालय विभागाच्या वतीने सोळा पुरस्कार प्रदान करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमिला




शिवगुंडे, बेबी प्रचंडे, वर्षाली सोनटक्के, विश्वनाथ तळवार, सागर पोतदार, आकाश कोनापुरे, आकाश धोत्री, नितीन धानशेट्टी आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख विश्वनाथ वाघमोडे यांनी केले तर आभार थावरू चव्हाण यांनी मानले.

# भिक्षुक, मनोरुग्णांचा भार पंढरीला सोसवेना!

## शिर्डीच्या धर्तीवर पंढरपुरातील भिक्षेकरी, भिकाऱ्यांची मुंबईला रवानगी करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी-**

नुकतेच शिर्डीमधील भिक्षेकऱ्यांची स्थानिक प्रशासनाकडून मुंबई येथे खास रवानगी करण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर तीर्थक्षेत्र पंढरपुरातील भिक्षेकऱ्यांचीदेखील रवानगी करण्यात यावी अशी मागणी शहरातील नागरिकांकडून केली जात आहे. आता त्यांचा भार पंढरीला सोसवेनासा झाला आहे.

पंढरपूर हे राज्यातील प्रसिध्द तिर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी दररोज हजारो भाविक विठ्ठलाच्या दर्शनाला येत असतात. वर्षभरात आषाढी, कार्तिकी, चैत्री आणि माघी या चार प्रमुख यात्रा या ठिकाणी भरत असतात. प्रत्येक यात्रा झाल्या नंतर शहातील भिक्षेकऱ्यांच्या तसेच वेड्यां भिकाऱ्यांच्या संख्येत वाढ होताना दिसत आहे. या संदर्भात शहरातील पोलिसांशी संपर्क साधुन त्यांच्याकडून दिवसेंदिवस शहरातील या मोकाट फिरणाऱ्या भिक्षेकऱ्यांच्या संख्येत होणाऱ्या वाढी संदर्भात चर्चा केली असता अनेक धक्कादायक गोष्टीं किंवा माहितीं समोर आली. बाहेर गावातून घरांमध्ये उपद्रव ठरणाऱ्या ज्येष्ठ मंडळींना तसेच वेड्यां मंडळींना त्यांच्या घरची नातेवाईक मंडळी पंढरपूर हे तीर्थक्षेत्र आहे. त्यामुळे या ठिकाणी भिक मागून का होईना अशा नको असलेल्या घरातील जेष्ठमंडळींचा तसेच वेड्या मंडळींचा उदरनिर्वाह चालू राहिल, तो उपाशी तर मरणार नाही या भूमिकेतून घरातील इतर सुज्ञ मंडळी चक्क येथे आणून सोडून देत असल्याची धक्कादायक माहिती मिळाली. दरम्यान या भिक्षेकरी लोकांच्या उपद्रवामुळे चंद्रभागा वाळवंट, विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्गावर वारकरी



तसेच शहरातील सर्वसामान्य नागरिकांना रस्त्यांवरुन फिरणे देखील मुश्किल होत आहे. विशेष: तरुण मुली तसेच महिलांना रस्त्यांवरुन फिरताना या विवस्त्र अवस्थेतील भिक्षेकरी तसेच वेड्या स्त्री, पुरुषांमुळे शरमेने अक्षरश: मान खाली घालून जावे लागत आहे. त्यामुळे या मोकाट फिरणाऱ्या भिक्षेकऱ्यांवर तसेच वेड्यां भिकाऱ्यांवर शिर्डी प्रमाणे मोठ्या शहरात रवानगीची त्वरीत कारवाई करण्यात यावी अशी मागणी शहारातील सर्वसामान्य नागरिकांतून केली जावु लागली आहे.

### कारवाईची नेमकी जबाबदारी कुणाची?

पंढरपूरात सध्या मोकाट फिरणाऱ्या भिक्षेकरी तसेच वेड्यांच्या संख्येत खूपच वाढ झालेली दिसत आहे. साधारणपणे रेल्वे,एस.टी.स्थानक तसेच शहरातील गजबजलेल्या भागातून अशा मोकाट फिरणाऱ्या भिक्षेकरी तसेच वेड्यांचा शहरातील नागरिकांना उपद्रव सहन करावा लगतो आहे. बऱ्याच वेळा अंगावर कपडे नसणाऱ्या विवस्त्र अवस्थेतील अशा भिक्षेकरी आणि वेड्यां स्त्रीयां आणि पुरुषांचा शहरातील तरुणमुलींना तसेच महिलांना देखील त्रास सहन करावा लागतो आहे. त्यामुळे अशा विवस्त्र अवस्थेत शहरातून मोकाटपणे फिरणाऱ्या भिक्षेकरी आणि वेड्यां मंडळींवर किंवा भिकाऱ्यांवर कारवाईची जबाबदारी नेमकी कुणाची असा सवाल देखील आता सर्वसामान्य नागरिकांमधून उपस्थित केला जाऊ लागला आहे.

### या ठिकाणी असतो भिक्षेकऱ्यांचा ठिय्या

शहरातील रेल्वेस्टेशन, जुने व नवीन बसस्थानक, स्टेशन रस्त्यावरील पोस्ट ऑफीस जवळ, गजानन,कैकाडी तसेच तनुपरे महाराज मठाजवळ, विठ्ठल मंदिर परिसर, चंद्रभागा वाळवंट, प्रदक्षिणा मार्ग, नदी पात्रातील वेगवेगळे घाट, शहरातील रेल्वे बोगद्याखाली, तहसील कचेरी समोरील रस्ता, पद्मावती उद्यानाच्या पायथ्याशी, तुळशीवृंदावन परिसर आदी ठिकाणी या भिक्षेकऱ्यांचा किंवा वेड्यांचा वावर जास्त दिसून येतो.

### भिक्षेकऱ्यांची शहरातील संख्या वाढण्याची कारणे

रेल्वेची झालेली सोय, घरातील उपद्रव टाळण्यासाठी, तिर्थक्षेत्राचे ठिकाण असल्यामुळे, विविध मठ व धर्मशाळांची जास्तीची संख्या, त्या मधुन रोज मोफत जेवणाच्या पंक्तीचे वाढते प्रमाण, नदीचे पसरलेले विस्तीर्ण वाळवंट, भाविकांची नेहमी असणारी वर्दळ यामुळे परगावातील नागरिक स्वत:च्या घरातील वृध्दांना तसेच वेड्यांना या ठिकाणी सोडून गेले तरी फारसे कुणाच्याही लक्षात येत नाही.

शहरातून सध्या भिक्षेकरी तसेच विवस्त्र अवस्थे मधील वेडेमहिला,पुरुष बिनदिक्कत फिरत आहेत. त्यामुळे अशा भिक्षेकरी तसेच वेड्या मंडळींचा त्वरीत बंदोबस्त होणे गरजेचे आहे.

**-रुपाली जाधव, नागरिक**

### यात्रांनंतर भिक्षेकऱ्यांच्या संख्येत वाढ

शहरात दिसणाऱ्या या भिक्षेकऱ्यांच्या संख्येत ऐरव्ही पेक्षा विशेषत: मोठ्या यात्रांनंतर कमालीची वाढ होत असल्याचे एकंदर पाहणी मध्ये दिसून येत असल्याची माहिती पोलिसांकडून मिळाली आहे.

## माथेफिरू कोरटकरला तात्काळ अटक करा

### अन्यथा रस्त्यावर उतरू; सचिन जगताप यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २७ फेब्रुवारी-**



प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीने इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना फोन कॉल करून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व माँसाहेब जिजाऊ यांच्याबद्दल हिणकस व गलिच्छ वक्तव्ये करून बदनामी केली आहे. तसेच संबंधित व्यक्तीने विकृत लेखक जेम्स लेन याने केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि माँसाहेब जिजाऊ यांच्याबद्दलच्या अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. त्याला तात्काळ अटक करुन कारवाई करावी, अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशारा संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांनी दिला आहे.

मराठा समाजाला शिवीगाळ करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे नाव घेऊन सदर व्यक्तीने ही वक्तव्ये व धमकी देत असल्याने हे प्रकरण संवेदनशील आहे. राज्य सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन प्रशांत कोरटकर (नागपूर) या व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी असे निवेदन मुख्यमंत्री यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोनि दीपक पाटील यांच्याकडे दिले. यावेळी सचिन जगताप, सतीश चांदगुडे, सचिन खुळे, नितीन मुळे, विलास कोठावळे, पपेश पाटील, योगेश मुळे, नवनाथ रेपे, महावीर वजाळे, महेंद्र सोनवणे, दादासाहेब देशमुख, सुनील भोसले आदी उपस्थित होते.

## अन्नछत्राकडून राष्ट्रीय एकात्मतेची जपणूक : मंत्री चंद्रकांत पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ फेब्रुवारी-**



श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाकडून राष्ट्रीय एकात्मतेची जपणूक केली जाते. धर्मादाय न्यासातील महाराष्ट्रातील एक उत्कृष्ट कार्यप्रणाली असून, श्री स्वामी समर्थांचे नाव जगभरात पोहचवण्यामध्ये अन्नछत्र मंडळाचे मोलाचे योगदान असल्याचे मनोगत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांनी व्यक्त केले.

पुणे येथील प्रसिद्ध भरत मित्र मंडळाच्या महाशिवरात्र उत्सव कार्यक्रमानिमित्त आले असता ते बोलत होते. दरम्यान मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी खा. श्रीरंग बारणे, युवा उद्योजक पुनित बालन, सौरभ गाडगीळ, माजी नगरसेवक दत्ता सागरे, महाशिवरात्र उत्सव समिती ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब दाभेकर, शिरीष मावळे, बाळासाहेब देसाई-कुलकर्णी-बबलादकर, लाला राठोड, चंद्रकांत सोनटक्के, संतोष भोसले, स्वामीनाथ गुरव, मैनोद्दीन कोरबू, सरफराज शेख, गणेश भोसले, महांतेश स्वामी, प्रशांत शिंदे, संतोष माने उपस्थित होते.

## घोळसगाव येथे महाशिवरात्री उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २७ फेब्रुवारी-**

घोळसवाव येथे महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले.



पहाटे अभिषेक झाल्यानंतर महाप्रसाद वाटप करण्यात आले. उत्सवाचा खर्च लोकवर्गणीतून करण्यात आला. संध्याकाळी भजन व कीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नृसिंह भजन मंडळ, गुडोबा भजन मंडळ, महादेव भजन मंडळ अशी विविध भजन मंडळांकडून भजनसेवा सादर करण्यात आली. महाशिवरात्रीनिमित्त गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, युवक मंडळ, महिलावर्ग आणि विविध संघटनेने सहभाग घेतला होता. महाशिवरात्री उत्सवाचा सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी पंचप्पा होळे, बसवणप्पा उमटे, सिद्धाराम तिरगुळे, सिद्धाराम किवडे, गुरुपादप्पा पालापुरे, सुरेश त्रिगुळे, अशोक वर्दे, राजशेखर किवडे, गिरमलप्पा परशेट्टी यांनी परिश्रम घेतले.

## प्रधानमंत्री आवास योजना कार्यान्वित

### अणदूरमधील १३२ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम जमा

**तभा वृत्तसेवा । श्रीकांत अणदूरकर**
**अणदूर, दि. २७ फेब्रुवारी-**




महाराष्ट्रात २० लाख घरकुलांना मंजुरी चे पत्र नुकतेच मिळाले असून, १० लाख लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिला १५ हजार हप्ता जमा झाल्याने गोरगरीब जनतेचे आपल्या स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होणार आहे. या योजनेंतर्गत अणदूरमध्ये १३२ लोकांना लाभ मिळाला असून त्यांच्याही खात्यावर सुरुवातीचे पैसे पडले आहेत.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी देशातील २ कोटी नागरिकांना घरकुले देणार अशी घोषणा केली होती. या घोषणेची पहिल्या टप्प्याची पूर्तता २२ फेब्रुवारी रोजी झाली आहे. विक्रमी हक्काचे घर प्राप्त करून देणाऱ्या या योजनेचे जनतेने स्वागत केले आहे. महाराष्ट्र राज्याला याचे प्रचंड मोठे झुकते माप मिळाले आहे.

### आगामी दिवाळी नवीन घरात

जनतेने दाखवलेल्या सार्थ विश्वासामुळे नरेंद्र मोदी महाराष्ट्राच्या पाठीमागे एवढे खंबीरपणे उभे राहिले असल्याचे दिसून येत आहे. या लाभार्थ्यांची येणारी दिवाळी ही नवीन घरात असणार आहे. अणदूर ग्राम पंचायतीमध्ये या योजनेचे थेट प्रसारण करण्यात आले. यावेळी माजी पंचायत समिती सदस्य साहेबराव घुगे, प्रवीण घोडके, बापू घुगे उपस्थित होते.

## सुप्त गुण ओळखून यशाच्या आकाशात गरुड झेप घ्या

### सीने अभिनेत्री सिमरन खेडकर : अणदूर येथे प्रकट मुलाखत

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. २७ फेब्रुवारी-**

स्वैराचार आणि स्वातंत्र्य घरातून विनाअट मिळणारा सपोर्ट यामुळे स्वातंत्र्याचा पुरेपूर फायदा आपण घेतला. कशाच्या बळावर? हे बाळकडू कसे प्राप्त झाले? या प्रश्नाला उत्तर देताना मुंबईच्या सिने अभिनेत्री सिमरन खेडकर म्हणाल्या की, जीवनात संघर्ष, स्पर्धा असेल तर खूप काही शिकता येतं. आपल्यातले स्ट्रेंथ आणि विकनेस ओळखून यशाच्या आकाशात उंच भरारी घेता येतं.



जवाहर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय अणदूर येथे वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त पारितोषिक वितरण समारंभात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, नीता खेडकर, डॉ. अशोक चिंचोले, प्राचार्य गोपाळ कुलकर्णी, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम उपस्थित होते. पुढे त्या म्हणाल्या की, घरात मिळालेल्या स्वातंत्र्याला स्वैराचार समजून वागल्यास आपण दिशाहीन होतो. यशापासून कोसो दूर राहतो. आईने माझ्यावर केलेले संस्कार मला जीवनात उपयोगी पडले. कला, क्रीडा, कथाकथन, नाट्य, वाचन, वादविवाद, हार्मोनियम, संगीत याचे बाळकडू मला मिळाले. छोट्या बायोची मोठी स्वप्न, वेल डन भाई, लॉकडाऊन २०-२०, कोलंबस, अशोक मामा, रुबाब यामध्ये मला मनापासून काम करता आले. आपणही करू शकता. तरुणाईला कानमंत्र देताना त्या म्हणाल्या, तरुणपणी चालक व्हा. सोयी प्राप्त करून घ्या. मोबाईल आणि कलर टीव्ही म्हणजे संसार नाही.

सिने अभिनेत्री सिमरन खेडकर यांची डॉ. अनिता मुदकण्णा व डॉ. मल्लिनाथ बिराजदार यांनी मुलाखत घेतली. अहवाल वाचन प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी यांनी केले. आभार डॉ. प्रसन्न कंदले यांनी मानले. डॉ. सोमशंकर राजमाने, डॉ. उमाकांत सलगर, डॉ. सूर्यकांत आगलावे, डॉ. राजशेखर नळगे, डॉ. वीरभद्रेश्वर स्वामी, संतोष चौधरी, दिलीप चव्हाण, नामदेव काळे, बसवंत बागडे, गणेश सर्जे, महादेव काकडे, अमित आलुरे, शुभांगी स्वामी यांचे सहकार्य लाभले.

### यशस्वी स्पर्धकांचा सन्मान

वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त काव्यवाचन स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धा पारंपारिक वेशभूषा स्पर्धा, क्रीडा स्पर्धा, शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# एसटीतर्फे प्रवासी राजा दिन उपक्रम

**पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी-**

राज्य परिवहन महामंडळातर्फे सोलापूर जिल्ह्यात प्रवासी राजा दिन या उपक्रमाचे नियोजन केले असल्याची माहिती अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

प्रवाशांना मिळणाऱ्या सेवा, सुविधा यामधील अडचणी समस्या,तक्रारी, सुचना ऐकून घेऊन तातडीने निवारण करण्यात यावे असे आदेश राज्य परिवहन महामंडळातर्फे देण्यात आलेले आहेत. त्याप्रमाणे प्रत्येक आगारामध्ये याचे आयोजन केले जात असून यावेळी महामंडळाचे जिल्हा स्तरावरील अधिकारी उपस्थित राहून तक्रारींचे निराकरण करणार आहेत.

करमाळा आगार शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी, पंढरपूर आगार सोमवार दि.३ मार्च, अक्कलकोट आगार-शुक्रवार ७ मार्च, बार्शी आगार सोमवार १० मार्च २०२५ तरी प्रवाशांनी,प्रवासी संघटनांनी सकाळी ११ते १ यावेळेत उपस्थित राहून समस्या,अडचणींचे निराकरण करुन घ्यावे,सूचना मांडाव्यात असे आवाहन सोलापूरचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, ग्राहक पंचायतीचे प्रांत कोषाध्यक्ष विनोद भरते, सदस्य सुभाष सरदेशमुख, जिल्हा संघटक दीपक इरकल, जिल्हा सचिव सुहास निकते, महिला विभाग प्रमुख माधुरी परदेशी, जिल्हा कार्यकारिणी सदस्य अण्णा ऐतवाडकर, पांडुरंग अल्लापूरकर यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### दिल्लीच्या संमेलनात नितीन पाटलांच्या कवितेला दाद

**वैराग, दि. २७ फेब्रुवारी-**

दिल्ली येथे झालेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनांतर्गत श्रीमंत सयाजीराजे महाराज गायकवाड सभामंडप व छत्रपती संभाजी महाराज विचार पीठावर सोलापूरचे कवी नितीन पाटील यांनी राजकारण गेले गुंडा हाती ही कविता सादर करून साम-दाम-दंड भ्रष्टाचार गुंडागिरी वशिलेबाजी या गोष्टीविरुद्ध कविता सादर केली. उपस्थितांची मने जिंकली. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अभिनेते डॉ.शरद गोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे सरहद्द संस्थेचे अध्यक्ष संजय नहार, युवराज नळे, डॉ. पोपेरे, संजय आवटे, रामदास मोरे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन त्यांना गौरविण्यात आले. यावेळी अमोल कुंभार, जितेंद्र कांबळे, डॉ. विजय पोपेरे, हनुमंत अक्षदा काकडे, वनिता जाधव, हर्षदा गुळमिरे, सुषमा आलेकर, यशवंत घोडे, वीणा व्होरा, अलका नाईक, लक्ष्मण हेंबाडे, आदेश फुलगे, संदीप तोडकर, तुकाराम जेगोले, माणिकराव गोडसे, तुकाराम मोरे, हेमंत बोरसे, तोरस्कर, सुवर्णा वाघमारे यांच्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, बेळगाव अशा अनेक भागांतून आलेल्या निमंत्रित कवींच्या कविता सादर झाल्या.



### भोसरे येथील भिसे कॉलेजमध्ये रक्तदान, अवयवदानाचा संकल्प

**कुर्डूवाडी, दि. २७ फेब्रुवारी-**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यानगर, भोसरे येथील के. एन. भिसे आर्ट्स, कॉमर्स अँड व्ही. पी. सायन्स कॉलेजमध्ये रक्तदान व मरणोत्तर अवयव दान शिबीर पार पडले. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. अनुपमा पोळ होत्या. यावेळी विभागीय समन्वयक प्रा. अनिल मुंगूसकर, डॉ. सातव, प्रा. डॉ. अतुल कदम, प्रा. डॉ. सुभाष गायकवाड आदी उपस्थित होते. माढा विभागातील भारत महाविद्यालय जेऊर, प्रतापसिंह मोहिते-पाटील महाविद्यालय करमाळा, के. एन. भिसे आर्ट्स, कॉमर्स अँड व्ही. पी. सायन्स कॉलेज विद्यानगर, भोसरे, मा. ह. महाडिक महाविद्यालय मोडनिंब, कला आणि वाणिज्य महाविद्यालय माढा या महाविद्यालयांनी या शिबिरात सहभाग घेतला. एकूण २६ रक्तदात्यांनी रक्तदान केले व २५ स्वयंसेवकांनी मरणोत्तर अवयव दानाचा संकल्प केला.




### बार्शी विभागीय निमंत्रित पुरुष गटाच्या खो-खो स्पर्धांचे आयोजन

**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शीचे संस्थापक व संवर्धक कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या १२२ व्या जयंतीनिमित्त कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे दि. २ ते ४ मार्च या कालावधीत विभागीय निमंत्रित पुरुष गट खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात आल्याची माहिती कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे यांनी दिली. या स्पर्धा आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सरचिटणीस प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव यांनी मान्यता दिली आहे. या स्पर्धेत सातारा, सांगली, सोलापूर व धाराशिव या जिल्ह्यातील एकूण आठ संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकास रुपये २१०००, द्वितीय रुपये १५००० व तृतीय रुपये ११००० रोख, प्रमाणपत्र व ट्रॉफी दिली जाणार आहे. या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी जास्तीत जास्त क्रीडाप्रेमी व खेळाडूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन संयोजकाच्यावतीने करण्यात येत आहे.

### ऑनलाईन कवीसंमेलनाने श्रोते मंत्रमुग्ध

**वैराग, दि. २७ फेब्रुवारी-**

आभ्यासाचे गाव तडवळे व हेल्पिंग हँडस् फाउंडेशन यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवानिमित्त राज्यस्तरीय ऑनलाईन काव्यसंमेलन घेण्यात आले. यावेळी उपक्रमाचे मुख्य प्रवर्तक शरद पवार, संभाजी आवारे, कवी जनाब मोहिद्दीन नदाफ, अॅड. उमेश पंजाबराव ठाकरे, गझलकार जीवन धेंडे उपस्थित होते. अध्यक्षस्थानी गझलकार अनिल नाटेकर होते. सूत्रसंचालन सुप्रिया बनकर यांनी केले. कविसंमेलनात कवी मोहिद्दीन नदाफ, अनिल नाटेकर, गणेश जगदाळे, फुलावती काटे, प्रिया माकोडे, रेखा कांबळे, सुजाता घोरपडे, शिवकांता नकाते-चिमदे, उज्ज्वल त्रिनगरीवार, संजय जाधव, शैलजा करोडे, राजू उदमले, माधुरी सोनवणे, माधुरी खेर्डेकर, अर्चना घळके, रुपाली लटके, ओंकार राठोड यांनी कविता सादर केल्या.

# मोहोळमध्ये वाळू उपसा बंद होतो, मग पंढरपुरात का नाही?

## दोन आमदारांमध्ये पंढरपूरच्या आमसभेत खडाजंगी; बेकायदा वाळू उपसा करणाऱ्यांवर मोकाकाची कारवाई करण्याचा ठराव

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२७ फेब्रुवारी-**

मी जर माझ्या मोहोळ तालुक्यातील बेकायदा वाळू उपसा बंद करु शकतो तर तुम्ही भाजपचे आमदार असून येथील वाळू का बंद होत नाही ? असा सवाल मोहोळचे आमदार राजू खरे यांनी पंढरपूरचे भाजप आमदार समाधान आवताडे यांना केला. खरेंच्या वाळु प्रश्नावरुन सभेत बराच वेळ गोंधळ उडाला होता. दरम्यान बेकायदा वाळु उपसा करणाऱ्यांवर मोकाकाची कारवाई करण्याचा ठराव आमसभेत मंजुर करण्यात आला. या वेळी अनेक विषय आमसभेत मांडण्यात आले काही विषयावरून सभेत खडाजंगी उडाली.




पंढरपूर तालुक्यात गुरुवारी (ता.२७) आमसभा पार पडली. हा तालुका सांगोला, मोहोळ, पंढरपूर-मंगळवेढा व माढा या चार विधानसभा मतदारसंघात विभागलेला आहे. त्यामुळं या चारही मतदारसंघातील आमदारांच्या उपस्थितीत आमसभा आयोजीत करण्यात आली होती. ही आमसभा मोहोळचे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार राजू खरे यांनी बेकायदा वाळू उपश्याच्या मुद्यावरुन चांगलीच गाजवल्याचं पाहायला मिळालं. आमसभेत पंढरपूरचे भाजप आमदार समाधान आवताडे, माढ्याचे शरद पवार गटाचे आमदार अभिजीत पाटील, मोहोळचे शरद पवार गटाचे आमदार राजू खरे आणि सांगोल्याचे शेकापचे आमदार डॉक्टर बाबासाहेब देशमुख उपस्थित होते. या आमसभेत पंढरपूरच्या वाळू आणि मुरुम उपसाबाबत नागरिक टोकाचे संतप्त होते. यावर सामाजिक कार्यकर्ते अरुण कोळी यांनी आम सभेत पंढरपूरच्या बेकायदा वाळू उपसा बाबत विचारले असता मोहोळचे आमदार राजू खरे आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं.

आमदार खरे म्हणाले, माझ्या मोहोळ मध्येही मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू होता. याबाबत मी तहसीलदार आणि पोलिसांना तक्रारी करुनही हा बेकायदा वाळू उपसा बंद झाला नाही. यानंतर आपण या वाळू उपशाचे शूटिंग काढून जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना दाखवल्यावर तातडीने जिल्हाधिकाऱ्यांच्या पथकाने कारवाई करत मोहोळ तालुक्यातील सर्व बेकायदा वाळू व मुरूम उपसा बंद करुन दाखवला. त्यामुळे जर मी विरोधी पक्षाचा आमदार असूनही माझ्या मतदारसंघातील बेकायदा वाळू आणि मुरूम उपसा शंभर टक्के बंद करू शकत असेल तर पंढरपूरचे आमदार हे सत्ताधारी भाजपचे आहेत, मग त्यांना काय अवघड आहे? त्यांना हे का शक्य होत नाही? असा सवाल राजू खरे यांनी केला.

### विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती बरखास्त करावी

विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीची मुदत संपली आहे. यामुळे येथे प्रशासकाची नियुक्ती करण्यात यावी. तसेच पंढरपुरात अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावे अशी मागणी भाजपचे नेते माऊली हळणवर यांनी केली

### मोक्काची कारवाई करावी : आवताडेंची मागणी


वाळु उपसा मुद्यांवरुन आमदार समाधान आवताडे यांनी आक्रमक होत वाळू उपसा होणाऱ्या ठिकाणी तहसील आणि पोलिसांचा एक एक कर्मचारी ठेवावा अशी मागणी केली. तसेच वारंवार अशा गुन्ह्यात सापडणाऱ्यांवर तातडीने मकोका कायदा लावावा असा ठराव आमसभेत संमत करण्यात आला.

# भीमा नदीवरील प्रवास धोकादायक

## मिरे-करोळे येथे नवीन पूल बांधण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. २७ फेब्रुवारी-**

मळशिरस व पंढरपूर तालुका जोडणारा मिरे-करोळे या ठिकाणी भीमा नदीवर अवजड वाहनांना वाहतूक करण्यासाठी नवीन पूल बांधण्यात यावा अशा आशयाचे निवेदन महाळुंग-श्रीपूर नगरपंचायतीचे नवरसेवक प्रकाश नवगिरे यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे यांना दिले आहे.



या ठिकाणी सध्या बंधारा असून या बंधाऱ्यावरून कसेतरी एकच वाहन जावू शकते. तसेच यावरून फक्त हलकी असणारी व ट्रॅक्टरनेच वाहतूक होत आहे. या परिसरातून श्रीपूर, अकलूज, माळीनगर या कारखान्यांना मोठ्या प्रमाणावर ऊस येतो. गळीत हंगाम सुरु असताना यावेळी वाहतुकीची कोंडी होते. याबरोबरच पावसाळ्यात नदीला पूर आल्यावर अनेकदा हा बंधारा पाण्याखाली जातो. त्यावेळी या परिसराचा संपर्क तुटला जातो. तसेच उत्तरेकडील बेंबळे, टेंभुर्णी, करकंब, मोडनिंब पुढे सोलापूर, अहिल्यानगर तर दक्षिणेकडील श्रीपूर, बोरगांव, वेळापूर, सांगोला या भागाला हा मार्ग जोडत असल्याने वेळेची, इंधनाची बचत होऊन या भागाची औद्योगिक, धार्मिक व शैक्षणिक प्रगती होण्यास हातभार लागणार असून वैद्यकीय सेवेसाठी उपयुक्तता वाढणार आहे.

### तर धार्मिकस्थळे जोडली जाणार

यामुळे प्रसिद्ध असलेली तुळजापूर, शिंगणापूर ही धार्मिकस्थळे जोडली जाणार आहेत. अशा सर्व अंगानी मिरे-करोळे येथील भीमा नदीवरील होणारा पूल महत्वाचा राहणार आहे. त्यामुळे याची अंमलबजावणी होऊन या परिसरातील नागरिकांची होणारी कुंचबणा थांबवून परिसराच्या विकासासाठी विशेष लक्ष घालून पालकमंत्र्यांनी हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी प्रा. प्रकाश नवगिरे यांनी केली आहे.

# मोडनिंबच्या श्री महालिंगेश्वर मंदिरात गर्दी

## हजारो भाविकांच्या रांगा; शिवलिलामृत, पालखी सोहळा, नामस्मरण, भजनसंध्या, भक्तिगीतांसह धार्मिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. २७ फेब्रुवारी-**

मोडनिंब (ता. माढा) हेमाडपंथी म हालिंगेश्वर मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त म ोडनिंब व परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात दर्शनासाठी गर्दी केली होती.

सकाळी शिवलीलामृत ११ वा अध्याय व जप, दुपारी पंढरपूर येथील सिध्दिविनायक महिला भजनी मंडळ यांचा संकीर्तन भजनाचा कार्यक्रम झाला .यासोबतच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मंदिर परिसराची स्वच्छता करण्यात आली. शेकडो वर्षे पुरातन असलेल्या या हेमाडपंथी महादेव मंदिरात आकर्षक फ ुलांची सजावट करण्यात आली होती. ॐ नमः शिवाय, श्री शिवाय नमस्तुभ्य, 'हर.. हर.. महादेव' अशा जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. सायंकाळी महाआरती नंतर पालखी सोहळा मंदिर प्रदक्षिणा झाली.मोडनिंब येथील महालिंगेश्वर मुंबई, पुणे, सोलापूर या जिल्ह्यांतील अनेक भाविक भक्तांचे कुलदैवत असून,भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.मंदिरामध्ये बुधवारी पहाटे साडेपाच वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत दर्शनासाठी गर्दी होती. रांगेत उभे राहून भाविकांनी दर्शन घेतले. मंदिर समितीच्या वतीने नामस्मरण, भजनसंध्या, भक्तिगीते, भावगीते,आलेल्या सर्व भाविक भक्तांना दिवसभर फराळाचे वाटप केले जात होते. या वेळी ट्रस्टचे अध्यक्ष किरण तोडकरी, सचिव जयंत समुद्र, उपाध्यक्ष परिमल तोडकरी, शुभम गायकवाड, स्वप्नील महामुनी, प्रणव साखरे, प्रेम गांधी, ऋषभ खेलबुडे आदी उपस्थित होते. महाशिवरात्रीनिमित्त मोडनिंब (ता.माढा) येथील हेमाडपंथी महालिंगेश्वर मंदिरात श्री महालिंगेश्वर महादेवाचे सोलापूर जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे यांनी सपत्नीक दर्शन घेतले. श्री महालिंगेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी माजी सभापती शिवाजी कांबळे, जिल्हा दूध संघाचे संचालक शंभूराजे मोरे, कैलास तोडकरी, जयंत समुद्र , संतोष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.



### सुमारे २५० लिटर मसाला दूध वाटप

महाशिवरात्री निमित्त वेताळ एजेंसी विजय खेलबुडे यांच्या वतीने कै. विमल वैजीनाथ खेलबुडे यांच्या स्मरणार्थ मोडनिंब येथील महालिंगेश्वर मंदिर येथे मसाला दूध वाटप करण्यात आले.सलग सात वर्षापासून हा उपक्रम सुरु आहे.यावेळी २५० लिटर मसाला दूध वाटप करण्यात आले असल्याचे खेलबुडे यांनी सांगितले. यावेळी विश्वतेज खेलबुडे, सूरज तोडकरी, सैफअली शेख, वेदांत खेलबुडे, प्रतीक रोकडे, शिवम तोडकरी, प्रेम गांधी, स्वप्नील महामुनी यांनी परिश्रम घेतले.

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची गॅदरिंगमध्ये धमाल

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २७ फेब्रुवारी-**

करमाळा तालुक्यातील झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कूलच्या वतीने अतिशय आनंदमय व उत्साही वातावरणात वार्षिक स्नेहसंमेलन आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून संस्थापक अध्यक्ष श्री. जयप्रकाश बिले सर उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी युवानेते व जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील, बिले उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष हरिदास डांगे, सूरज देशमुख, निवृत्त पोलीस अधिकारी गोडगे, नारायण अमृळे, सरपंच बंडू घाडगे, प्रा. राजेश शिंदे, भीमराव घाडगे, रूपाली माने, दाक्षायणी पवार, सचिव युवराज बिले, खजिनदार आशाताई बिले, डायरेक्ट स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी, मुख्याध्यापक सतिश कोंडलकर, किरण परदेशी, तानाजी हरणावळ उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची गाणी सादर करून पालकांची मने जिंकून घेतली. सर्वप्रथम गणपती गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर पारंपरिक गिते, लोकगीते, हिंदी, मराठी चित्रपटातील गिते, विदेशी गिते, नकला, लावणी, आधुनिक रिमिक्स गाणी यांचा समावेश होतो. पालकांनी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शनाचे कौतुक केले. सूत्रसंचालन नंदकुमार वलटे यांनी केले.




# डॉ. बाळासाहेब देशपांडे यांचे जीवन म्हणजे आदर्श जीवनाचा वस्तूपाठ

## डॉ. कुलकर्णी : एका नामधारकाची कथा पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २७ फेब्रुवारी-**

नाम आणि प्रेम हा ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या तत्त्वज्ञानाचा सारांश असून तो डॉ. बाळासाहेब देशपांडे यांनी पूर्णपणे आत्मसात केला आहे. त्यांनी प्रपंचच परमार्थरुप करुन आदर्श जीवनाचा एक वस्तूपाठ सर्वांसमोर ठेवला आहे, असे गौरवोद्गार अहिल्यानगर येथील चिंतामणी हॉस्पिटलचे संचालक, प्रख्यात युरो सर्जन आणि ज्येष्ठ नाम साधक डॉ. सी. बी. कुलकर्णी यांनी नुकतेच येथे काढले.

प्रा. डॉ. रजनी जोशी लिखित एका नामधारकाची कथा या डॉ. बाळासाहेब देशपांडे यांच्या चरित्रग्रंथाचे विमोचन करताना ते बोलत होते. आपल्या भाषणाचा प्रारंभ त्यांनी सामूहिक नाम जपाने करुन श्री महाराजांच्या चरित्रातील अनेक बोधप्रद गोष्टी सांगत जीवनातील अध्यात्माचे महत्त्व विशद केले. तसेच हा चरित्र ग्रंथ साधकांना मार्गदर्शक ठरेल, असा विश्वासही व्यक्त केला. प्रारंभी श्री भगवंत आणि श्री ब्रह्मचैतन्य महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करुन दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक शंतनू जोशी यांनी केले.




लेखिकेने आपल्या मनोगतात आपले बंधू डॉ. बाळासाहेब देशपांडे यांची अध्यात्मिक महत्ता अधोरेखित करत हे पुस्तक म्हणजे बहिणीने भावाला घातलेली ओवाळणी आहे, असे उद्गार काढले. डॉ. बाळासाहेब देशपांडे यांनी आपल्या आध्यात्मिक प्रवासात कौटुंबिक वातावरण, लहानपणी झालेले संस्कार, पत्नी व इतर नातेवाईक यांचे योगदान तसेच अनेक संत सत्पुरुषांचा सहवास या साऱ्यांची मदत झाल्याचे नम्रपणे नमूद केले. पुस्तक प्रकाशनानंतर सत्कारमूर्ती बाळासाहेब आणि त्यांच्या पत्नी डॉ. सुमंगलाताई यांचा हृद्य सत्कार करण्यात आला. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव यांनी जोशी आणि देशपांडे या दोन्ही परिवारांशी असलेल्या घनिष्ट स्नेहसंबंधांचा आढावा घेतला. आभार स्वरुपा जोशी यांनी मानले. डॉ. सुमंगला देशपांडे आणि अमिता कुलकर्णी यांनी म्हटलेल्या श्री महाराजांच्या अहो मंदिरवासी जन या पदाने कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन मुकुंदराज कुलकर्णी आणि अमोल कुलकर्णी यांनी केले. लेखिका डॉ. रजनीताई, प्रकाशक रामचंद्र जोशी, मुद्रक साई प्रिंटिंग प्रेसचे गिरीश सोनार, डीटीपी ऑपरेटर महेश देशपांडे यांचेही सत्कार करण्यात आले. कार्यक्रमासाठी हर्षद जोशी, प्रशांत बुडूख, अमोल सुलाखे, वसंत घुमरे यांच्यासह माणकेश्वरकर जोशी परिवाराने परिश्रम घेतले.

### सर्वांग सुंदर पुस्तक

भगवंत देवस्थानचे सरपंच दादासाहेब बुडूख यांनी सोहळ्याला भगवंताचा आशीर्वाद असल्याचे सांगितले. मुकुंदराज कुलकर्णी यांनी हे पुस्तक सर्वांग सुंदर झाले असून डॉक्टरांचा आध्यात्मिक प्रवास सर्वांसमोर येणे ही चरित्र नायकाची नसून समाजाची गरज असल्याचे सांगितले आणि लेखिकेने त्यासाठी घेतलेल्या परिश्रमांचे कौतुक केले.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# किर्ती किरण पुजार यांनी जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्हाधिकारी पदाची सूत्रे किर्ती किरण एच पुजार यांनी २७ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वीकारली.

जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांची बदली सोलापूर महानगरपालिका आयुक्त या पदावर झाल्यानंतर जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार अपर जिल्हाधिकारी प्रकाश अहिरराव यांच्याकडे होता.




पुजार हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. यापूर्वी श्री.पुजार यांनी परिविक्षाधिन अधिकारी म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी येथे उपविभागीय अधिकारी व नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय येथे प्रकल्प अधिकारी म्हणून काम केले आहे. धाराशिव जिल्हाधिकारी या पदावर येण्यापूर्वी पुजार हे रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


## संक्षिप्त वृत्त...

### रामशेट्टींची शिवराज मोटेगावकराबरोबर भेट

**जळकोट, दि.२७ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील समर्थ कोचिंग क्लासेसचे संचालक व द इंग्लिश लँग्वेज पुस्तकाचे लेखक रामशेट्टी पाटील यांनी लातूर येथे आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर यांची भेट घेऊन शैक्षणिक विषयावर चर्चा केली. यावेळी प्रा.मोटेगावकर यांनी लातूर येथील त्यांच्या क्लासेसमध्ये रामशेट्टी पाटील यांचा विठ्ठलाची मूर्ती देऊन यथोचित सत्कार करून शैक्षणिक चळवळीमध्ये आपल्या सोबत असल्याचे सांगितले. समर्थ क्लासेसच्या माध्यमातून मार्गदर्शन शिबिरे, पालक मेळावे व विविध सामाजिक उपक्रम यांचे सतत आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याला पालक वर्गातून कौतुक केले जात आहे.



### रहदारीस धोकादायकरीत्या वाहन उभे; गुन्हे नोंद

**परंडा, दि.२७ फेब्रुवारी -**

शहरातील रहदारीला अडथळा ठरणाऱ्या वाहनचालकांविरोधात परंडा पोलिसांनी कारवाई करत दोन जणांवर गुन्हे नोंदवले आहेत. दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.१० वाजेच्या सुमारास आरोपी महंम्मद तात्या शिंदे (रा.वैद गल्ली,परंडा) आणि पिंटु लाला जाट (रा.आगरकर गल्ली, परंडा) यांनी आपापली वाहने (एमएच ४८ जी १८२६ व एमएच १४ एचजी ०२५२) छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक पद्धतीने उभी केली होती. परंडा पोलिसांनी याची दखल घेत आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम २८५ अंतर्गत स्वतंत्र गुन्हे नोंदवले. पुढील तपास परंडा पोलीस करीत आहेत.

# प्राण्यांसाठी ९९ पाणवाट्यांवर पाण्याची सुविधा, वनविभागाची तयारी वेगात

**वाघाला पकडण्यासाठी मुदतवाढीची मागणी... वाघ पकडण्यासाठी आणखी सुविधा मिळण्याची गरज...**

**तभा वृत्तसेवा/ प्रमोद राऊत**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

गेल्या काही दिवसांपासून परिसरात दहशत माजवणाऱ्या वाघाच्या शोध मोहिमेसाठी वनविभागाने अधिक मुदतवाढीची मागणी केली आहे. वाढत्या उन्हामुळे जंगलातील जलस्रोत आटत असून, त्यामुळे वन्यप्राण्यांना पाणी मिळण्यात अडचणी येत आहेत. याची दखल घेत वनविभागाने जंगलात ९९ ठिकाणी पाणवाट्यांवर पाण्याची सुविधा करण्याची योजना आखली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून परिसरात वाघाच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. काही ठिकाणी पाळीव प्राण्यांवर हल्ले झाले असून, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे वाघाला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने मोहिम राबवली होती. मात्र, वाघाचा ठावठिकाणा सापडत नसल्याने ही मोहिम अधिक काळ चालवावी लागणार आहे. त्यामुळे वनविभागाने मुदतवाढीची मागणी केली आहे.

या मोहिमेसाठी प्रशिक्षित कर्मचारी, हत्ती, ड्रोन आणि कॅमेऱ्यांचा वापर केला जात आहे. वाघाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून, त्याच्या हालचालींचा वेग आणि मार्ग यानुसार सापळे रचले जात आहेत.

उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवत असल्याने वन्यप्राण्यांना अन्न-पाण्यासाठी जंगलाबाहेर पडावे लागते. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढू शकतो. याची दखल घेत वनविभागाने ९९ ठिकाणी कृत्रिम जलस्रोत तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. काही ठिकाणी टाक्या बसवण्यात आल्या असून, बोअरवेल आणि जलवाहिन्यांच्या माध्यमातून त्यात पाणी टाकले जात आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, वन्यप्राण्यांना नैसर्गिकरित्या पाणी उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणी पूरक पाणी व्यवस्थापन करण्याचा विचार असून, स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने हे काम हाती घेण्यात येत आहे.

वाघाच्या हल्ल्यांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, जंगलाच्या सिमेवरील गावे सतर्क राहावीत, असे आवाहन वनविभागाने केले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आणि वाघ दिसल्यास तातडीने अधिकाऱ्यांना कळवण्याचे आवाहन केले आहे. तसेच, लोकांनी स्वयंस्फूर्तीने जंगलात न जाण्याची आणि वन्यप्राण्यांना त्रास न देण्याची विनंती केली आहे. वाघाचा ठावठिकाणा निश्चित करून त्याला शांततेत जेरबंद करणे, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, जंगलात पाण्याच्या सुविधा वाढवणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना राबवणे, वनविभागाने युद्धपातळीवर ही मोहिम राबवली असून, लवकरच वाघाला पकडण्यात यश मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### वाघ पकडण्यासाठी सुविधा मिळण्याची गरज...

धाराशिव जिल्ह्यात वाघांच्या वाढत्या हालचालीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मागील काही दिवसांत मानव-वाघ संघर्षाच्या घटना घडल्या आहेत. परंतु, वाघांना सुरक्षितरित्या पकडण्यासाठी आवश्यक साधनसामग्री आणि मनुष्यबळ अपुरे असल्याचे समोर आले आहे. आधुनिक पिंजरे, ट्रॅकिंग उपकरणे आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याने वाघांना नियंत्रणात आणण्यास अडचणी येत आहेत. या समस्येवर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे.

### रात्री वाघ पकडण्याची मोहीम, वन विभागाचा शर्थीचा प्रयत्न

जिल्ह्यात वाघाच्या हालचाली वाढल्याने वन विभागाने रात्री १० ते २ या वेळेत विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान, वाघ दहा मिनिटांच्या अंतरावर दिसताच वन विभागाच्या पथकाने त्याचा पिच्छा केला. अत्याधुनिक ट्रॅकिंग उपकरणे आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या मदतीने वाघाला शोधण्याचे प्रयत्न सुरू होते. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, लवकरच वाघाला सुरक्षितपणे पकडले जाईल. स्थानिक नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नूतन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी घेतले श्री तुळजाभवानीचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दि २६ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा श्री. तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. डॉ. सचिन ओंबासे यांची सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त पदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या जागी राज्य सरकारने नुकतीच किर्ती किरण पुजार यांची धाराशिवचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. किर्ती किरण पुजार हे या पूर्वी रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. धाराशिवचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त झाल्यानंतर प्रथमच ते श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनाला आले असता मंदिरचे मंहत वाकोजी बुवा यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दर्शन घालून विधिवत पूजा आरती केली. यावेळी मंदिरात पुजारी सुहास कदम - भैय्ये, सचिन परमेश्वर, दत्ता क्षीरसागर, विशाल गंगणे हे पुजारी उपस्थित होते.

दर्शनानंतर मंदिर प्रशासकीय कार्यालयात मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी जिल्हाधिकारी पुजार यांचा सत्कार केला. यावेळी सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, सहायक व्यवस्थापक (विद्युत) अनिल चव्हाण, भंडारपाल नागेश शितोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश निर्वळ, प्रशांत जाधव, गणेश मोटे, सुरक्षा निरीक्षक विक्रम कदम, नवनाथ खिंडकर, स्वच्छता निरीक्षक अक्षय साळुंखे व मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत चार विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -**

समग्र शिक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत जिल्हा परिषद हायस्कूलच्या अश्विनी जाधव, मोहीनी घोडके, आर्शियान शेख, आणि अभिषेक बरकंबे या विद्यार्थ्यांचा कर्नाटकमधील बेंगळुरू येथील शाळांच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आले आहे.

या विद्यार्थ्यांची निवड जिल्हा स्तरावर उत्कृष्ट शिक्षण कार्य आणि लर्निंग आऊट कम्ससाठी करण्यात आली आहे. त्यांच्या शाळेने तालुकास्तरीय तीन लाख आणि जिल्हा स्तरावर पाच लाख बक्षीस मिळवले आहेत.

या विद्यार्थ्यांना बेंगळुरूतील शैक्षणिक ठिकाणांचा आणि प्रगत शाळांचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.



७ फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान विद्यार्थ्यांना कूबन पार्क, विश्वेश्वरय्या इंडस्ट्रियल अँड टेक्निकल म्युझियम, गव्हर्मेंट म्युझियम, जवाहरलाल नेहरू प्लॅनेट हेरिटेज सेंटर अँड एरोस्पेस म्युझियम, लालबाग बॉटॅनिकल गार्डन, इस्कॉन टेम्पल, लालू मॉल यासारख्या अनेक शैक्षणिक ठिकाणांची भेट होईल.

या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना इतर राज्यातील शाळांसोबत विचारांची देवाणघेवाण, संस्कृती वृद्धीकरण आणि आनंददायी शिक्षण प्राप्त करण्यास मदत होईल.

मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी सांगितले की, या दौऱ्यामुळे शाळेतील आधुनिक सुविधा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शन मिळेल.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सदानंद शिवदे-पाटील, अशोक पतगे, सुजाता मोरे गटशिक्षणाधिकारी जिवनराज पडवळ, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्र प्रमुख शिला मुदगडे व शाळेतील धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे यासह शिक्षकांनी अभिनंदन केले.

## भूम तालुक्यातील परंडा रस्त्यावर दूध वाहतूक करणाऱ्या पिकपचा अपघात

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२७ फेब्रुवारी -**

भूम तालुक्यातील परंडा-भूम रस्त्यावर २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता दूध वाहतूक करणाऱ्या पिकपचा अपघात झाला. पिकप दूध खाली करून परंड्याच्या दिशेने जात असताना गोलेगाव पाटीजवळ हा अपघात घडला.

अपघाताच्या वेळी पिकपला एक मोटरसायकल गाडीने कट मारला, ज्यामुळे पिकप चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले. यामुळे पिकपने दोन पलटी घेतल्याने गाडीची चारही चाके उलटी झाली. या अपघातात पिकपचा चालक किरकोळ जखमी झाला आहे. घटनास्थळी उपस्थित स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेतली आणि अपघातात अडकलेल्या चालकाला बाहेर काढले. त्याला तातडीने प्राथमिक उपचार देण्यात आले.



या अपघातामुळे रस्त्यावर वाहतूक जाम झाली होती. अपघाताच्या तातडीने नोंद घेऊन पोलीस प्रशासनाने घटनास्थळी पोहचून पुढील कारवाई सुरू केली.

स्थानीय नागरिक आणि चालकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर नियमांचे पालन करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

## दिवटी सलगरा सुरेखा मुळे यांचा जागतिक महिला दिनी होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२७ फेब्रुवारी -**

तुळजापुर तालुक्यातील दिवटी सलगरा येथील शिवसेनेच्या तुळजापुर तालुका महिला आघाडी प्रमुख व सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा मुळे यांचा कर्तुत्वान महिला म्हणून जागतिक महिला दिनी होणार सन्मान होणार आहे. दिवटी सलगरा येथील वाय.के.सोशल फाऊंडेशन मार्फत यावर्षी प्रथमच सलगरा दिवटी गावच्या कर्तुत्वान महिलांचा सन्मान सोहळा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून करण्यात येत असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. योगेश केदार, डॉ.तृप्ती केदार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.



सुरेखाताई मुळे यांचा गाव परिसरात नेहमीच सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग असतो म्हणूनच त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचा जागतिक महिला दिनी गौरव करण्यात येत आहे.

## सभापती राम शिंदे यांचा माजी आ.ठाकूर यांच्या हस्ते सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापति राम शिंदे यांनी परंडा येथे माजी विधान परिषद सदस्य (माजी आमदार) सुजितसिंह ठाकुर यांच्या निवास्थानी त्यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी ठाकुर व भारतीय जनता पार्टी परंडा तालुका यांच्या वतीने सभापती शिंदे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करणात आला.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले, भारतीय जनता पार्टीमध्ये एकनिष्ठ राहून प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे यांच्याबरोबर राहुन पक्षाचे मी आणि ठाकूर यांनी काम केले आहे.

ठाकुर हे आमचे जुने मित्र आहेत, असे सांगुन त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या भेटीदरम्यान शिंदे व ठाकुर यांच्यात राजकीय चर्चाही झाली.

सुजितसिंह ठाकूर यांचा नुकताचा जन्म दिन झाला असल्याने त्यांना जन्म दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे ॲड.संतोष सुर्यवंशी, विकास कुलकणी, गणेश खरसडे, ॲड.जहीर चौधरी, रमेश पवार, उमाकांत गोरे, बाबासाहेब जाधव, सुबोधसिंह ठाकूर, श्रीराम देवकर,

निशिकांत क्षिरसागर, धनाजी गायकवाड, भालचंद्र अवसरे, बिटू मदने, जगदिश डाके, आनंद मोरे, समरजितसिंह ठाकूर, अनिल मेहेर, पांडूरंग मुसळे, मिलिंद शिंदे आदीसह तालुक्यातील भाजपाचे कार्येकर्ते, पदाधिकारी, शहरासह ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ फेब्रुवारी -**

येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कूलचे १७वे वार्षिक स्नेहसंमेलन २६ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.स्नेहा सुरवसे यांच्या हस्ते झाले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.यशवंत नरवडे, चिकुंद्राचे माजी सरपंच राजेंद्र गरड, अशोकराव केसकर, शुभांगी गायकवाड, सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीराव व्हाडे, पत्रकार विलास येडगे आणि शिवसेना शिंदे गटाचे बंडप्पा कसेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभात शाळेचे अध्यक्ष मारुती खारवे यांनी सर्व मान्यवरांचा सत्कार केला. त्यावेळी त्यांनी शाळेच्या उद्दिष्टांविषयी बोलताना सांगितले की, शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे इंग्रजी माध्यमात शिक्षण मिळावे आणि त्यांना त्यांच्या कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, हेच या स्नेहसंमेलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर लयबद्ध नृत्य सादर करून एकच धमाल उडवली. मराठी, हिंदी चित्रपट गीते, लोकगीत, लावणी, भक्तीगीत, देशभक्तीपर गीत, कोळीगीत यावर नृत्य करून विद्यार्थ्यांनी पालकांच्या आणि उपस्थितांच्या मनाला गारवा दिला. विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा आणि उत्तम नृत्य सादरीकरणाने स्नेहसंमेलनाची रंगत वाढवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक जनक गायकवाड यांच्यासह इयत्ता नववीतील विद्यार्थिनी समीक्षा चव्हाण आणि नगमा काजी यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मेहनतीने कार्यक्रम शांततेत आणि यशस्वीपणे पार पडला.

**धाराशिव :** शहरातील अग्नीशामक कार्यालयाच्या बाजूला उभ्या असलेल्या वाहनांमधून अज्ञात चोरट्यांनी मरॉन कंपनीच्या १२ व्होल्टच्या १२ बॅटऱ्या आणि टिप्परमधील अंदाजे १०० लिटर डिझेल असा एकूण ३६,२०० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. विशाल लक्ष्मण शिंदे (वय ३७) यांनी याबाबत शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन गुन्हा नोंद केला आहे.

# पोलीस प्रशासन दृष्टराष्ट्राच्या भूमिकेत; ड्रग्ज तस्करी प्रकरणात तपास संथगतीने!

**तभा वृत्तसेवा/सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

तुळजापूर शहरात ड्रग्ज तस्करीच्या प्रकरणात पोलीस प्रशासनाची कारवाई संथगतीने सुरू असल्याची जोरदार चर्चा होत आहे. नागरिकांचा यावर विश्वास आहे की पोलीस प्रशासन धटराष्ट्राच्या भूमिकेत दिसत आहे आणि ड्रग्स प्रकरणातील मुख्य सूत्रधार-मास्टर माईंड अजूनही गळाला लागलेला नाही. शहरातील अनेक नागरिकांची शंका आहे की पोलीस प्रशासनामुळे बडे मासे वाचवले जात आहेत.

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी यामध्ये पोलीस प्रशासनाला ७२ तासाचा अल्टिमेटम् दिला होता, परंतु त्या काळाच्या समाप्तीनंतरही पाच-सहा दिवस उलटून गेले तरी तपासात कुठल्याही मोठ्या व्यक्तीला अटक करण्यात आली नाही.

फक्त किरकोळ प्याद्यांची अटक झाली आहे, आणि म्हणूनच नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चांना वाव मिळालाय. ड्रग्ज तस्करीचे संबंध राजकीय नेत्यांच्या गटाशी जोडले जात असून, एका राजकीय पदाधिकाऱ्याने पोलिसांवर आरोप केला आहे की, १९ लोकांची लिस्ट त्यांच्याकडे आहे, पण ती अद्याप जाहीर केली जात नाही.

तुळजापूरमधील ड्रग्ज तस्करी प्रकरणाने शहरातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण केला आहे. पोलिसांवर टीका केली जात आहे की त्यांच्यामुळे शहरात खुलेआम मटका जुगार, चोरी आणि दरोडे यांचे प्रमाण वाढले आहे. काही नागरिकांच्या मते, ड्रग्ज तस्करी प्रकरणात बडे नेते आणि त्यांचे राजकीय संबंध असू शकतात.




१५ फेब्रुवारी रोजी तामलवाडी पोलिसांनी तीन आरोपी पकडले होते, त्यात तुळजापूरचे दोन आणि नळदुर्गचे एक आरोपी होते. त्यानंतर मुंबईतील एक महिला आणि तुळजापूर येथील एक आरोपीही पोलिसांच्या ताब्यात आला. अनेकदा चर्चा झाली आहे की मुंबई पोलिसांनी शहरातील एका प्रतिष्ठित नागरिकाला ताब्यात घेतले आहे, पण याबद्दल अधिकृत माहिती मिळालेली नाही.

तुळजापूर शहरात ड्रग्ज रॅकेट काही वर्षांपासून पसरले असल्याच्या चर्चाही होत्या. तरीही पोलिसांनी याबाबत कारवाई केलेली नाही. शहरातील काही भागांत तरुणांची ड्रग्ज व्यसनाची अड्डे बनलेली आहेत.

समाजसेवक आणि नागरिक याबाबत पुन्हा एकदा प्रशासनाला जागरूक करत आहेत. अनेक युवक सोशल मीडियावर देखील याबाबत जनजागृती करत आहेत.

चर्चा आहे की, शहरातील २,५०० पेक्षा जास्त युवक ड्रग्जच्या व्यसनात अडकले आहेत. तरीही, पोलिसांच्या कारवाईवर शंका व्यक्त केली जात आहे. शहरात ड्रग्जच्या वाढत्या प्रमाणामुळे तीर्थक्षेत्राच्या नावावर मोठ्या प्रमाणात धक्का बसला आहे. पोलीस प्रशासनाने प्रकरणाचा योग्य व तात्काळ तपास करून मुख्य सूत्रधाराला पकडावे अशी मागणी नागरिक आणि भाविकांनी केली आहे.

### तीर्थक्षेत्राची बदनामी...

तुळजापूर शहर हा एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे, जिथे दररोज हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. पूर्वी या शहराचे दारूच्या व्यसनामुळे काही प्रमाणात बदनाम होण्याचे प्रमाण होते, परंतु आता ड्रग्सच्या प्रकरणामुळे शहराच्या आणि तीर्थक्षेत्राच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाविकांमध्ये देखील यावर चर्चा सुरु आहे, आणि शहरवासीयांसोबतच भाविकांमध्येही या प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लागावा अशी मागणी सुरू आहे.

# धाराशिव जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सॉफ्टटेनिस आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी धाराशिवच्या खेळाडूंची निवड

**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** उत्तर प्रदेश मधील नोएडा या ठिकाणी दि.१६ ते २९ मार्च सॉफ्टटेनिसच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणार आहेत.

यासाठी भारतीय मुलींच्या संघामध्ये प्रियांका हंगरगेकर हिची तर मुलांच्या संघांमध्ये स्वराज देशमुख याची निवड करण्यात आली आहे.



धाराशिव जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष संदीप गंगणे व सचिव सिराज शेख, प्रशिक्षक संजय नागरे यांनी दोन्ही खेळाडूंचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

यावेळी देविदास सुरवसे, धैर्यशील दरेकर, राजू गायकवाड, सतीश हुंडेकरी, किरण हंगरगेकर, प्रदीप अमृतराव, काका नन्नवरे, जगदीश पलंगे व खेळाडू उपस्थित होते.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** माजी आमदार तथा भाजपचे माजी प्रदेश सरचिटणीस सुजितसिंह ठाकूर आणि भाजपाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर परीसरातील वस्तीतील पालावरची शाळा येथे आपल्या गरीबीतुन देखील शिक्षण घेत असलेल्या लहान बाळ विद्यार्थी ज्यांच्या नशीबात अंगणवाडी, बालवाडी नाही यांच्या वस्तीमध्ये जाऊन संघपरीवार अशा विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. त्यांना एक छोटीशी मदत म्हणून शालेय सहीत्य उजळणी पुस्तक, वह्या, पेन, खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे, बाबा घोंगते, सोनवणे, लक्ष्मण उळेकर, सरचिटणीस सागर पारडे, उमेश शेंडगे, विलास पारडे, अभिषेक पवार, संकल्प सिद्धी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे सदस्य उपस्थित होते.



### जळकोट येथे १२५ शिवभक्तांचे रक्तदान

**जळकोट, दि.२७ फेब्रुवारी -** तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजे शिवछत्रपती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १२५ शिवभक्तांनी रक्तदान केले. राजे शिवछत्रपती सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्यावतीने जळकोट येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सोलापूर येथील श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर बहुउद्देशीय समाजसेवी व सेवाभावी संस्था संचलित, महात्मा बसवेश्वर ब्लड बँक सेंटरच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जळकोट व परिसरातील १२५ शिवभक्तांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राजे शिवछत्रपती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



### ब्राईट किड्समध्ये स्नेहसंमेलन संपन्न

**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** उमरगा येथील ब्राईट किड्स प्री प्रायमरी स्कूलमध्ये बालकांच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उमरगा लोहारा तालुक्याचे लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राईट किड्सच्या संचालिका प्रभावती जाधव तर प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक पद्माकर मोरे, सुभाष चव्हाण, राज साळुंके, शिवाजी चव्हाण, उज्वला अहंकारी, शोभा टोणपे उपस्थित होत्या. ब्राईट किड्स मधील मुलांनी विविध सामाजिक शैक्षणिक देशभक्तीपर व समाज प्रबोधनपर गीतावर सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. शिवगर्जना, वेलकम साँग, माऊली माऊली, चला जेजुरीला जाऊ, मराठमोळी लावणी अशा अनेक गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पल्लवी बनसोडे, सुषमा कवठे, श्रुती शेळके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

### दिंडेगाव भाविकांना फराळाचे वाटप

**इटकळ, दि.२७ फेब्रुवारी -** महाशिवरात्रीनिमित्त दिंडेगाव येथे जीवन मुक्ती सेवा मंडळ ट्रस्ट धनगरवाडी ग्रामस्थ यांच्यावतीने भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आहे. हजारो भाविकांनी फराळाच्या प्रसादाचा लाभ घेतला. फराळ वाटपाच्या कार्यक्रमाला जीवन मुक्ती सेवा मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष बळीराम महाराज सुरवसे, दीपक महाराज निकम, जगन्नाथ लोकरे, सरपंच नागनाथ घोडके, सुभाष घोडके, प्रताप घोडके, तुकाराम लोकरे, विशाल जेडगे, संकेत सुरवसे, समर्थ हळदे, संस्कार घोडके, रोहित घोडके, गणेश सुरवसे, कुणाल लोकरे, विठ्ठल लोकरे, चेतन दूधभाते आदी गावातील सर्व तरुण मंडळ यावेळी उपस्थित होते.

### विलास व्यवहारे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** येथील व्यापारी विलास व्यवहारे (वय ५७) यांचे



दि.२६ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुली जावई दोन भाऊ नातवंडे असा परिवार आहे. भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य गुलचंद व्यवहारे यांचे ते मोठे बंधू होते.

# महाशिवरात्रीनिमित्त मुद्गलेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

**▶▶ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना १००८ किलोची साबुदाणा खिचडी, ११००० खरबूज, ११००० राजगिरा लाडू आणि दूध खिरीचे वाटप...**

**▶▶ यात्रा कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** तालुक्यातील सिंदफळ येथील ग्रामदैवत असलेल्या मुद्गलेश्वर मंदिरात २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी अफाट गर्दी होती. पहाटेपासूनच मोठ्या संख्येने भाविक मुद्गलेश्वर महादेवाचे दर्शन करण्यासाठी मोठ्या संख्येने येत होते. महाशिवरात्रीनिमित्त यात्रा कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भारुड, कीर्तन, रक्तदान, काठी, पालखी मिरवणूक, २७ फेब्रुवारी रोजी महाप्रसाद, २८ फेब्रुवारी रोजी भव्य कुस्त्यांच्या स्पर्धा आणि २ मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमात लावण्यखणी असा कार्यक्रमाचा सप्ताह होणार आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिराची सुंदर आणि आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती.




मंदिरात भव्य सुंदर रांगोळी काढण्यात आली होती दर्शनासाठी भल्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांच्या वतीने मोफत अन्नदान महाप्रसाद म्हणून दुध, केळी, आणि शाबु खिचडीचे वाटप करण्यात आले होते.

तसेच श्री मुद्गलेश्वर महादेव सेवा समिती तथा मुद्गलेश्वर युवा प्रतिष्ठान तुळजापूर यांच्या वतीने मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचा मध्ये १००८ किलोची साबुदाणा खिचडी, ११००० खरबूज, ११००० राजगिरा लाडू आणि दूध खिर भक्तांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी झार व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये हजारो शिव भक्तांनी याचा लाभ घेतला. सिंदफळ आणि तुळजापूर येथील स्थानिक भाविकांची अभिषेकासाठी मोठी वर्दळ होती.

दुपारी अभिषेकानंतर महादेवाची महाआरती करण्यात आली. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी मुद्गलेश्वर यात्रा कमिटीचे सर्व सदस्य आणि सिंदफळ येथील सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## विनायक सावरकर प्रखर हिंदुत्ववादी विचाराचे धगधगते अग्नीकुंड : अविनाश जोशी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर प्रखर हिंदुत्ववादी विचाराचे धगधगते अग्नीकुंड होते. अत्यंत जहाल विचारसरणीमुळे स्वातंत्र्यसंग्रामात अत्यंत धाडसी कार्य त्यांनी केले. जेवढ्या प्रखरपणे त्यांनी इंग्रजांना विरोध केला, तेवढ्याच प्रखरपणे त्यांनी अंधश्रद्धेलाही विरोध करून एक सुशील समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले, असे करत असताना त्यांच्यातील एक कवी मनाचा तसेच साहित्यिकाचे दर्शन आपल्याला घडते. त्यांच्या विचाराची शिदोरी समाजातील प्रत्येक घटकांनी आत्मसात करावी, असे प्रतिपादन सहशिक्षक अविनाश जोशी यांनी केले.

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर उमरगा येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे पुण्यदिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून जोशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहशिक्षक संजय कोथळीकर हे होते. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार, व्यंकट वचने सह सर्व शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. पुढे बोलताना जोशी म्हणाले की, अत्यंत जहाल विचार व इंग्रजांना जशास तसे उत्तर देण्याची हिंमत दाखवणारे विनायक दामोदर सावरकर हे अत्यंत भावनिक ही होते. त्यांनी काळ्यापाण्याची शिक्षा भोगताना आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रातून आपल्याला त्याची अनुभूती येते. निश्चितच अशा विचाराची देशाला अत्यंत गरज असून ते विचार देणारे व्यक्तिमत्त्वाला विनम्र अभिवादन केले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कुलकर्णी तर आभार मुख्याध्यापिका सविता लोहार यांनी मानले.

## नागझरी महादेव मंदिरात भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ फेब्रुवारी -** येथील नागझरी महादेव मंदिरात शिवरात्री निमित्त भाविकांनी गर्दी केली होती. सध्या प्रयागराज महाकुंभमेळ्याचे सोशल मीडियावरील व्हायरल रिल्समुळे या वर्षी दरवर्षीच्या तुलनेत नागझरी महादेव मंदिरात शिवरात्री निमित्त भाविकांनी गर्दी केल्याने दर्शनासाठी, भाविक, महिला भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.

येरमाळा ते बार्शी रोडवर बालाघाटाच्या रांगेत नागझरी नावाने पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले महादेवाचे मंदिर आहे. नवसाला पावनारा महादेव म्हणुन हे मंदिर प्रसिद्ध आहे.

शिवरात्री निमित्त दिवसभर महादेवाच्या दर्शनासाठी विक्रमी गर्दी केल्याने दिवसभर भाविकांना दर्शन घेण्यासाठी रांगेतुन दर्शन घेण्यासाठी दोन तास वेळ लागला. यंदा प्रयागराज येथील सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या रिल्समुळे यंदाच्या शिवरात्रीला नागझरी महादेव मंदिरात गर्दी



झाल्याचे भाविक बोलत होते.

पंचक्रोशीतील मलकापूर, उपळाई, सापनाई, पानगाव, उमरा, रत्नापूर, तेरखेडा, दुधाळवाडी, बांगरवाडी येथुन महिला भाविकांनी पायी चालत येऊन दर्शन घेतले.

## क्रीडा स्पर्धा व वृक्षारोपणात जि.प. शाळेची नेत्रदीपक कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** उमरगा येथील आयएसओ मानांकित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धा व सहशालेय स्पर्धेच्या बक्षीस वितरण संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड. शितल चव्हाण, गट शिक्षणाधिकारी जीवनराज पडवळ, सुभाष चव्हाणख के.डी. खंडागळ, बाबूलाल मुजावर, नूर अहमद, शोभा टोणपे, शहासाब मुल्ला, कस्तुरी कडगंचे, सुजाता मोरे, महमद रफी शेख, मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. यावेळी क्रीडा स्पर्धेत व सहशालेय स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना निबंध लेखन, प्रश्नमंजुषा, सुंदर हस्ताक्षर, वाद विवाद, चित्रकला, कविता वाचन, गीत गायन, पोस्टर प्रेसेंटेशन, रांगोळी स्पर्धा आणि सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना ३६५ बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील पालकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, सदानंद कुंभार, विद्यानंद सूत्रावे, बशीर शेख, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील पूजा गुंडीले संजय रुपाजी, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक पद्माकर मोरे आभार सोनाली मुसळे यांनी मांडले.

## महाडीबीटी शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ सादर करा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून महाविद्यालयांनी प्रलंबित अर्ज तात्काळ सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी संकेतस्थळ (http://mahadbtmahit.gov.in) २५ जुलैपासून सुरू करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत, त्यांना अर्ज भरण्याची सूचना महाविद्यालयांनी द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## गुरुकुल प्री प्रायमरीच्या विद्यार्थ्यांची गरुड भरारी

**६ पदकाची कमाई...**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा २३ फेब्रुवारी २०२५ कोल्हापूर एकूण सहभागी १४ जिल्ह्यांतील ४१० विद्यार्थी सहभाग नोंदविला होता. यामध्ये धाराशिव जिल्ह्यांनी तृतीय चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावून जिल्ह्याचे नाव लौकी केले.

यावेळी दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष संदीप लाड, बाला साठे, गौतम विधाते, अजय शहा, महमदरफी शेख, आनंदराव ठोंबरे, विनायक चोपदार, मनोज बालिंगेकर, दिपाली साठे, सुभाष मोहिते, संभाजी अहिरराव यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत उमरगा तालुक्यातील गुरुकुल



प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मुरूम, डॉ. रामानुजन इंग्लिश मीडियम स्कूल उमरगा, स्वामी विद्या मंदिर उमरगा, शरणप्पा मलंग विद्यालय उमरगा, श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय उमरगा, छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज उमरगा या शाळांनी सहभाग घेतला होता. पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अंजिक्यपद क्रीडा स्पर्धेत टिम धाराशिव च्या वतीने मुलीमध्यें स्वरांजली मामले प्रथम, स्वरा पाटील प्रथम, पृतुषा प्रविण सोमवंशी प्रथम, अनन्या मारूती पांगे तृतीय, आरती दिगंबर पांगे तृतीय, अक्षरा गुंडय्या स्वामी तृतीय, समृद्धी संतोष टोपगे द्वतीय, श्रेया जितेंद्र अंकुशे तृतीय, मुलामंध्ये आयुष्य पवार प्रथम, रोमन सैनी द्वितीय, साहील शेख प्रथम, करण जाणे तृतीय, गोविंद रूपणूर प्रथम, राजवीर चौधरी द्वतीय, अभय मोरे प्रथम यांनी सहभागी होऊन चांगली कामगिरी पार पाडली.

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** दिल्ली येथे पार पडलेले अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनात तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुकचे सुपुत्र मुंबई येथील प्रसिद्ध आर्ट डिझायनर खाँजाभाई मौलासाहेब सय्यद यांचा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते सन्मान सत्कार केला.

## दिल्ली मराठी साहित्य सम्मेलनात सय्यद यांचा बहुमान

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पाहिलेच सम्मेलन राजधानी दिल्ली येथे पार पडले. साहित्य सम्मेलनाचे मुख्य संयोजक महाराष्ट्र राज्य सरकारसह अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व सरहद संस्था पुणे यांच्या विद्यमाने तीन दिवशीय सम्मेलनाचा डंका राज्यासह दिल्लीत गाजला. अशा दैदिप्यमान सम्मेलनाच्या सजावटीची मुख्य जबाबदारी तुळजापूर तालुक्याचा गौरव असणारे प्रसिद्ध आर्ट डिझायनर खाँजाभाई सय्यद यांच्यावर होती. त्यांनी केलेल्या सर्व प्रसिद्धीच्या कामामुळे या सम्मेलनाला एका वेगळ्या उंचीवर पोचवले.

राजधानीत साहित्य सम्मेलनाची घोषणा होताच नेटक्या नियोजनाची सर्वच स्तरांवर जोरदार तयारी सुरू झाली,यावेळी सम्मेलनाची निमंत्रण पत्रिका, स्वागत कमानी, विचारपीठावरील मुख्य बॅनर आदी बाबींसाठी एकमेव नाव संयोजक समितीच्या समोर आले.

सय्यद यांनी मराठीचा होणारा बहुमान यासाठी आपलाही हातभार लागावा यासाठी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली.

## दिंडेगाव येथील सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस प्रारंभ

**▶▶ आज (दि.२८) हभप. आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे वाटप**

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२७ फेब्रुवारी -** तुळजापूर तालुक्यातील दिंडेगाव येथील ग्रामदैवत श्री सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस बुधवार दि.२६ फेब्रुवारी महाशिवरात्री रोजी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. सकाळ पासूनच भाविकांनी दर्शनासाठी मंदिर परिसरात उपस्थिती दर्शवली अगदी रांगेत व शिस्तीत सर्व भाविकांनी दर्शन घेतले. मंदिर समितीचे सेवक व पोलीस यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी रोजी दुपारी हभप. आप्पासाहेब महाराज



दिंडेगावकर यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. रामकृष्ण हरीच्या जय घोषा ने अवघा परिसर दणाणून गेला. प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी श्री संत सद्गुरू शिवराम बुवा महाराज यांची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात येणार असून तीन दिवस ही यात्रा संपन्न होत असून या सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस तुळजापुर, उमरगा, कळंब, भुम, अक्कलकोट, सोलापूर, धाराशिव, मोहोळ, लोहार, औसा, निलंगा, लातूर आदि भागातून बहुसंख्य वारकरी भाविक भक्त या यात्रेस उपस्थित राहतात. यात्रेकरू भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी मंदिर कमिटी व ग्रामपंचायतच्या वतीने पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. परिसरातील जवळपास ४० ते ५० दिंड्या उपस्थित राहतात. टाळ मृदंग व रामकृष्ण हरी च्या जय घोषात वारकरी तल्लीन होतात.

ग्रामीण भागातील ही यात्रा म्हणजे प्रति पंढरपूर समजले जाते तरी भाविकांनी या यात्रेतील धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## लहुजी शक्ती सेना उमरगा-लोहारा तालुका कार्यकारणीची बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** उमरगा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे मातंग समाज महा अधिवेशना संदर्भात व लहुजी शक्ती सेना कार्यकारणी जाहीर करण्यात आले.

यावेळी महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा मायाताई लोंढे, मराठवाडा उपाध्यक्ष राजाभाऊ शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सारिका कांबळे, जिल्हा संघटक भाग्यश्री सूर्यवंशी, विजय तोरडकर, अलका कांबळे, गिण्यानबाई कांबळे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. युवक तालुका अध्यक्षपदी विशाल गायकवाड, उपाध्यक्षपदी गजानन एडके, लोहारा तालुका संपर्कप्रमुखपदी अर्जुन थोरात, उमरगा शहराध्यक्षपदी विआदींचीके, सचिवपदी मंगेश सुरवसे, विद्यार्थी महिला आघाडी तालुका अध्यक्षपदी सुप्रिया शिंदे, उपाध्यक्ष निकिता चिमुकले, सचिव जोगेश्वरी शिंदे आदींची नियुक्ती करण्यात आली.

लातूर
# दिनांक
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ‘श्री केशवराज’ मराठी भाषा गौरवदिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंचावर कार्यक्रमाच्या अध्यक्षा तथा विद्यालयाच्या पर्यवेक्षिका श्रीमती राजश्री कुलकर्णी, कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या मराठी विषयाच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती क्षमा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

मराठी भाषा गौरव गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ‘शब्दाविष्कार’ या भितीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मराठी भाषेतील विविध साहित्य प्रकाराचे सादरीकरण झाले. यात विविध साहित्य प्रकाराचा समावेश असलेले नाटक व भारुड यांचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले. त्यांना श्री संतोष बीडकर, श्रीमती क्षमा कुलकर्णी व श्रीमती संगम्मा मठपती यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रमुख पाहुण्या श्रीमती क्षमा कुलकर्णी यांनी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवीश्रेष्ठ कुसुमाग्रज उर्फ वि.वा. शिरवाडकर यांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी हा मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा केला जातो हे सांगताना कुसुमाग्रजांविषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. त्यांनी कुसुमाग्रज नावाने काव्यलेखन तर वि. वा. शिरवाडकर नावाने नाट्यलेखन केले, असे सांगितले.

त्यानंतर मराठी भाषेचे महत्त्व सांगताना म्हटले, की मराठी भाषेला संत साहित्य, आधुनिक लेखक-कवींचे साहित्य अशी थोर परंपरा लाभली आहे. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा गौरव वाढवावा, मराठी भाषेचा अंगीकार करावा, असे आवाहन याप्रसंगी केले.



### संक्षिप्त वृत्त...

## दुचाकीची चोरी ; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** चाकूर येथे पार्किंग केलेल्या एमएच २४ एएम ४१०७ या क्रमांकाच्या दुचाकीची चोरी झाल्याची घटना १८ फेब्रुवारी रोजी घडली. याबाबत सचिन दरबस्तवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध चाकूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. जुन्या वापरातील ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तपास पोलिस हवालदार बोळंगे करीत आहेत.

## फावड्याने मारून एकाचे डोके फोडले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** औसा तालुक्यातील पोमादेवी जवळगा येथे मित्रासोबत बोलून घराकडे येत असताना आरोपींनी संगनमत करून विनाकारण फिर्यादीच्या डोक्यात लोखंडी खोऱ्याने मारून जखमी केल्याची घटना २४ फेब्रुवारी रोजी घडली.

याबाबत किरण रावसाहेब बनसोडे (रा. पोमादेवी जवळगा, ता. औसा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किल्लारी पोलिस ठाण्यात नारायण गोविंद बनसोडे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार शेख करीत आहेत.

## भाजीपाला विक्रेत्यांचे महापालिकेसमोर आंदोलन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** दयानंद गेट परिसरातील रयतू बाजारातील भाजीपाला विक्रेत्यांनी भाजीपाला विक्रीचा व्यवसाय करू देण्याच्या मागणीसाठी महापालिकेसमोर बुधवारी धरणे आंदोलन केले.

भाजीपाला विक्रीचा स्टॉल उभारल्यानंतर वाहतूक शाखेचे पोलिस दंड आकारत आहेत. दंडाच्या पावत्या देत आहेत. त्यामुळे आमच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे गाऱ्हाणे या व्यावसायिकांनी मांडले. महिन्यापासून दयानंद गेट परिसरातील रयतू बाजार महानगरपालिका आणि वाहतूक शाखेने हटविला आहे. त्यामुळे व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली आहे. प्रस्तुत ठिकाणी स्टॉल मांडला तर पोलिस दंड करत आहेत. तर महानगरपालिकेकडून साहित्य जप्त केले जात आहे. त्यामुळे कुठे व्यवसाय करावा, असा प्रश्न या विक्रेत्यांना पडला आहे. संतप्त झालेल्या या व्यावसायिकांनी बुधवारी महाशिवरात्रीची सुटी असतानादेखील आंदोलन केले. दंड कसा भरावा, भाजी खरेदी केलेले पैसे कसे निघतील, असा प्रश्न व्यावसायिकांना आहे.

## श्री काशी विश्वेश्वर मंदिरात महाप्रसादाचे वाटप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** महाशिवरात्रीनिमित्त शहरातील श्री काशी विश्वेश्वर मंदिरात धार्मिक



आणि सामाजिक उपक्रम पार पाडले. दिवसभर फराळाचे वाटप तर सायंकाळी शिव-पार्वतीचा विवाह सोहळा पार पडला.

गेल्या ४ वर्षांपासून शामनगर मित्रमंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम घेतले जात आहेत. यंदा सर्व रोगनिदान शिबीराचेही आयोजन करण्यात आले होते.

मंगळवारी मध्यरात्री अभिषेक झाल्यानंतर फराळाच्या वाटपास सुरुवात झाली. या वेळी मंडळातील बाबू गवळी, नंदू उजळंबे, विक्की गुट्टे, रोहित गायकवाड, अखिलेश मुंडे, वैभव सोमवंशी, नेताजी सोमवंशी, सोमेन वाघमारे यांच्यासह मंडळातील सदस्यांनी परिश्रम घेतले. सर्वरोग निदान शिबीरात परिसरातील नागरिकांचे आरोग्य तपासणी करण्यात आले. महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांची दिवसभर रिघ होती.

## फळ भाजीपाला विक्रेत्यांना त्वरीत पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी : आ. देशमुख

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** अतिक्रमण विरोधी पथकाने कारवाई केल्यामुळे विस्थापीत झालेल्या फळे व भाजीपाला विक्रेत्यांना त्वरीत पर्यायी जागा उपलब्ध करुन दयावी, शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करावी, शहरात स्वच्छ पाणीपुरवठा करावा, महिलांसाठी मोफत सिटीबस प्रवास योजना सुरूच ठेवावी, एसटीपी प्रकल्प तातडीने सुरू करावा आदी सुचना आ.अमित देशमुख यांनी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांना केल्या आहेत.



लातूर शहरातील महानगरपालीका अंतर्गत विविध कामांच्या संदर्भाने आढावा घेतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांना अनेक सुचना केल्या आहेत. यात लातूर शहरात फिरून हातगाडे व इतर माध्यमातून फळे, भाजीपाला व इतर वस्तू विकणाऱ्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार फेरीवाला धोरण निश्चित करण्यात आलेले आहे, त्याची ताबडतोब अंमलबजावणी करण्यात यावी. काही दिवसापूर्वी अतिक्रमण विरोधी पथकाच्या कारवाईमुळे विस्थापित झालेल्या लातूर शहरातील फळे व भाजी विक्रत्यांना त्वरित पर्यायी जागा उपलब्ध करून देण्यात याव्यात.

शहराच्या काही भागात दूषित पाणीपुरवठा झाल्याच्या नव्याने तक्रारी आल्या आहेत, यासंदर्भाने त्वरित कार्यवाही करून सर्वत्र स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात यावा. आगामी काळात पुन्हा अशी समस्या उद्भवणार नाही याची दक्षता घ्यावी. लातूर शहरातून गटारात वाहून जाणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले आहे, आता उन्हाळ्याचे दिवस आणि पाण्याची टंचाई लक्षात घेता सदरील प्रकल्प त्वरित सुरू करण्यात यावा.

महिलासाठी मोफत सिटीबस प्रवास योजना सुरूच ठेवावी महिला आणि विद्यार्थिनींना मोफत सिटीबस प्रवास जना राबवणारी लातूर महानगरपालिका राज्यातील ही पहिली आणि एकमेव नगरपालिका ठरलेली आहे, सदरील योजना राबवताना येणाऱ्या अडचणी शासनस्तरावरून सोडवण्यात येतील मात्र ही योजना पुढेही कायम चालू ठेवावी, आदी सूचना आमदार देशमुख यांनी मनपा आयुक्तांना केल्या असून, शहरातील कचरा व्यवस्थापन, रस्ते बांधकाम व दुरुस्ती याकडेही आ. देशमुख यांनी लक्ष वेधले.

## श्री सिद्धेश्वर यात्रेनिमित्त मानाच्या काठ्यांची मिरवणूक



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या महाशिवरात्री यात्रा महोत्सवानिमित्त दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे बाजार समिती परिसरातील गौरीशंकर मंदिरापासून सिद्धेश्वर मंदिरापर्यंत मानाच्या काठ्याची मिरवणूक काढण्यात आली.

श्री सिद्धेश्वर यात्रा निमित्त दरवर्षी मानाच्या काठ्यांची मिरवणूक काढण्यात येते.यावर्षीही ही मिरवणूक काढण्यात आली.अश्व पथक, लेझीम पथक, मुलांचे व मुलींचे स्वतंत्र काठी पथक आणि विविध देखावे या मिरवणुकीत सहभागी झाले होते.गौरीशंकर मंदिर येथे देवस्थानचे विश्वस्त श्री विक्रम गोजमगुंडे,अशोक भोसले, सुरेश गोजमगुंडे, श्रीनिवासजी लाहोटी,बाबासाहेब कोरे,नरेश पंड्या,व्यंकटेश हालिंगे, विशाल झांबरे, ओम गोपे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते काठ्यांचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर ही मिरवणूक सिद्धेश्वर देवस्थानकडे रवाना झाली. बाजार समिती परिसरातून गुळ मार्केट, हनुमान चौक या मार्गे ही मिरवणूक सिद्धेश्वर मंदिरात पोहोचली.

तत्पूर्वी माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे यांच्या निवासस्थानी या काठ्यांचे पूजन करण्यात आले. माजी नगराध्यक्ष विक्रम गोजमगुंडे,विशाल गोजमगुंडे माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे यांच्यासह परिवारातील सदस्यांनी मानाच्या काठ्यांचे पूजन केले.

याप्रसंगी परिवारातील सदस्य व आप्तेष्टांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.तेथून वाद्यांच्या गजरात या काठ्या गौरीशंकर मंदिर येथे आणण्यात आल्या. मिरवणुकीद्वारे या काठ्या सिद्धेश्वर मंदिरात नेण्यात आल्या. सायंकाळच्या वेळी ही मिरवणूक मंदिरात पोहोचली.

## पोलीस अधीक्षक मुंडे यांना ‘बालस्नेही’ पुरस्कार जाहीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** बालकांच्या सुरक्षितेसाठी अखंडपणे, प्रभावीपणे केलेल्या कार्याची दखल घेत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांना महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा ‘राज्यस्तरीय बालस्नेही पुरस्कार’ जाहीर झाला आहे.



पोलीस अधीक्षक मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांमध्ये सायबर क्राईम, पोक्सो कायदा, रॅगिंग कायदा, बालविवाह, बालमजुरी, वाहतूक, ज्येष्ठ नागरिक कायदा, विविध हेल्पलाइन्स आदीबाबत जनजागृती करण्यात आली. त्यांनी ‘इन्स्पेक्टर दामिनी’ ही १४ चित्रकथांची पुस्तिका महाराष्ट्रात प्रथमच तयार केली. याशिवाय महाराष्ट्र राज्य नियमन, हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य यांच्या उपस्थितीत बालकांसंदर्भात २ कार्यशाळांचे आयोजन, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या मदतीने ‘ऑपरेशन मुस्कान’ अंतर्गत अल्पवयीन मुला-मुलींचा शोध, बाल कामगार व बालमजुरी यास प्रतिबंध करण्यासाठी कायदेशीर कारवाई, आषाढी एकादशीनिमित्त शालेय विद्यार्थ्यांची सायबर वाहतूक जनजागृती दिंडी, दामिनी पथक, भरोसा सेलच्या माध्यमातून १ लाखांपेक्षा अधिक शालेय विद्यार्थ्यांना भेट देऊन त्यांना विविध सुरक्षासंबंधी हेल्पलाइन्स, गुड टच-बॅड टच आदी संबंधित जनजागृती करण्यात येत आहे. याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे.

## फोन का केलास म्हणून मारहाण

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** आरोपीच्या फोनवर फोन का केला, या कारणावरून आरोपींनी संगनमत करून फिर्यादीला मारहाण केल्याची घटना घडली. चप्पलने तसेच दगडाने मारून जखमी केले. शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली, असे नारायण राजुरे (रा. लोणी एमआयडीसी, उदगीर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महेश तेलंगे व अन्य दोघांविरुद्ध उदगीर ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास फौजदार कांबळे करत आहेत.

## कै.देशमुख महाविद्यालयात मराठी राजभाषा गौरवदिन उत्साहात साजरा




**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील मराठी विभागाच्या वतीने ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित कवी कुसुमाग्रज तथा वि.वा. शिरवाडकर यांची जयंती महाविद्यालयात प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि अभिवादन करून साजरी करण्यात आली.

यावेळी मराठी विभाग प्रमुख डॉ.जयदेवी पवार, विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार सुरवसे, डॉ. शाहूराज मुळे, प्रा. संदीपान चेवले, डॉ.मा.ना. गायकवाड, डॉ.पांडुरंग मुंढे, प्रा. सोपान डोपे, प्रा.प्रकाश मेहरकर, डॉ. वैशाली माढेकर, प्रा बालिका गौंड, प्रा. पाचंगे पी.यु., डॉ.नरेंद्र देशमुख, डॉ. महावीर कटके, प्रा. विवेक कदम, डॉ. सुरेशकुमार कांबळे, प्राचार्य गणेश देशमुख, वसंत मस्के, प्रा. संतोष कल्याणकर यांची उपस्थिती होती.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजी देशमुख आणि नितीन पाटील यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आता स्कूलबसचाही प्रवास महागणार

### अवैध वाहतुकीचाही परिणाम : विद्यार्थी वाहतूक संघटनेचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** महामंडळाच्या बसपाठोपाठच आता स्कूलबसचा देखील प्रवास महाग होणार आहे. वाढते इंधन दर, अवैध वाहनांद्वारे विद्यार्थ्यांची होणारी वाहतूक यासर्व बाबींमुळे आता यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना ने-आण करणाऱ्या स्कूलबससाठीही अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत. याबाबतचा निर्णय लातूर जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटनेच्या बैठकीत झाला आहे.

जिल्ह्यात ८२० हून अधिक स्कूलबसमधून विद्यार्थ्यांची वाहतूक होते. ही आकडेवारी अधिकृत नोंदणीची असली तरी यामध्येही अवैध वाहतूकीचे प्रमाणही मोठे आहे. हा एक

> इंधनात झालेली वाढ, दुरुस्तीसाठीचा खर्च तसेच सर्वकाही नियमात करावे लागत असल्याने स्कूलबस चालक-मालकांच्या खर्चात वाढ झाली आहे. दुसरीकडे अवैध वाहतूकदारांचे सर्व नियम ढाब्यावर ठेऊन सुरळीत सुरु आहे. अवैध वाहतूकीवर प्रादेशिक परिवहन विभागाने कारवाई केली तर दर वाढीबातच्या निर्णयावर फेरविचार होईल अन्यथा आमच्याकडेही पर्याय नाही.
>
> **- श्रीकृष्ण पाडे, जिल्हा विद्यार्थी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष**

घटकही भाडेवाढ करण्यासाठी कारणीभूत ठरत आहे. ज्या अवैध स्कूलबसमधून विद्यार्थी वाहतूक होते त्यांना ना कोणता कर अदा करावा लागतो ना आरटीओ कार्यालयातील परवाना. दुसरीकडे

नोंदणीकृत स्कूलबस चालकांना इन्शुरन्स प्रणाली, मदतनीस पगार, चालकांचे पगार, स्कूलबसचे हप्ते हे अदा करावेच लागतात. जिल्ह्यात बसव्यतिरिक्त रिक्षा आणि टॅक्सीमधूनही विद्यार्थी वाहतूक केली जाते. ही वाहतूक बेकायदा आहे. या अवैध वाहतूकीला प्रशासनाने लगाम लावला तर दरवाढीबाबत फेरविचार केला जाणार असल्याचे संघटनेच्यावतीने सांगण्यात आले आहे. अन्यथा इंधन दरवाढ, कर भरणा, वाहन दुरुस्तीसाठी वाढलेला खर्च या सर्व बाबींमुळे एप्रिलपासून स्कूलबस वाहतूक दरात १५ ते २० टक्के वाढ होणार आहे.

## मालमत्ता कर व गाळे भाडे शास्ती माफीचा आज अखेरचा दिवस

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** चालू आर्थिक वर्षातील माहे फेब्रुवारी महिना संपत आला तरी बहुतांशी मालमत्ता धारक व गाळे धारकाणी अद्याप टॅक्स भरणा केले नसल्याने लातूर मनपा कर संकलन विभाग व मालमत्ता विभागाच्या वतीने धडक वसुली मोहीम राबविण्यात येत आहे .

नागरिकांनी आपल्या मालमत्तेचा थकीत टॅक्स भरणा करावा यासाठी ५०% शास्ती सुट लागू करण्यात आली आहे . तसेच मनपा मालकीच्या व्यापारी संकुलातील गाळे धारकाकडे मोठ्या प्रमाणात गाळे भाडे प्रलंबित असल्याने त्याना व्याजात १००% सुट देण्यात आली आहे . वरील दोन्ही विभागाकडून शास्ती सुट लागू केल्याने बहुतांशी नागरिक व गाळे धारकानी आपल्या कडील टॅक्स, भाडे भरून योजनेचा लाभ घेतला आहे . परंतु सुट देऊनही काही मालमत्ता धारक प्रतिसाद देत नसल्याने आज ४ क्षेत्रीय कार्यालयात धडक जप्ती मोहीम राबविण्यात आली . ज्या अंतर्गत १ खुला भूखंड जप्ती, ४ दुकान सील तर ७ नळ जोडणी खंडित करण्यात आले .

तरी या पुढेही थकीत कराच्या व गाळे भाडे वसूलीसाठी नियुक्त पथकामार्फत जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून सदर कार्यवाही अंतर्गत मालमत्ता सिल करणे,आटकाव करणे,नळ कनेक्शेन बंद करणे,इत्यादी कार्यवाही करण्यात येणार असून मालमत्ता व गाळे जप्त किंवा सिल करून मुदतीमध्ये मालमत्ताधारकांनी कर भरणा न केल्यास अशा मालमत्ताधारकांच्या मालमत्तेचा लिलाव /विक्री करून कर वसूल करण्यात येणार आहे. तसेच, १ मार्च पासून वसुली साठी विविध पथके स्थापन करण्यात येणार असून उद्या शास्ती सुट चा शेवटचा दिवस असल्याने अधिकाधिक मालमत्ता धारकांनी याचा लाभ घ्यावा असे पालिकेने म्हटले आहे.

## प्रथम फार्मा अध्यापक क्रिकेट स्पर्धेत आलमल्याचा संघ प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** येथील एमआयटी फार्मसी महाविद्यालयाच्यावतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत प्रथम फार्मा अध्यापक क्रिकेट कप-२०२५ या दोन दिवसीय स्पर्धेमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला या संघाने प्रथम पारितोषक पटकाविले तर नांदेड कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड आणि स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ फार्मसी, उदगीर या महाविद्यालयाने अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत माईर्स एमआयटीच्या लातूर येथील एमआयटी फार्मसी कॉलेजतर्फे पहिल्यांदाच फार्मसी महाविद्यालयातील शिक्षकांसाठी दोन दिवस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नांदेड विद्यापीठ अंतर्गत जवळपास १५ महाविद्यालयांच्या २०० हून अधिक अध्यापकांनी स्पर्धेत



सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा शुभारंभ लातूर एमआयटीचे परिसर (कॅम्पस) समन्वयक पृथ्वीराज रमेश कराड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विद्यापीठातील फार्मसी विभाग अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. एस. एस. पाटील, डॉ. एस. एन. नागोबा, एमआयटीचे उपाधीष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे, प्रशासकीय संचालिका डॉ. सरिता मंत्री, चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजचे अध्यक्ष भीमाशंकर देवणीकर, अलमला येथील संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, एमआयटी फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एम. जी. होगाडे यांची उपस्थिती होती.

यावेळी विद्यापीठ संलग्नित १५ फार्मसी कॉलेजचे प्राचार्य व प्राध्यापक उपस्थित होते. सहभागी कॉलेजच्या संघांनी दोन दिवसांच्या क्रिकेट स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून आपल्या खेळाचे कौशल्य दाखवले.

या स्पर्धेत शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला या महाविद्यालयाने प्रथम तर नांदेड कॉलेज ऑफ फार्मसी, नांदेड या महाविद्यालयाने द्वितीय तर स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ फार्मसी, उदगीर या महाविद्यालयाने तृतीय पारितोषिक मिळविले. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी प्राचार्य डॉ. एस. एस. गट्टानी, डॉ. एस. एस. पाटील, प्रा. डॉ. एन. बी. गिवारे यांच्या हस्ते पारितोषक वितरण करण्यात आले. यशस्वीतेसाठी आयोजन समितीचे डॉ. सी. व्ही. पांचाळ, डॉ. व्ही. जी. डिग्गे, प्रा. पी. व्ही. ढाकणे, प्रा. पी. आर. गुळभेले, प्रा. सी. बी. सिरसाठ, प्रा. एस. पी. पाटील, प्रा. एस. एस. खंदाडे, प्रा. एस. एस. सोळुंके आदींनी पुढाकार घेतला. विजेत्यांचे अनेकांनी कौतुक केले.

## ‘ते’ पाणी पिण्यायोग्य

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि.२७ फेब्रुवारी -** शहरातील नागरिकांना नळाद्वारे पाणीपुरवठा केला जातो. हे पाणी पिवळसर दिसत असले तरी पिण्यासाठी योग्य आहे. जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडून दररोज तपासणी केल्यानंतरच पाणी वितरित केले जात असल्याची माहिती महानगरपालिकेच्यावतीने देण्यात आली आहे.

धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून लातूरकरांना पिण्यासाठी पाणी मिळते. हे पाणी हरंगुळ जलशुध्दीकरण केंद्र येथे आणले जाते. पाटबंधारे विभागामार्फत सध्या कॅनलद्वारे पाण्याचे वितरण केले जात आहे. तापमानही वाढले असून पाण्याची पातळी घटत आहे. यामुळे पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत असून शेवाळनिर्मिती प्रक्रिया जलद गतीने होत आहे. शुध्दीकरणासाठी हे पाणी घेतल्यानंतर शेवाळ वितरित पाणी क्लोरीनच्या सानिध्यात येते. यामुळे पाण्याचा रंग पिवळसर होतो. हरंगुळ येथील जलशुध्दीकरण केंद्रात ब्लिचिंग पावडर, तुरटी, क्लोरीन गॅस व पीएसी पावडरचा



वापर करून पाण्याचा पिवळसरपणा कमी करण्यात येत आहे. हे पाणी पिण्यायोग्य आहे की नाही याची जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडून दैनंदिन तपासणी केली जात आहे. त्यानंतरच हे पाणी लातूरकरांना पिण्यासाठी पुरविले जात आहे. हे पाणी पिण्यास योग्य असून त्यामुळे आरोग्याला कुठलाही धोका होणार नाही, अशी माहिती महापालिकेच्यावतीने देण्यात आली आहे.

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## दररोज ताक पिण्याची चळवळ लोकचळवळ व्हावी : पाटील-नागराळकर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ फेब्रुवारी -**

राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सामूहिक ताक पिण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या वेळी बसवराज पाटील नागराळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर के. मस्के आणि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आर.बी. अलापुरे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात बोलताना बसवराज पाटील नागराळकर यांनी ताक पिण्याचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले, ताक पिल्याने शरीरातील चांगल्या सूक्ष्मजीव जंतूंची वाढ होते आणि शरीर निरोगी राहते.

त्यामुळे दररोज ताक पिण्याची चळवळ लोकचळवळ म्हणून पुढे यायला हवी. प्राचार्य डॉ.आर.के. मस्के यांनी विद्यार्थ्यांना ताक प्राशन करण्याचा सल्ला दिला आणि निरोगी जीवनासाठी नियमित ताक पिण्याची सवय लावण्याचे आवाहन केले. या वेळी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहिक ताक प्राशनन करून या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभाग आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रा. भाताडे, प्रा. लांडगे यांनी विशेष मेहनत घेतली.

## संक्षिप्त वृत्त...



### राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात २५ जणांचे रक्तदान

**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी -**

तालुक्यातील भिंगोली येथे दि.२५ फेब्रुवारी रोजी आयोजीत केलेल्या शिवनेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षीक शिबीरात डॉ. भालचंद्र ब्लॅड बॅंक लातूर व रासेयोच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात २५ रक्तदात्याने स्वयंस्पुर्तपणे महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, स्वयंसेवक, गावातील तरुणांनी रक्तदान केले. लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बॅंक लातूरचे दिगंबर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महेंद्र कुमार गांधले, फरहान शेख, शेख अन्सार, सुरेखा हजारे, सरपंच सुशिला चेवले, उपसरपंच ज्ञानेश्वर चेवले, बाळासाहेब पाटील यांच्या सहकार्यातुन हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. अमोल इंगळे, प्रा.डॉ. पांडूरंग मुठ्ठे, सुरेंद्र कुंभार, ओमकार लिंबापूरे, तातेराव कांबळे, अमित गुम्मे, बावलगावे मयुरी, प्रणाली सुडे यांनी परिश्रम घेतले.



### स्त्रीरोग संघटनेचा सर्वोत्कृष्ट संघटना म्हणून गौरव

**उदगीर, दि.२७ फेब्रुवारी -**

चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र स्त्रीरोग संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण परिषदेत उदगीर स्त्री रोग संघटनेला राज्यातील सर्वोत्कृष्ट स्त्री रोग संघटना म्हणून डॉ. प्राजक्ता नितीन गुरुडे उत्कृष्ट स्त्री रोग संघटना प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र स्त्रीरोग संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण परिषदेत अखिल भारतीय स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. सुनिता तांदूळवाडकर, महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेचे अध्यक्ष डॉ.किरण कुर्तकोटी, सचिव डॉ. बिपिन पंडित, परिषदेच्या अध्यक्षा डॉ. मनीषा घाटे, परिषदेच्या सचिव डॉ. कल्पना गुलवाडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. उदगीर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. सविता पदातुरे, डॉ. सुप्रिया जगताप, सचिव डॉ. प्राजक्ता नितीन गुरुडे व कोषाध्यक्षा, सह सर्व महिला डॉक्टर, उपाध्यक्षा, सहसचिव, वरिष्ठ पदाधिकारी, पदाधिकारी सदस्या यांच्या कुशल नेतृत्वात उदगीर स्त्री रोग संघटनेस हा पुरस्कार मिळाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अखेर किल्लारीकरांचे तालुका निर्मितीचे स्वप्न पुर्ण...

# अपर तहसिल कार्यालय, निवासस्थानाच्या बांधकामासाठी २८ कोटींचा निधी मंजूर

### आ. अभिमन्यू पवारांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२७ फेब्रुवारी -**

औसा विधानसभा मतदारसंघांतील कासारसिरसी अपर तहसील कार्यालयाचा विषय मार्गी लागून त्याठिकाणी अपर तहसील कार्यालयाचे बांधकाम सुरू आहे. तर याच मतदारसंघांतील किल्लारी अपर तहसिल कार्यालयाच्या इमारत व कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामासाठी २८ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. स्वतंत्र किल्लारी अपर तहसीलदार कार्यालयामुळे औसा तहसील कार्यालयावरील भार कमी होणार असून नागरिकांना वेळेवर नागरी सुविधा मिळणार आहेत.



केवळ भूलथापा न मारता राजकीय इच्छाशक्ती व वजन वापरून लोक प्रतिनिधी नागरिकांच्या समस्या सोडवून मतदारसंघाला विकासाच्या एक दिशेने घेऊन जावू शकतात. हे आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या कामातून मतदार संघांतील नागरिकांना वारंवार दाखवून दिले आहे. यामध्ये विधानसभा निवडणुकीत नागरिकांना किल्लारी येथे अपर तहसीलदार कार्यालयाचा दिलेला शब्द आमदार पवारांनी पुर्ण केला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या किल्लारी अपर तहसीलदार कार्यालयाच्या मंजुरीचा प्रश्न काही दिवसांपूर्वी मार्गी लागला असून या कार्यालयाच्या बांधकामासाठी तब्बल २८ कोटींचा निधी त्यांनी मंजूर करून घेतला आहे.

या कार्यालयामुळे किल्लारीचा विकास होण्यास सुरुवात झाली असून अपर तहसीलदार कार्यालय इमारत बांधकाम करण्यासाठी १३ कोटी ५० लक्ष रु. तर अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी १४ कोटी ४८ लक्ष रु. निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये एकूण २७ निवासस्थानांचे बांधकाम करण्यात येणार आहे.

तालुक्यातील दळणवळण, सोयी सुविधा विचारात घेता किल्लारी परिसरातील नागरिकांना दैनंदिन महसूल विषयक प्रशासकीय काम काजासाठी किल्लारी अपर तहसील सोयीचे ठरणार आहे.

तसेच महसुली दाखले याच तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध होऊन परिसरातील ग्रामस्थांची गैरसोय दूर होणार आहे. काही राजकीय नेत्यांनी १९९३ च्या भूकंपानंतर किल्लारी तालुका करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र गेल्या तीन दशकांपासून हा विषय प्रलंबित असताना आ. अभिमन्यू पवार यांना आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळाल्यानंतर त्यांनी आपले राजकीय वजन वापरून किल्लारी येथे अपर तहसीलदार कार्यालयाच्या माध्यमातून किल्लारी तालुका निर्मितीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

### मतदारसंघात दोन अपर कार्यालयामुळे जनतेची सोय

किल्लारी व कासारसिरसी येथे अपर तहसील कार्यालयाच्या निर्मितीमुळे या भागातील नागरिकांना तहसील संबंधित भागातील महसूली कामांसाठी नागरिकांना मदत होणार आहे. जनभावनेचा आदर करून मतदारसंघांतील नागरिकांच्या सोयीसाठी निवडणुकीपूर्वी किल्लारी येथे पदनिर्मितीसह स्वतंत्र अपर तहसीलदार कार्यालय स्थापित करण्यास मंजुरी मिळवून आणली होती.किल्लारी कारखाना, स्वतंत्र किल्लारी अपर तहसीलदार कार्यालय व स्वतंत्र किल्लारी तालुका च्या माध्यमातून किल्लारीला नववैभव मिळणार असल्याचा विश्वास आ. पवार यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

## शिरूर अनंतपाळमध्ये घरफोडी; चार लाख ६० हजाराचे सोने व चांदीचे दागिने लपांस



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी**

शहरातील समता नगर येथे अज्ञात चोरट्याने घर फोडी करून जवळपास ४ लाख ६० हजार रुपयेचे सोन्या चांदीचे दागिणे व रोख रक्कम दि.२३ दरम्यान दाराचे कुलूप तोडून पळविल्याची घटना घडल्या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत माहिती अशी की, शहरातील समता नगर येथे राहणाऱ्या अमीनाबी जैनोददीन शेख हे दि.२३ ते २४ फेबुवारी दरम्यान फिर्यादी घरात नसल्याचा फायदा घेवुन त्यांच्या बंद घराचे दाराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी, फिर्यादीचा मुलगा यांच्या रुममधील कपाटात ठेवलेले अंदाजे ३ लाख ८७ हजार रूपयांचे १० तोळे ८ ग्रॅाम सोने तसेच १५ तोळे चांदी ३ हजार रूपये किमंतचे असे ३ लाख ९० हजार रूपचे सोन्या-चांदीचे दागीने व ७० हजार रोख रक्कम असा एकुण ४ लाख ६० हजार रुपेचा माल चोरी करुन घेवुन गेला आहे.

या संदर्भात फिर्यादी अमीनाबी जैनोददीन शेख यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन अन्सापूरे करीत आहेत. या घटनेने परिसरात नागरीकांत घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष कल्याणकर यांच्यासोबत आम्ही घटनास्थळी भेट देऊन डॉग स्कॉडला पाचारण केले होते. चोरांचा कोणताच पुरावा नसल्यामुळे पोलीस अधिक्षक कार्यालयाचे फिंगर प्रिंटच्या पथकाचे प्रमुख पुणेकर व त्यांचे पथक येवून तपासणी करून गेले. पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक दराडे यांनी सांगितले.

## कवठाळ येथील ३८ कुटुंबांचे घरकुल स्वप्न साकार

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२७ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्यात पंतप्रधान आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीअंतर्गत आज राज्यभरातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटपाचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. तसेच, १० लाख घरकुल लाभार्थ्यांच्या बॅंक खात्यावर पहिला हप्ता थेट जमा करण्यात आला. ही योजना केवळ घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी नसून, गरजू कुटुंबांना सन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास देणारी आहे.

या योजनेच्या अंमलबजावणी अंतर्गत कवठाळ ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने गावातील ३८ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आदेश वाटप करण्यात आले. तसेच, प्रत्येक लाभार्थ्याच्या बॅंक खात्यावर १५,००० रुपये जमा करण्यात आले.

## स्वातंत्र्यवीर विनायक सावरकरांना अहमदपूरमध्ये अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२७ फेब्रुवारी -**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या ५९ व्या पुण्यतिथीनिमित्त २६ फेब्रुवारी रोजी सकाळी अहमदपूरमधील सावरकर चौकात भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण व सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन स्वातंत्र्वीरांना अभिवादन करण्यात आले. भारत माता की जय व वंदेमातरमचा जयघोष करत वंदेमातरम गीत घेण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत प्रा.डॉ. भूषणकुमार जोरगुलवार, भाजपचे डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, ॲड. अमित रेड्डी, ॲड. भारत चामे, तसेच कलावती व शिवमूर्ती भातांब्रे, प्रेमा वतनी, धनंजय जोशी, राजू कल्याणे, कपिल बिरादार, प्रमोद कुलकर्णी, बापू शिरुरकर, अभय निलंगेकर, अशोक गायकवाड, कृष्णा हेरकर, गौरव चवंडा, डॉ. सुहास जोशी, अवधूत जोशी, लक्ष्मण अलगुले, ॲड. दिलीप कुलकर्णी, मधुसूदन चेरेकर उपस्थित होते.

यावेळी सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त महात्मा गांधी महाविद्यालयात चाळीस विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

## शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अत्यावश्यक

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२७ फेब्रुवारी -**

कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शेतकऱ्यांना जलदगतीने सेवा देण्यासाठी युनिक आयडीचा उपयोग होणार आहे.

यात शेतकऱ्यांच्या नावावर शेतजमीन असेल तर त्यांना फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषीविषयक सेवा, सुविधा तसेच शासकीय योजनांचे लाभ पारदर्शकपणे मिळू शकतील.

यासाठी 'ग्री स्टॅक' नावाने डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. याची नोंदणी प्रत्येक महा-ई-सेवा केंद्रावर सुरू असून सर्व शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार होण्यासाठी हा उपक्रम प्रशासनाकडून प्राधान्याने हाती घेण्यात आला.

तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे, असे आवाहन तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

ग्रिस्टॅकमुळे पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई, कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करून घेण्यात सुलभता राहील.

बोरोळ येथे महा-ई-सेवा केंद्रावर शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढून शेतकऱ्यांना वाटप करताना कृषी सहाय्यक रितेश टोकले, शेतकरी प्रताप कोयले, गणेश इदलकंठे, ज्ञानोबा येणकुरे, नारायण येणकुरे, संभाजी म्हेत्रे, सावित्रा बिरादार, सविता सुर्यवंशी इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

## श्रध्दा जरुर ठेवा पण अंधश्रद्धा बाळगू नका : माधव बावगे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी -**

श्रद्धा जरूर ठेवा पण अंधश्रद्धा बाळगू नका, अंधश्रद्धा ही विकासाला बाधक असून विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या योगात ही आजचे नागरिक अंधश्रद्धा बाळगत आहेत. अंधभक्त नागरिक अंधश्रद्धे पोटी देव देवतांना कोंबड्या बकऱ्याचे बळी देत आहेत. त्यामुळे समाजाची प्रगती होण्या ऐवजी अधोगती होत असल्याचे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील भिंगोली येथे शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष शिबिर सुरू आहे. यानिमित्त दि.२५ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सुशीला चेवले या होत्या. यावेळी मंचावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक नरहरे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, प्रा.डॉ. सतिष कुंडलवार, बाळासाहेब पाटील, डॉ.पांडूरंग मुठ्ठे यांची उपस्थिती होती. यावेळी माधव बावगे सरांनी ग्रामस्थ व स्वयंसेवक विद्यार्थ्यांना विविध जादूचे प्रयोग करून दाखवून लोकांच्या मनातील अंधश्रद्धा व भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अमोल इंगळे यांनी केले. यशस्वीतेसाठी स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार लिंबापुरे, विद्यार्थीनी प्रतिनिधी प्रणाली सुडे, तातेराव कांबळे, जयेश होळकर व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## महाशिवरात्रीनिमित्त रामलिंगेश्वराच्या दर्शनासाठी भक्तांची अलोट गर्दी

### पहाटेपासून मांजरा नदीत स्नान... पूजा-अर्चा आणि जयघोषाने परिसर दुमदुमला...

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२७ फेब्रुवारी -**

महाशिवरात्रीनिमित्त देवणी तालुक्यातील जवळगा येथील प्रसिद्ध श्री रामलिंगेश्वर मंदिरात भक्तांची प्रचंड गर्दी झाली होती. पहाटेपासूनच हजारो शिवभक्तांनी मांजरा नदी पात्रात स्नान करून श्री रामलिंगेश्वराच्या दर्शनासाठी मंदिरात हजेरी लावली. रामलिंग महाराज की जय, हर हर महादेव या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

जवळगा, हिसामनगर, धनगरवाडी, वाघनाळवाडी, साकोळ, वलांडी आणि पंचक्रोशीतील भाविकांनी पहाटेपासून पायी चालत येऊन दर्शन घेतले. मंदिरात महाशिवरात्रीच्या महापूजेला विशेष महत्त्व असून,



हालगीच्या गजरात भक्त सहकुटुंब दर्शनासाठी आले होते.

दरम्यान, प्रयागराज येथे आज शेवटचे शाहीस्नान असल्याने मांजरा नदीच्या काठावर स्नानासाठी भाविकांची विशेष गर्दी होती. सकाळी महापूजा, मंत्रजप आणि आरती करण्यात आली. संध्याकाळपर्यंत भक्तांची गर्दी वाढत होती. महाशिवरात्रीनिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांच्या सजावटीने मंदिर परिसर उजळून निघाला होता. प्रतीकात्मक महादेवाची मूर्ती आणि पिंडीचा देखावा उभारण्यात आला होता. संपूर्ण मंदिर परिसरात भगवे ध्वज लावण्यात आले होते.

श्री रामलिंगेश्वर देवस्थान कमिटीच्या वतीने केळी आणि पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.

महाशिवरात्रीच्या धार्मिक विधींचे पौराहित्य राजकुमार स्वामी यांनी केले. भाविकांच्या भक्तिभावाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

## छत्रपती शिवराय हे शेतकरी व सर्वसामान्यांचे स्वराज्य निर्माते : प्रा. जाधव

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ फेब्रुवारी -**

आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही या सर्व शासनकर्त्यांच्या काळात शेतकऱ्यांवर अनन्वित अत्याचार झाले. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे त्याच्यावरती अन्याय होता कामा नये, अशी छत्रपती शिवरायांची भूमिका होती. शेतकऱ्यावर अस्मानी आणि सुलतानी संकट कायम स्वरूपी राहिले आहे. त्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठीच छत्रपती शिवरायांनी शेतकरी व सर्व सामान्यांचे स्वराज्य निर्माण केले होते, असे मत शिवश्री प्रा. अजितकुमार जाधव यांनी व्यक्त केले.



ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बहि:शाल व्याख्यानमालेतील गुडसूर येथे पहिले पुष्प गुंफतांना 'शेतकऱ्यांचा राजा : छत्रपती शिवराय' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे जेष्ठ सदस्य तथा माजी आमदार प्रा. मनोहरराव पटवारी हे होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, सरपंच उत्तम सूर्यवंशी, भारत पारसेवार, नागेश नवाडे, डॉ. दत्ताहरी होनराव यांची विशेष उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. जाधव म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या कार्यामागे संतांच्या विचारांची प्रेरणा होती. 'जे का रंजले गांजलेश्र त्यासी म्हणे जो आपुलेश्रश्र तोचि साधू ओळखावाश्र देव तेथेची जाणावाश्रश्र' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी रचले होते, त्याचा परिणाम छत्रपती शिवरायांवरती झाला. छत्रपती शिवरायांनी जात आणि धर्माचा विचार न करता गुणवत्तेवर आधारित स्वराज्य निर्माण केले. इतिहासाची स्व-लाभाकरिता मोडतोड न करता महापुरुषांचा खरा इतिहास तरुणांनी समजून घेतला पाहिजे, असे आवाहन उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय बहि:शाल केंद्राचे समन्वयक डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रवीण जाहुरे यांनी मानले. यावेळी नागरिक उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ बस फेऱ्या वाढविण्याची मागणी

### आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचे पत्र...

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी**

निलंगा विधानसभा मतदारसंघातील शिरूर अनंतपाळ शहरातून नागरिकांच्या प्रवास सोयीसाठी बसच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लातूर परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक यांना पत्राद्वारे केली आहे.

शिरूर अनंतपाळ हा तालुक्याचे ठिकाण आणि जिल्ह्याचे मध्यवर्ती स्थान आहे, जिथे बाजारपेठ आणि शाळकरी विद्यार्थ्यांची वर्दळ कायम असते. मात्र, अपुऱ्या बस फेऱ्यांमुळे नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रात पुढील बस फेऱ्यांच्या वाढीची मागणी केली आहे.



शिरूर अनंतपाळ ते लातूर, शिरूर अनंतपाळ ते निलंगा, शिरूर अनंतपाळ ते उदगीर, शिरूर अनंतपाळ ते अहमदपूर शटल सेवा, लातूर-शिरूर अनंतपाळ, नळेगाव मार्गे किमान ४ फेऱ्या, उदगीर ते पुणे जाणारी शिरूर अनंतपाळ मार्गे जाणारी १ बस, राणी अंकुलगा ते निलंगा व उदगीर, साकोळ निलंगा चालू असलेली बस शिरूर अनंतपाळ मार्गे पुर्ववत करावी. निलंगा - नांदेड जाणारी बस शिरूर अनंतपाळ मार्गे पूर्वी चालू असलेल्या निलंगा-मखेड, निलंगा-परभणी, निलंगा-वसमत या बसगाड्या पुर्ववत सुरु कराव्यात.

निवेदनावर नगराध्यक्ष गणेश धुमाळे, उमाकांत देवंगरे, सुमीत दुरुगकर, शंकर बेंबळगे, विशाल गायकवाड, शिवराज शेरसांडे, दत्ता शिंदे, सचिन सांगवे यांच्या सह्या आहेत.